रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ८ ऑक्टोबर २०२३



# निर्भय नव्हे काँग्रेसी बनो!

देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, त्यामुळे प्रत्येकाला विचार मांडण्याचा घटनेचा अधिकार आहे! तो आणीबाणीत नव्हता. २०१ ४ मध्ये काँग्रेसचा भ्रष्टाचाराच्या मुद्दावर पराभव झाला. मोदी पंतप्रधान झाले. या सरकारने अनेक धाडसी निर्णय घेतले. त्यावर जनतेने शिक्कामोर्तब करत २०१९ पुन्हा मोदींना व भाजपाला बहुमताने निवडून दिले. तेव्हा देशाची सत्ता कोणाच्या हाती द्यावयाचे? हे मतदारांच्या हातात आहे. याच काँग्रेसला पन्नास वर्षे मतदारांनी डोक्यावर घेतले. या पक्षाचा संसदेत विरोधी पक्ष नेता होवू शकलेला नाही, अशी पक्षाची दयनीय अवस्था झालेली आहे. काँग्रेस आत्मचिंतन करत नाही! गांधी नेतृत्वाला देव मानून पूजा करत बसले आहत. देशात मतदारांनी केंद्रात परिवर्तन घडविले आहे. पण विरोधी पक्षांनी मोदी नेतृत्वाची धसकी घेतली आहे. यात मोदी नेतृत्वाला पराभूत करण्याची क्षमता राष्ट्रीय काँग्रेस पक्षात तर नाही, त्यांचेकडे त्या ताकदीचे नेतृत्व नाही. त्यामुळे विरोधी पक्षाला मोट बांधवी लागली. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे २०२४ च्या निवडणुकीपूर्वी देशात मोदी विरोधात नकारात्मक वातावरण निर्माण केले जात आहे. त्यात आघाडीचे नेते सनातन धर्म संपविण्याची भाषा करत आहेत. ओ.बी.सी. आणि जातीय जनगणनेची मागणी केली जात आहे, यामागे मतांचे ध्रुवीकरणा, हेच कारण आहे. त्यात मोफत (रेवडी) देण्याचे घोषणा करून मतदारांना आकर्षित केले जात आहे! आता न्यायालयाने दखल घेतली आहे.मोदी व भाजपाच्या विकास 'कामांना' छेद देण्याचे प्रयत्न होत आहेत. देशातील तथाकथित बुध्दीवादी



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

विचारवंत, समाजिक कार्यकर्ते, पत्रकार मोदींचे देशात नेतृत्व नको आहे. ते मोदीची सत्ता उलथून टाकण्यासाठी खटाटोप करत आहेत.दिल्लीत गोदी व चाटूगार मिडीया असे दोन गट आहेत. काँग्रेस सरकारने या पत्रकारांचे चोचले पुरविले. त्यांना पैसे वाटले, त्यांना पुरस्कार दिले काँग्रेसी माजी पंतप्रधान विदेशात जाताना या पत्रकारांना सोबत न्यायचे. या पत्रकारांच्या घरासमोर अलिशान गाड्या जायच्या! तेव्हा पत्रकारांना रुाबब होता. विदेशात खंब्यापासून चांगला पाहूणचार केला जायचा! विदेश दौऱ्यात या टोळीने चांदीचे चमचे चोरले होते! त्या वृत्ताने भारताची बदनामी झाली होती. दिल्लीत पत्रकारांचा राजकीय हस्तक्षेप इतका वाढला की, केंद्र सरकारने कोणाला मंत्री करावे ? अथवा करु नये? या पक्षाने कोणाला उमेदवारी द्यावी, तेच ठरवित असत. तसेच त्यांना मोठी रक्कम मिळायची. लाखो रुपायांचे महागडे गिफ्ट मिळयाचे! पण मोदी सरकार आल्यानंतर या पत्रकारांचे लाड बंद झाले! त्यांचे विदेश दौरे आणि शासकीय हस्तक्षेप बंद झाला. तेव्हा ही पत्रकार टोळी मोदी सरकारवर नाराज आहे. हे पत्रकार मोदी विरोधी मोहिम राबवित आहेत.त्यांना विदेशीतून आर्थिक पाठबळ मिळत आहे. दुसरीकडे मोदी सरकारच्या राष्ट्र हिताची बाजू मांडणाऱ्या 'गोदी मीडिया' म्हटले जाते. त्यांना हिणवले जाते व लक्ष्य केले जात आहे. परवा दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने 'न्यूजक्लिक या वृत्त संकेतस्थळाच्या कार्यालयावर धाड टाकली. याचे कारण वृत्तसंस्थेने चीनकडून ३८ कोटी फंड घेतला. त्या मोबदल्यात देशाच्या आणि सरकारच्या विरोधात मोहिम राबवित होते. यात नामवंत पत्रकार, लेखक यांना कोटींच्यावर रक्कम मिळाली आहे. महाराष्ट्रात ग्रामीण पत्रकाराना तर खंडणी मागितल्याच्या आरोपाखाली हातकड्या घातल्या जातात. मग दिल्लीचे पत्रकार हे जर विदेशाच्या फंडावर देशाची, सरकारची बदनामी करत असतील तर त्यांना काय करायला पाहिजे? याला पत्रकारिताचे स्वातंत्र्य म्हणावयाचे काय? त्यांचेवर दहशदवादी कृत्य करणे, त्यासाठी फंड घेणे! कारस्थान करणे, या गंभीर कलमान्वये अटक झाली आहे. या पत्रकारांना राष्ट्रप्रेमी म्हणावे काय? अशा प्रवृत्तीच्या पत्रकारांना काँग्रेस साथ देत आहे! हे दुर्देव आहे. देशातील तपास यंत्रणेने भ्रष्ट राजकीय नेते व पत्रकारांवर कारवाई व अटक करावयाची नाही काय? यांच्यासाठी स्वतंत्र कायदा आहे काय? नेते पत्रकार, निर्मळ व निस्पृह असतील तर न्याय संस्था याचा निर्णय देईल. त्यासाठी मोदी विरोधात तांडव नृत्य करण्याची गरज काय? भारतात सर्वांना हाच कायदा व नियम, न्याय लागू आहे. मोदी सरकार आल्यानंतर देशात ईडी आणि सी. बी. आय. विरोधी पक्षावर सुडबुध्दीने कारवाई करतेय! अशी रोज ओरड होत होती. आजही करतात! या कारवाईत ९५ टक्के विरोधी पक्षाचे नेते आहेत,असे म्हणणे होते. तेव्हा काँग्रेसह १४ विरोधी पक्ष सर्वोच्च न्यायालयात गेले होते. दि. ५ एप्रिल २०२३ मध्ये न्यायालयाने राजकीय नेत्यांसाठी स्वतंत्र कायदा व संरक्षण देता येणार नाही, अशा शब्दांत फटकारले! हे निर्भय'वाले का लपवून ठेवत आहेत. या दोन्ही तपास यंत्रणेचा जन्म काँग्रेस राजवटीत झालेला आहे.

आधुनिक केसरी

महाराष्ट्रात 'निर्भय बनो अभियाय' सुरु आहे.यात सामाजिक कार्यकर्ते, वकील व पत्रकाराचा एक समुह आहे. हे अभियान निष्पक्ष नाही. केवळ मुखवटा लावलेला आहे. या चळवळीचा उद्देश म्हणजे, मोदी व शहा यांना संपविण्याचा आहे.त्यासाठी या माध्यमातून राज्यात भाजपा विरोधी सभा घेतल्या जात आहेत. ही मंडळी 'इंडिया आघाडीचा अजेंडा राबवित आहे. त्यासाठी चळवळ, वळवळ कशाकरिता? सरळ काँग्रेसी बना ! असे सांगा ना! हे तथाकथित पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार देशात परिर्वतन घडविणास निघाले आहेत.


त्याचा गैरवापर होतो, हे माहित असताना त्या बंद का नाहीत? उलट मोदी सरकारच्या कार्यकाळात भ्रष्ट राजकीय नेते पकडले जात आहेत! त्यांची बेनामी व बेहिशोबी संपत्ती जप्त होत आहे. ते जेलमध्ये जात आहेत! याचे निर्भवाल्यांनी स्वागत केले पाहिजे! कारण मोदी निर्भयपणे काम करत आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले, भाजपाकडे भ्रष्टाचारी नेत्यांना स्वच्छ करण्यासाठी वाशिंग मशीन ('ईडी) आहे. आपणाकडे सत्ता होती, तेव्हा भ्रष्ट भाजपा नेत्याच्या विरोधात कारवाई का केली नाही? कोणी अडविले होते? राष्ट्रवादी काँग्रेसने नेते वाशिंगमशीनमध्ये धूऊन घेतले गेले आहेत! ते स्वच्छ चारित्र्याचे आहेत का? एकाही नेत्यावर भ्रष्टाचाराचा डाग नाही! ते सगळे संत आहेत! पवार हे नेहमी सोयीचे बोलतात. त्यांनी पक्षातील भ्रष्ट नेत्यांना संरक्षण देण्याचे काम केले आहे. तो आम आदमी पक्ष भ्रष्टाचारावरुन नैतिकतचे धडे देत होता. या पक्षाचे तर मंत्री जेलची हवा खात आहेत. न्यायालयात जामीन मिळत नाही! खा. संजयसिंह यांना दारू घोटाळ्यात



अटक झाली. आश्चर्य म्हणजे! या पक्षाचे कार्यकर्ते भ्रष्टाचाराचे समर्थन करत आहेत म्हणजे 'गंगा उलटी वाहत' आहे. इंडिया आघाडीत नेते लालू प्रसाद यांना भ्रष्टाचाराच्या चार प्रकरणात शिक्षा झाली. ते आता इंडिया आघाडीचे मार्गदर्शक व आदर्श नेते झाले आहेत? राहुल व प्रियंका हे तर नवीन "रेसीपी' शिकायला, चिकन खायला लालूंच्या निवासस्थानी गेले होते. काँग्रेस नेत्यांना नैतिमत्ता राहिलेली नाही. भाजपा सत्तेसाठी भ्रष्टनेत्याला सोबत घेत आहेत. महाराष्ट्रात भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान दिले गेले. याचे परिणाम भाजपाला भोगावे लागतील.

देशात ३० लाख गैरसरकारी सेवा भावी (एन.जी.ओ.) संस्था आहेत. यात उत्तर प्रदेशात १२ हजार ५२३ तो पहिल्या क्रमांकावर तर महाराष्ट्र राज्य १२ हजार २९५ असून तो दुसऱ्या क्रमांकावर आहेत. या संस्थाचे शैक्षणिक आरोग्य, विविध सामाजिक कामात योगदान आहे. बहुसंख्य संस्था (एन.जी.ओ.) केवळ कोट्यवधीची कमाई करत आहेत.मोदी सरकार सत्तेत आले. तेव्हा देशातील सहा हजार संस्थाना विदेशातून कोट्यवधींचा निधी मिळत होता. यातील काही संस्थानमधील आर्थिक गैरव्यवहाराच्या संशयावरुन संस्थाना नोटीसा दिल्या.तेव्हाही देशात गदारोळ झाला. तेव्हा २०१५ हे प्रकरण न्यायालयात गेले. तेव्हा ३० लाख पैकी २० लाख संस्था हिशेब सादर करत नसल्याचे दिसून आले. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने या संस्थांना निधी व हिशब देणे बंधनकारक असल्याचे सुनावले! यात काही एन.जी.ओ.ची राजकीय पक्षाशी बांधिलकी आहे. त्या सरकारच्या विरोधात समाजाला भडकविणे तसेच राज्य व राष्ट्राच्या विरोधात मोहिम राबविणे हे त्यांचे कार्य आहे. 'नर्मदा बचाओ' आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांचे उदाहरण घ्या! त्यांचे संस्थेवर आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप झाला! तेव्हा त्याच्या संस्थेला कोट्यवधी रुपये मिळतात, हे दिसून आले! पाटकरांनी संस्थेची १३.५ कोटींची उलाढाल लपवून ठेवली होते. त्यामुळे त्यांच्यासह १२ जणा विरुध्द गुन्हे दाखल झाले! पाटकर यांनी हा आर्थिक व्यवहार का लपविला? वास्तविक सामाजिक नेत्यांच्या संस्थेचा कारभार पारदर्शक असावयास पाहिजे. पाटकरांच्या संस्थेची कोट्यवधी उलाढाल होती. यावर कोणाचा विश्वास बसणार नाही! त्यांनी २०१४ मध्य आम आदमी पक्षातर्फे निवडणूक लढविली होती. दुसऱ्या सामाजिक कार्यकर्त्या तीस्ता सेटलवाड आहेत. त्याही संस्था चालवितात.गुजरात दंग्यामध्ये मोदी व शहा यांना फसविण्यासाठी सीतलवाड यांनी खोटे पुरावे व साक्षी तयार केल्याचे उघडकीस आले! तेव्हा त्यांना अटक झाली व त्या जामीनावर सुटल्या आहेत. त्यांना या कामासाठी काँग्रेसने मदत केली. त्यावेळी काँग्रेस सरकारने संस्थेला १ कोटी ४ लाख रुपये दिले! पुरस्कार देवून गौरव केला.हे श्रीमती सोनिया गांधी यांचे इशाऱ्यावर केले गेले. तेव्हा काँग्रेसचे अनेक काळे कारनामे आहेत! विदेशी फंड घेवून देशाची व सरकारची बदनामी करणाऱ्यांच्यावर कारवाई केली त्यामुळे अश्या भ्रष्ट मंडळीना मोदी व शहा हे नेते हुकुमशहा वाटणार! महाराष्ट्रात अशा संस्था व सामाजिक कार्यकर्ते इंडिया आघाडीचे तुणतुणे वाजवित आहेत. याला काँग्रेसचे पाठबळ आहे. देशात घडत आहेते महाराष्ट्रात ते घडत आहे. राज्यात 'निर्भय बनो' हे अभियान म. गांधींचे छायाचित्र लावून काँग्रेस व इंडिया आघाडीचा प्रचार केला जात आहे, मतदारांत संभ्रम निर्माण केला जात आहे. यात "निर्भय बनो' याला इतिहास आहे! भगवान महावीरांनी २६ हजार वर्षांपूर्वीच लोकांना 'निर्भय बना' असे संगितले. कारण भयभीत राहणे हे आत्म्याचा स्वभाव नाही, असे म्हणाले होते. गांधीजींनी यांनी १९१७ बिहारमधील चंपारण्यचा पहिला सत्याग्रह केला होता. त्यांनी ब्रिटिशांना घाबरु नका! त्यांनी जेलमध्ये टाकले चालेल त्यांचा हा सत्याग्रह 'निर्भय बना' होता! तसेच सुप्रसिध्द साहित्यकार व नाटकार यांनी १९९५ मध्ये 'निर्भय बनो' अभियानात भाग घेतला होता. कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येनंतर २०१६ मध्ये 'कोल्हापूरात निर्भय बना' रॅली काढली गेली होती. महाराष्ट्रात ९ ऑगस्ट २०२३ मध्ये हुतात्मा चौकात भाजपा व मोदी विरोधात तीस संघटना एकत्र आल्या होत्या, त्यांनी शपथ घेतली. यात मोदीव्देषी निखील वागळे यांच्या डोक्यातून 'निर्भय बनो चळवळ आहे. यांचा उद्देश एकच आहे, तो म्हणजे महाराष्ट्रात मोदी आणि शहा यांचे विरोधात मतदारात संभ्रम निर्माण करणे.त्यातून काँग्रेस पक्षाची मतपेटी मजबूत करणे. ही मंडळी 'निर्भय बनो' यातून मतदारांची दिशाभूल करत आहेत! मूर्ख बनवू पहात आहेत! हो! सरळ सांगा ना! काँग्रेसी बना! ताकाला जाऊन भांडे का लपविता! हे निर्भय बनो म्हणून! हे अभियान जर देश व राज्यातील राजकारण स्वच्छतेसाठी निष्पक्षपणे राबविले गेले असते ते योग्य ठरले असते! पण निर्भयवाल्यांनी इंडिया आघाडीचा 'अजेंडा' दत्तक घेतला आहे. त्यांचे राजकीय बळ घेवून हे अभियान राबवित आहेत. याला सामान्य माणसाचा फारसा प्रतिसाद मिळत नाही. ठाण्यात यांचे सभेला केवळ १२५ लोक उपस्थित होते,असे वृत्त होते! उंटाचा मुका घ्यायला! नांदेड येथे दि.३० सप्टेंबर २३ रोजी 'निर्भय बनो ची सभा झाली. यावेळी कायदेतज्ज्ञ असीम सरोदे व सामाजिक कार्यकर्ते हे प्रमुख वक्ते होते. मला त्यांचे विषयी आदर आहे. पण त्यांच्या राजकीय भूमिकेला विरोध आहे. या सभेचे अध्यक्षस्थानी नामवंत डॉक्टर सुरेश खुरसाळे होते. ते यांचे जाळ्यात फसले कसे काय फसले? याची चर्चा तेथे होती. निर्भयबनो हे एक स्वतंत्र व्यासपीठ आहे, असा दाखविण्याचा प्रयत्न केला. पण या सभेला काँग्रेस पक्ष प्रायोजक होते, यावरुन ते उघड होते! हे निर्भयवाले कोणाच्या इशाऱ्यावर नाचत आहेत! या सभेला काँग्रेस व इतर विरोधी पक्षाचे नेते कार्यकर्त्यांची संख्या अधिक होती! तेव्हा श्रोते हे ठेवणीतले होते! तेव्हा टाळ्याचा व लोकांचा प्रतिसाद मिळाला, असे म्हणावे लागेल! सभेत वक्त्यांनी भाषणे मोदी -शहा आणि भाजपा विरोधात एकांगी व व्देषमूलक टीका केली. मोदी व शहा यांचेमुळे लोकशाही धोक्यात आली ते हुकुमशहा आहेत! आदी आरोप केले! पण याचे उदाहरणे दिलेली नाहीत! म्हणे ! काँग्रेसने आणीबाणीबाबत माफी मागितली.त्यामुळे काँग्रेसचा काळा इतिहास पुसला जाणार नाही! काँग्रेस सरकारने घटनेतील ३५६ कलमाचा नव्वद वेळा गैरवापर केला व विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त केली. काँग्रेस नेत्यांनी ब्राह्मण हत्याकांड, शीख हत्याकांड, संत व शेतकरी आंदोलकावर गोळ्या झाडल्या! या काँग्रेसने पक्षाने पन्नास वर्ष देशावर राज्य केले! या पक्षाचे नेते हुकुमशाही पध्दतीने वागले आहेत! पक्षात एकाच कुटुंबाची एकाधिकारशाही होती. पक्षातील वरीष्ठ नेत्यांचे सुध्दा श्रेष्ठीच्या विरोधात बोलण्याचे धाडस नव्हते! काँग्रेसने अनेक घटनाबाह्य निर्णय, कायदे धाब्यावर बसविले आहेत. भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा दिला. मुस्लिम व हिंदू अशी भूमिका घेत निवडणूका जिंकल्या दंगले घडविले भावनिक आधारावर देशातील निवडणूका जिंकल्या आहेत. विरोधकांना आणि पत्रकारांना जेलमध्ये टाकले. आज इंडिया आघाडीत घराणेशाही पक्ष आहेत. यातील किती नेत्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत! महाराष्ट्रात काँग्रेसच्या किती मुख्यमंत्र्यांना भ्रष्टाचारावरुन राजीनामा द्यावा लागला! याची यादी मोठी आहे. या आघाडीचा देशात राजकीय अस्थिरता व अराजकता निर्माण करण्याचे मनसुबा आहे.अश्या नेत्यांच्या हातात पुन्हा देशाची सत्ता द्यावयाची काय ?महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार काय घडले. पत्रकारांना व निष्पाप तरूनांना टिप्पणी केली म्हणून जेलमध्ये टाकले गेले. संतांची क्रूरपणे हत्या केली गेली. मुंबईच्या व्यापाऱ्याचे अपहरण करून पोलिसांनी हत्या केली! हे सर्व कायदेशीर होते काय? त्यात जम्मू काश्मिरचे ३७० कलमप्रश्न गेला गेला! हे चलम देशाच्या हिताचे होते? त्यासाठी स्वंतत्र घटना कोणी लिहिली आणि का ?नंतर काश्मिर पंडितांची हत्या व तेथून हकलण्याचे पाप कोणी केले! तसेच मराठवाड्यात नामांतरच्या नावावर दलितांच्या झोपड्या जाळल्या तेव्हा राज्यात कोणाची सत्ता होती ? संसदेने ३७० रद्द केले आहे,त्याला बेकायदेशीर म्हटले जाते! तरीही हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात चालू आहे. त्यासाठी घटनापीठ आहे ना ? शहाबानो प्रकरणाबाबत पोटगी कायदा केला तो मात्र कायदेशीर आहे! काँग्रेस तर पक्षातील भ्रष्टाचारी नेत्याबाबत वक्तांनी निर्भयपणे बोलणे टाळले! ते केवळ सोयीचे बोलले ! इंडिया आघाडीने पत्रकारावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय हुकुमशाहीचा नाही काय?. मोदी सरकारने घटनेच्या विरोधात जाऊन कायदे व निर्णय घेतले याचे एकही उदाहरण वक्त्यांनी दिले नाहीत. आज जगात मोदी नेतृत्वाचा डंका वाजतोय! मोदीच्या कार्यकाळात देशाची आर्थिक प्रगती वेगाने होत आहे. विकासाच्या गती मिळाली आहे! गरीब व मध्यम वर्गीय शेतकरी, महिला छोटे व्यवसासिक आदी भेदभाव न करता सर्व घटकांसाठी विविध योजना व आर्थिक मदत दिली जात आहे! याचे कौतूक करू नका.पण मोदी व्देषातून देशाचे व गरिबांचे नुकसान तरी करून नये! देशात आज मोदी विरोधात वातावरण नाही. येत्या २०२४ च्या निवडणुकीत जनता कोणाचे बाजूने कौल देते, तेव्हा लक्षात येईलच!

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


## होय, मला शिक्षक व्हायचं

पण ती मला साध्य करता येईल की नाही, हे मला माहीत नाही.''
मी विचारलं, ''तुला यूनो, नॉर्वेचं पराराष्ट्र मंत्रालय, नॉर्वेतल्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय कंपन्या इथं मोठ्या जबाबदारीवर काम करण्याची इच्छा आहे का ?''
ती म्हणाली, ''बिलकूल नाही. माझी महत्त्वाकांक्षा खूप मोठी आहे. ती खूप प्रयत्न करूनही साध्य नाही झाली, तर मग परराष्ट्र मंत्रालय, यूनो, वगैरे इतर बाबींचा विचार करता येईल. मी पुन्हा विचारलं, ''तुझी एवढी मोठ्यात मोठी महत्त्वाकांक्षा आहे तरी काय, हे मला सांगू शकशील का ? ती म्हणाली, ''मला नॉर्वेतल्या एका ग्रामीण शाळेत शिक्षिका होण्याची महत्त्वाकांक्षा आहे; पण आमच्याकडं शिक्षिकेची नोकरी अतिशय प्रतिष्ठित समजली जाते. ती मिळवण्यासाठी सर्वांत हुशार विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रयत्न करतात. त्यामुळं प्रवेश मिळणं सोपं नाही. पण अशी इच्छा वा महत्त्वाकांक्षा असणारी ती विद्यार्थिनी अपवादात्मक नव्हती. युरोपमध्ये ऑक्सफर्ड, केंब्रिज, सोबोर्न, लुंड, उपसाला, हाइडलबर्ग या विद्यापीठांतल्या अनेक युवक व युवती शिक्षक अथवा अध्यापक होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतात.' आपल्या देशात अनेक तरुण बुद्धिमान युवक युवती आहेत. बरेचसे परदेशात जाऊन नोकरी करण्याची इच्छा बाळगतात.

आपल्या देशातही त्यांनी नोकरी करायची ठरवली, तरी त्यांचे ध्येय शिक्षक होण्याचे नसते. ते संशोधक, अधिकारी होण्याचे स्वप्न पाहतात. त्यांचे बरोबरच आहे. दोष त्यांचा नाही. त्यांना शिक्षक व्हावेसे वाटेल अशी परिस्थिती आपण निर्माण करू शकलो नाही हा आपला दोष आहे. काही मुले कौटुंबिक परिस्थिती अनुकूल नसतानाही आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर पुढे येतात. अशी मुले अपवादात्मक असतात. काही मुलांना चांगले पालक लाभतात. ते त्या मुलांच्या शिक्षणाकडे नीट लक्ष देतात, त्या मुलांना घडवतात. अशी मुले खरोखर सुदैवी म्हटली पाहिजेत. भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या आसपास आहे. अशा विशाल लोकसंख्येच्या देशाला दिशा द्यायची असेल, तर देशात उत्तम शिक्षक निर्माण झाले पाहिजेत. त्यासाठी केवळ अपवादात्मक किंवा सुदैवी विद्यार्थ्यांवर अवलंबून राहून चालणार नाही. वर दिलेल्या उदाहरणातील त्या नॉर्वेतील विद्यार्थिनीला जसे ग्रामीण भागात जाऊन शिक्षक व्हावेसे वाटते, तसे ज्या दिवशी आमच्या देशातील बुद्धिमान युवक युवतींना वाटायला लागेल, तो दिवस भारताच्या दृष्टीने सुदिन असेल. त्याचवेळी आपण डॉ कलाम यांचे उज्ज्वल भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार करू शकू.



## आनंदी पहाट



### आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

वेळेचे चांगले व्यवस्थापन आपल्या क्रियाकलापांचे नियोजन, रेकॉर्डिंग आणि प्रतिबिंबित करण्यावर अवलंबून असल्याने, आपण ते करण्यासाठी काही सर्वोत्कृष्ट साधनांचे स्पष्टीकरण देतो, ज्यात क्रियाकलाप लॉग, टू-डू लिस्ट आणि कृती कार्यक्रम यांचा समावेश असतो. आपल्याला काय करण्याची गरज आहे, हे कदाचित आपल्याला माहीत असते, पण ते कधी करावे ह्याचा अनेकदा आपल्याला विसर पडतो. आपण ठरविलेल्या अनेक गोष्टी आपण करतो पण आपले टाइमिंग चुकते आणि खरे म्हणजे टाइमिंग म्हणजेच सर्वकाही असते. आपण आपली कार्यक्षमता वाढवू शकतो, लोकांचा विश्वास मिळवू शकतो आणि आपल्या फायद्यासाठी वेळेच्या व्यवस्थापनासाठी अनेक पद्धती देखील वापरू शकतो. सर्वात यशस्वी टाइम मॅनेजर्सकडे लक्ष ठेवण्यासाठी स्पष्ट लक्ष्य असतात. ते नेहमीच स्मार्ट गोल विकसित करत असतात, ज्यामुळे त्यांना त्यांचा वेळ प्रभावीपणे वापरता येतो. आपल्या वेळेच्या व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करण्यासाठी स्पष्ट उद्दिष्यांचा वापर कसा करायचा, आपल्या स्वतःला प्रेरित आणि शिस्तबद्ध राहण्यास मदत करण्यासाठी अनेक संसाधने देखील उपयोगात आणता येऊ शकतात. सामान्य वेळ-व्यवस्थापन आव्हानांवर मात करण्याच्या दृष्टीने नेहमीच उपयुक्त ठरत असते. जेणेकरून आपण आपला दृष्टिकोन सुधारत राहतो आणि आपला वेळ पूर्णपणे वापरतो. व्यवस्थापनात चांगला वेळ असण्यामध्ये जाणीवपूर्वक नियोजन आणि विचारपूर्वक निर्णय घेणे महत्वाचे असते. यामध्ये आपल्या कामाकडे, ध्येयाकडे लक्ष केंद्रित करणे आणि बिनमहत्त्वाच्या गोष्टींच्या बाबतीत विचलित होण्याऐवजी आपल्या प्राधान्यकृत कार्यांवर चिकटून राहणे देखील आवश्यक असते. प्रभावी वेळ व्यवस्थापन नेत्यांना, उद्योजकांना आणि लहान व्यवसाय करणाऱ्यांना, मालकांना त्यांचे ध्येय साध्य करण्यात मदत करते.

## तृष्णा...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.18

तृष्णा म्हणजे तहान.. तहान लागली म्हणजे माणूस पाणी पितो. ही पाण्याची तहान माणसाला कधी लागते ??? जेवण झाल्यावर, उन्हात गेल्यावर, खूप काम केल्यावर, खेळून दमल्यावर, चालल्यानंतर ,खूप बोलल्यानंतर, गाणे गायल्यानंतर अशा कारणाने पाण्याची तहान लागते आणि ती सहज भागवली जाते.
पण ज्ञानाची तहान??? तिचं काय??? ज्ञानाची तहान सुद्धा माणसाला लागली पाहिजे. ती सुद्धा आपली गरज आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील माहिती आपण मिळवली पाहिजे. ज्ञानाची तहान कशी भागवता येईल ???? तर पुस्तके वाचा ,माहिती मिळवा, ऐका, पहा, प्रवास करा ,भेटी द्या, निरीक्षण करा. ज्ञानाची तहान भागवणारी ही माध्यमे आहेत. सगळ्यात सोपं म्हणजे पुस्तक वाचन आहे. घर बसल्या सगळ्या जगाची माहिती पुस्तकातून होते. ज्ञानाची तहान ही कधीच संपू नये, ती वाढत जावी. पाण्याची तहान भागवली तर आत्मा तृप्त होईल. पण ज्ञानाची तहान भागवली तर मन तृप्त होईल आणि मन तृप्त असणं खूप महत्त्वाचं आहे. आत्म्या पेक्षा मन सांभाळणे कठीण असतं. कडक उन्हाळ्यात ज्याप्रमाणे वाटसरूला तहान लागते आणि तो ढसाढसा पाणी पितो. त्याप्रमाणे ज्ञानाची तहान लागावी व भराभर पुस्तके वाचावी. माहिती मिळवावी. कष्टाची, ध्येयाची, प्रामाणिकपणाची, चांगल्या सवयींची मेहनतीची, खरेपणाची, सुखाची, दुःखाची, आनंदाची, उत्साह या साऱ्या गोष्टींची माणसाला तहान असावी. त्या मनापासून करण्याची जिद्द असावी. ज्ञानाची तहान न संपणारी असावी. ज्ञानाला कष्टाची झालर असावी. तहान लागेपर्यंत कष्ट केले ना तर मिळणारे ज्ञानामृत हे अमर असेल. ते कधीच बोथट होणार नाही...

## मूर्ख मंत्री गोष्ट

आधुनिक केसरी

**सम्राट अकबराकडे शहाण्या आणि हुशार मंत्र्यांची एक टीम होती ज्यांनी त्याला त्याच्या राज्याचा कारभार चालवण्यास मदत केली. तथापि, त्यांच्या मूर्खपणासाठी ओळखले जाणारे दोन मंत्री होते आणि सम्राटाने त्यांच्या क्षमतेची चाचणी घेण्याचे ठरविले. अकबराने दोन मंत्र्यांना आपल्यासमोर बोलावून सांगितले, "माझ्याकडे शंभर सोन्याची नाणी आहे. मी तुम्हा प्रत्येकाला पन्नास नाणी देईन. या पैशाचा उपयोग राज्याला जास्तीत जास्त फायदा होईल अशा प्रकारे करणे हे तुमचे काम आहे. एक महिना. तुमच्या कल्पना मांडा आणि सर्वोत्तम योजना असलेल्याला बक्षीस दिले जाईल."**
**आपल्या मूर्खपणासाठी ओळखल्या जाणाऱ्या पहिल्या मंत्र्याने पटकन एक योजना आखली. त्याने सर्व नाणी अन्न आणि करमणुकीवर खर्च करून संपूर्ण राज्यासाठी एक भव्य मेजवानी देण्याचा निर्णय घेतला. कार्यक्रमादरम्यान लोकांचा आनंद राज्याला लाभदायक ठरेल, असा त्यांचा विश्वास होता.**
**दुसऱ्या मंत्र्याने, जो आपल्या बुद्धीसाठी ओळखला जातो, त्याने आपली कल्पना मांडण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार केला. पूल बांधणे आणि रस्ते दुरुस्त करणे यासारख्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी त्यांनी नाणी वापरण्याचा प्रस्ताव दिला. त्यांनी स्पष्ट केले की वाहतुकीत सुधारणा केल्याने व्यापार वाढेल आणि दीर्घकालीन अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. एका महिन्यानंतर, मूर्ख मंत्र्याने आयोजित केलेल्या मेजवानीने लोकांना तात्पुरता आनंद दिला, परंतु राज्याला कायमस्वरूपी फायदा झाला नाही. दुसरीकडे दुसऱ्या मंत्र्याची पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक फलदायी ठरली. सुधारित दळणवळणामुळे केवळ व्यापारच सुकर झाला नाही तर प्रदेशांमधील दळणवळणही वाढले, ज्यामुळे संपूर्ण राज्यात समृद्धी वाढली. दुसऱ्या मंत्र्याच्या दूरदृष्टीने आणि शहाणपणाने प्रभावित होऊन अकबराने त्याला विजेता घोषित केले आणि त्यानुसार त्याला बक्षीस दिले. मूर्ख मंत्र्याला आपली चूक लक्षात आली, त्याने धोरणात्मक विचार आणि निर्णय घेण्याचा एक मौल्यवान धडा शिकला.**

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**हिमाचलसुतां शक्तिं दयानिधिं कृपानिधिम्| दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् ||१०६|| हिमाचलसुतेला, शक्तीला, दयानिधीला, कृपानिधीला, दुर्गा देवीला दारिद्र्यदुःखाचा नाश करण्यासाठी मी नमस्कार करतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**जन अधीन वन्दन करे, केहि विधि कीजे सेव । वार पार की गम नहीं, नमो नमो गुरुदेव ।।७५।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/७५**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**मी आपणांस शरणागत होऊन नमस्कार करीत आहे. आपली भक्ती कशा प्रकारे करू. आपल्या महिमेचा थांग लागत नाही. म्हणून हे सद्गुरु देव ! आपणांस वारंवार नमस्कार आहे ! नमस्कार आहे !!**

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## उकडीचा मोदक

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मी साधारण १५,१६ वर्षाची असेन तेव्हा आईच्या स्वयंपाक घरात नस्ती लुडबुड ठरलेली असे. कारण आलेल्या अतिथी अभ्यागतांना खाऊ घालणे हा तिचा जन्मसिद्ध हक्क होता. माझ्या माहेरचे कुलदैवत मोरगावचा मोरेश्वर त्यासाठी मला आठवतं दर चतुर्थीला आई दुपारी परत आंघोळ करायची व सोवळ्यात स्वयंपाक करून देवाला आरती व नैवेद्य असायचा. मोदकांचं आणि माझं हे असं बालपणापासून नातं आहे. मोदकांचं सारण भरून देण्याची सेवा लहानपणापासून अंगवळणी पडली. सतत घरात माणसांचा राबता असायचा त्यामुळे आमच्या देवाला एकवीस मोदक कधीच नको असायचे. बाप्पाने सांगितले होते प्रसाद सर्वांना भरभरून देत जा. लग्नानंतर पुण्यात आल्यावर तांदळाच्या उकडीच्या मोदक करण्याच्या खाण्याच्या आणि खाऊ घालण्याच्या प्रेमात पडले.

## शंका न ठेवता नाम घ्यावे

आधुनिक केसरी

नामस्मरण करायला सांगितले की सबबी सांगतात. पण खरोखर, नामस्मरण करण्याच्या आड काहीच येत नाही. काम करीत असताना सुद्धा उगाचच इतर विचार मनात येतातच ना ? मग तसेच नामस्मरण करायला कोणती अडचण आहे ? उगाच दुसरे विचार करण्यापेक्षा भगवंताचे नाम घ्यावे हे बरे नाही का ? वेळ सापडताच तो व्यर्थ न घालविता नामस्मरण करावे; श्रद्धा ठेवून करावे. दोन प्रवासी पायी जात होते. त्यांना भूक लागली. जाताना एक आंबराई लागली. त्यांनी मालकाला विचारले, 'आंबे घेऊ का ?' मालक म्हणाला, 'पंधरा मिनिटांत जितके आंबे खाता येतील तितके खा.' दोघांपैकी एक होता, तो मालकाजवळ चौकशी करू लागला; या शेताला पटटी किती, मालक कोण, वगैरे पुष्कळ विचारपूस करू लागला. दुसरा मात्र भराभर आंबे खाऊ लागला. इतक्यात पंधरा मिनिटे झाली. मालकाने सांगितले, 'वेळ संपली, आता तुम्ही जा.' एकाचे पोट भरले, दुसरा मात्र उपाशी राहिला. या गोष्टीवरून हे ध्यानात घ्यायचे की, नुसते प्रश्न



विचारण्यापेक्षा, श्रद्धा ठेवून नाम घेऊ लागावे. नामाचा अर्थ आपल्याला जरी कळला नाही, तरी तो भगवंताला कळतो. म्हणून नामाचे महत्त्व कळो वा न कळो, नाम घेत राहावे.

ध्रुवाने काय केले ? नारदवचनावर विश्वास ठेवून नामस्मरण प्रेमाने करू लागला. तो इतर विचारांच्या, शंका कुशंकांच्या नादी लागलाच नाही. 'एक तत्त्व नाम' हेच त्याने धरले, म्हणून त्याला नारायण प्रसन्न झाला. संत निःस्वार्थी असतात. ते तळमळीने सांगतात. त्यावर आपण श्रद्धा ठेवावी आणि नाम घ्यायला सुरूवात करावी आणि अखंड नामातच राहावे.
नाम किती दिवस घेत राहावे ? नाम सोडावेसे वाटत नाही तोपर्यंत ते घ्यावे. नामात रंगून जाईपर्यंत नाम घ्यावे. नामस्मरणात रंगला की नाम सुटणारच नाही. भगवंताचे नाम हेच श्रेष्ठ आहे. त्या नामात रंगेल तोच खरा. चरित्र विसरले तरी चालेल पण नाम विसरू नये, कारण नामात सर्व चरित्र साठविलेले आहे. ज्ञान, उपासना, कर्म वगैरे मार्ग आहेत, पण सर्वांत नामस्मरण हे सोपे साधन आहे. एक मोठा किल्ला होता. तो अभेद्य होता. मुंगीलाही आत प्रवेश होणे अशक्य असा तट होता. पण त्याला एक मोठा दरवाजा होता. त्याला एक मोठे कुलूप होते. एकाला त्याची किल्ली मिळाली; मग प्रवेश सुलभ झाला. तसे नाम ही किल्ली आहे. परमार्थ कितीही कठीण असला तरी नामाने तो सुसाध्य असतो. नामावर प्रेम आणि श्रद्धा बसत नाही अशी तक्रार करतात. संतवचनावर विश्वास ठेवून अखंड नाम घ्यावे, त्यानेच समाधान होईल.

## गहिनीनाथ



ते अघटित कृत्य पाहून त्याने गोरक्षाची वाहवा करून त्यास शाबासकी दिली आणि त्यास आलिंगन देऊन पोटाशी धरून म्हटले, बाळा गोरक्षा, तुझ्यासारखा परीस सोडून सोन्याला घेऊन काय करू ? अशा प्रकारच्या अनेक उपमा देऊन मच्छिंद्रनाथानें त्याची पुष्कळ वाखाणणी केली.गोरक्षानेंगुरूच्या बोलण्याचा तो झोंक पाहिला, तेव्हा आजपर्यंत सुवर्णाची वीट कोणत्या कारणास्तव जपून ठेविली होती ते मला सांगावे, असा त्यानें आग्रह धरिला. तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाला की, माझ्या मनात अशी इच्छा होती की, आपल्या देशी गेल्यावर साधुसंतांची पूजा करून एक मोठी समाराधना घालावी. ते ऐकून तुमचा हा हेतु मी पुरवितो, म्हणून गोरक्षाने त्यास सांगितले. मग गोरक्षाने गंधर्वास्त्रमंत्र म्हणून भस्माची एक चिमटी स्वर्गाकडे फेकली; त्याबरोबर चित्रसेन गंधर्व येऊन नाथास वंदन करून काय आज्ञा आहे म्हणून विचारू लागला. तेव्हा गोरक्षाने सांगितले की, आणखी काही गंधर्वांस बोलाव आणि त्यांना चौफेर पाठवून बैरागी, संन्यासी, जपी, तपी, संतसाधु, देव, गंधर्व, दानव किन्नर या सर्वांस येथे आणावे.

रविवार, ८ ऑक्टोबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ६६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 8 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-66 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-5



चाहूल नवरात्रोत्सवाची, मूर्ती घडतेय दुर्गादेवीची- गणेशोत्सव संपन्न झाला आणि देवीच्या नवरात्रोत्सवाची चाहूल लागताच कुंभारवाड्यातून मूर्ती साकारण्याची लगबग सुरू झाली. जेजुरीच्या प्रसिद्ध महिला मूर्तिकार नीलम तुषार कुंभार यांनी ही मूर्ती साकारली असून रंगाचा साज तयार करतानाची त्यांची लगबग सुरू असतानाचे दृश्य. (छाया : विजयकुमार हरिश्चंद्रे)

## भारत ऑस्ट्रेलियात क्रिकेट सामना रंगणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** रविवारी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये महामुकाबला रंगणार आहे. चेन्नईच्या मैदानावर दोन्ही संघामध्ये आमनासामना होणार आहे. रविवारी दुपारी दोन वाजता लढतीला सुरुवात होणार आहे. त्याआधी नाणेफेक होईल. विश्वचषक विजयाच्या दावेदार असणाऱ्या दोन संघातील लढतीकडे सर्व क्रीडा चाहत्यांच्या नजरा खिळल्या आहेत. हा सामना सर्वांना मोफत पाहता येणार आहे. भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात होणारा सामना चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियममध्ये होणार आहे. भारतीय वेळेनुसार, दुपारी दोन वाजता सामन्याला सुरुवात होईल. त्याआधी अर्धातास नाणेफेक होईल. टिव्हीवर स्टार स्पोर्ट्स चॅनलवर सामना पाहता येईल. स्टार स्पोर्ट्स 1, स्टार स्पोर्ट्स एचडी, स्टार स्पोर्ट्स हिंदी सह इतर भाषांमध्येही सामन्याचा आनंद घेता येईल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये होणारा शानदार सामना मोबाईलवरही लाईव्ह पाहता येईल. डिज्नी प्लस हॉटस्टार ॲपवर हा सामना मोफत पाहता येईल. त्यासाठी कोणतेही सब्सक्रिप्शन चार्ज लागणार नाही. फ्रीमध्ये या सामन्याचा आनंद घेता येईल. त्याशिवाय एबीपी माझाच्या संकेतस्थळावर सामन्यासंदर्भात सर्व माहिती वाचता येईल.

## इस्त्रायलने केली युद्धाची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** एकीकडे रशिया-युक्रेन युद्धाच्या परिणामांमधून या दोन्ही देशांसह इतर अनेक देश अद्याप सावरू शकले नसताना पुन्हा एकदा जगाला आणखी एका युद्धाचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. इस्त्रायलनं पॅलेस्टाईनमधील हमास दहशतवाद्यांच्या हल्ल्यानंतर युद्धाची घोषणा केली आहे. त्यामुळे गाझा पट्टी व आसपासच्या भागात या युद्धाचे तीव्र परिणाम दिसण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून इस्त्रायलच्या भूमीवर हमासच्या दहशतवाद्यांकडून कारवाया केल्या जात असल्याचे दावे केले जात होते. हे दहशतवादी मोठ्या कारवाईच्या तयारीत असल्याचंही बोललं जात होतं. शनिवारी सकाळी इस्त्रायलच्या भूमीवर गाझा पट्ट्यातून किमान डझनभर रॉकेट लाँच करण्यात आले. त्यापाठोपाठ मोठ्या प्रमाणावर गाझा पट्टीतून हमासच्या दहशतवाद्यांनी घुसखोरी केल्यानंतर इस्त्रायलने युद्धाची घोषणा केली. गाझा पट्ट्यातून मोठ्या प्रमाणावर रॉकेट डागले जाण्याची शक्यता लक्षात घेता इस्त्रायल सरकारने आपल्या नागरिकांना घरातच राहण्याचे निर्देश दिले आहेत. मोठ्या संख्येने दहशतवादी इस्त्रायलच्या भूमीत शिरले आहेत. इस्त्रायलकडूनही या हल्ल्यांना तोडीस तोड प्रत्युत्तर दिले जात असून गाझा पट्टीत हवाई हल्ले करण्यात येत आहेत, अशी माहिती इस्त्रायल लष्कराकडून देण्यात आले आहेत. एक्सवर(ट्विटर) काही युजर्सने यासंदर्भातले व्हिडीओ पोस्ट केले असून हे इस्त्रायलवर गाझा पट्टीतून डागण्यात आलेल्या रॉकेट्सचे व्हिडीओ असल्याचे सांगितलं जात आहे.

# जितेंद्र आव्हाड ढसाढसा रडले

## अजित पवार गटाकडून करण्यात आलेल्या युक्तिवादाने व्यथित

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा? या मुद्द्यावरुन केंद्रीय निवडणूक आयोगात काल पहिली प्रत्यक्ष सुनावणी पार पडली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाकडून पक्षावर दावा सांगण्यात आला. यावेळी अजित पवार गटाच्या वकिलांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर गंभीर आरोप केले. शरद पवार पक्षात मनमानी करतात. ते परस्पर स्वाक्षरी करुन पक्षात पदाधिकाऱ्यांच्या नेमणूका करतात. पक्षात निवडणुका घेऊन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती व्हायला हवी. पण पक्षात पक्षांतर्गत निवडणूका झाल्या नाहीत, असा युक्तिवाद अजित पवार गटाने केला.



अजित पवार गटाकडून यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या नियुक्तीवर आक्षेप नोंदवण्यात आला. राष्ट्रीय कार्यकारिणीच्या आधी त्यांची नियुक्ती झाली, असा दावा अजित पवार गटाकडून करण्यात आला. याशिवाय आमच्याकडे बहुमत आहे, आमच्याकडे सर्वाधिक लोकप्रतिनिधी आहेत. त्यामुळे पक्षावर आमचाच दावा आहे, असा युक्तिवाद अजित पवार गटाकडून करण्यात आला. यासाठी अजित पवार गटाने शिवसेनेच्या निकालाचा दाखला दिला. कालच्या या सुनावणीला शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड देखीव उपस्थित होते. जितेंद्र आव्हाड यांनी कालच्या सुनावणीवर भूमिका मांडण्यासाठी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना अक्षरशः रडू कोसळलं. ते भर पत्रकार परिषदेत भावून झालेले आणि रडताना बघायला मिळाले. त्यांना अश्रू अनावर झाले होते.

अजित पवार गटाकडून शरद पवार यांच्यावर निवडणूक आयोगात करण्यात आलेल्या युक्तिवादाने जितेंद्र आव्हाड व्यथित झाले आहेत.काल निवडणुक आयोगात माझ्या डोळ्यात अश्रू आले. शरद पवार हे संस्थानिकासारखे पक्ष चालवायचे, ते लोकशाही पद्धतीने वागले नाहीत. त्यांनी हुकूमशाह असे विधान केल्याने मी व्यथित झालो. कालपर्यंत जे विठ्ठल बोलत होते ते हुकुमशाह बोलू लागले, असे बोलत असताना जितेंद्र आव्हाड भावूक झाले. मला त्या वकिलाचे बोलणे ऐकून वाटले की, आपण कशासाठी लढतोय? कुठली नीती, कुठली मुल्य? घरात बसल्यानंतर तुम्हाला फोन येणार की तुम्हाला मंत्री केले, जा शपथविधी करा, त्यांच्या या सगळ्या भावनिक स्वातंत्र्याच्या त्यांना काय फळ मिळालं? तर ते हुकूमशाह आहेत? मला महाराष्ट्रातील एका व्यक्तीने हे सांगावे की शरद पवार हुकूमशाह सारखे वागतात. त्यांनी पक्षात लोकशाही ठेवली नाही, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले. एवढेच होते तर तुम्ही शरद पवार यांना सोडून जायचं होते आणि सांगायचे होतं की, साहेब तुम्ही लोकशाहीवादी नाही आहात. आम्हाला तुमच्या पक्षात राहायचे नाही. आम्ही स्वतंत्र पक्ष काढतो, आणि स्वतंत्र चालतो. त्यांच्या हातातून पक्ष घेण्याचा प्रयत्न करत आहात. तोपर्यंत ठीक आहे. समजू शकतो राजकारण आहे. पण काल वकिलांमार्फत जे बोलण्यात आले ते सहन न होणार होते. इतके असंवेदशील होणे हे ज्यांनी त्यांच्याकडून सर्व घेतले त्यांना शोभत नाही, असे आव्हाड म्हणाले.

## छत्तीसगडमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात १८९५ कोटी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमधील भूपेश बघेल यांच्या सरकारने नुकतेच 'राजीव गांधी किसान न्याय योजने' अंतर्गत तब्बल २४ लाख ५२ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये एकूण १ हजार ८९५ कोटी रुपये हस्तांतरीत केले. या योजनेअंतर्गत पैसे हस्तांतर करण्याचा हा तिसरा टप्पा आहे. मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी २८ सप्टेंबर रोजी बलौदाबाजार-भाटापारा जिल्ह्याच्या सुमाभाटा गावात आयोजित 'कृषक-सह-श्रमिक संमेलन' मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमात या निधीचे वाटप करण्यात आले. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे व त्यातून त्यांच्या उत्पन्नातही वाढ व्हावी या हेतूने छत्तीसगड सरकारने 'राजीव गांधी कृषी न्याय योजने'ची सुरुवात केली. या योजनेच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये ५ हजार ७५० कोटी रुपये वर्ग करण्याचे लक्ष्य छत्तीसगड सरकारने ठेवले आहे. देशाचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने २१ मे २०२० रोजी या योजनेची छत्तीसगडमध्ये सुरुवात झाली. राजीव गांधी कृषी न्याय योजनेच्या माध्यमातून चार टप्प्यांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये ५ हजार ७५० कोटी रुपये वर्ग करण्याचे नियोजन आहे. पहिल्या हप्त्याच्या स्वरूपात १५०० कोटी रुपये हे योजना सुरू झाली त्याच दिवशी अर्थात २१ मे रोजी शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात आले होते. योजनेच्या प्रारंभीच्या काळात धान्य, मका आणि ऊस अशा पिकांचा समावेश होता. २०२०-२१ वर्षात दुबार व तिबार पिकांचाही समावेश योजनेत करण्यात आला. या योजनेचा दुसरा हप्ता राज्य सरकारकडून २० ऑगस्ट २०२१ रोजी चुकवण्यात आला. यात राज्यातील २१ लाख शेतकऱ्यांना १५२२ कोटी रुपये खात्यात ट्रान्सफर करण्यात आले होते.

**वनोद्योगांनाही सरकारकडून प्रोत्साहन :** छत्तीसगड हे राज्य तसे छोट्या वनोद्योगांचे केंद्र मानले जाते. राज्यात जवळपास २० हजार गावे आहेत. त्यात पाच हजार गावे अशी आहेत जी वनक्षेत्रापासून पाच किलोमीटरच्या परिघात आहेत. या पाच हजार गावांची अर्थव्यवस्था प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात वनोद्योग व वनोत्पादनांवरच अवलंबून आहे. हे लक्षात घेता सरकारने आपल्या नियोजनात वनोत्पादनांची संख्या वाढवली आहे.
आधी राज्य सरकार सात प्रकारच्या वनोत्पादनांची किमान आधारभूत किमतीवर खरेदी करत होतं. सध्या छत्तीसगडमध्ये ६७ प्रकारची वनोत्पादनं राज्य सरकारकडून किमान आधारभूत किमतीवर खरेदी केली जातात. यातली ३९ उत्पादनं केंद्र सरकारच्या आधारभूत किमतीवर तर २८ उत्पादनं राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या किमान आधारभूत किमतीवर खरेदी केली जातात.




# विवेकजागर



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**माहिती, ज्ञान, प्रज्ञा आणि शेवटी विवेक अशा प्रकारची रचनात्मक व्यवस्था आपणास लावावी लागेल. सेन्सपासून इनसेन्स पर्यंतचा हा प्रवास म्हणजे मानवी प्रयत्नाचा, ज्ञानात्मक आणि भावनात्मक वृद्धीचा आणि एकूणच मानवी कल्याणाचा केलेला सारासार विचार होय. विवेकात संतुलित विचार अनुस्यूत आहे. अनेकदा आपण बुद्धिवादाला किंवा वैज्ञानिक दृष्टिकोनाला विवेकवाद म्हणतो, परंतु ज्या रीतीने आनंदाला विरुद्धार्थी शब्द नाही तद्वतच विवेकाला देखील विरुद्धार्थी शब्द लागू होत नाही. काही मंडळी विवेकाच्या विरोधी अनुभव या शब्दाचा प्रयोग सामाजिक नीतिनियम आणि व्यवहार यात काही प्रमाणात तफावत आढळते. असे होण्याचे अनेक कारणे आहेत.**



## क्षितिजापल्याड

करतात, परंतु तो योग्य नव्हे. अशा विवेकाचा जागर समाजात कसा करायचा हे पाहणे उद्बोधक ठरेल. ही तफावत कमीत कमी असावी जेणेकरून व्यक्ती आणि समाजाचा नैतिक स्तर व्यवहार्य पातळीवरून शोधता येईल. पाश्चात्य राष्ट्रांमध्ये या प्रकारच्या प्रयत्नांची सुरुवात आपणास अगदी सॉक्रेटिस पासून दाखविता येईल. मागील तीन चार दशकांपासून औद्योगिक क्रांतीच्या नंतर खऱ्या अर्थाने विवेकवादी विचारसरणी अभ्यासकांचे लक्ष वेधून घेणारे ठरले. याचे कारण जसे मानवी बुद्धीला केलेल्या आवाहनात आहे तसेच सामाजिक उच्च नीच स्तरीकरणात देखील दडलेले आहे. भारतीय वेदांत शास्त्राच्या माध्यमातून विवेक वादाची पेरणी आपल्याकडे झाल्याचे दिसून येते, परंतु पुराणातली वांगी पुराणात या उक्तीप्रमाणे विवेकाचा हा स्वर व्यावहारिक कोलाहलात कोमेजून गेला आणि आपल्याकडे विवेक नावाची गोष्ट नव्हती असे म्हणण्यापर्यंत नव अभ्यासकांची मजल गेली. त्याचे प्रमुख कारण म्हणजे आपण भारतीय प्राच्यविद्येकडे केलेले दुर्लक्ष होय. युरोपमध्ये लोकशाही आणि समाजवादाच्या अनुषंगाने जी काही क्रांती, प्रतिक्रांती आणि लढे उभारले गेले, सामंतशाही आणि जमीनदारी याच्या विरोधात सामान्य जनतेने रणसिंग फुंकले ते नंतर साम्राज्यवाद आणि भांडवलशाहीमध्ये अडकले याचे प्रमुख कारण म्हणजे आधुनिक युरोपीय जनतेने ज्ञानात्मक वृद्धीसाठी केवळ आधुनिक विचारसरणी अंगीकारणे आणि भौतिक सुख सुविधेच्या आहारी जाणे हे विवेक वादाच्या आड येणारी गोष्ट ठरली. साम्राज्यशाहीचा विस्तार आणि त्याचे इष्ट अनिष्ट परिणाम जागतिक पटलावर दिसू लागल्यानंतर स्थानिक मंडळीकडून त्यास जो विरोध झाला या विरोधाचा परिपाक म्हणजे लोकशाहीची प्रतिष्ठापना होय. खऱ्या अर्थाने लोकशाही ही विवेकवादाच्या पायाभरणीची आणि सार्वत्रिक प्रसाराची काळजी घेणारी व्यवस्था म्हणावी लागेल. त्याचे कारण असे की लोकशाहीमध्ये केवळ राज्य यंत्रणा कशी नियंत्रित करावी एवढाच भाग नसून देशांतर्गत जनतेचे सामाजिक नियमन देखील अंतर्भूत असते. या सामाजिक नियमांमध्ये समाजातील उच्चनीचता भेदाभेद आणि सामाजिक स्तरीकरण कमी करून सर्वांना समन्यायी व्यवस्था प्रदान करण्याचे वचन लोकशाही देते. ही वचनपूर्ती म्हणजे एक प्रकारचा विवेक जागर होय. समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा आणि दैववाद यास तिलांजली देऊन त्या जागी पर्यायी व्यवस्था देण्याचे कार्य समाजातील विवेकवादी मंडळी कडून होणे अपेक्षित आहे.

विवेकवाद आपणास केवळ वैज्ञानिक दृष्टिकोनच प्रदान करत नाही तर विश्वोत्पतीपासून ते व्यावहारिक नियमांपर्यंत जे समाजहिताचे इष्ट आणि प्रगतिशील आहे त्याचे समालोचन विवेकवादाच्या अंतर्गत होत असते. मानवी संस्कृती आणि सभ्यतांचा विकास होत असताना सर्वच चांगल्या गोष्टींचा विकास होतो असे नाही तर त्यासोबत समाज धारणेसाठी अनिष्ट असणारे काही घटक त्यासोबत विकसित होत असतात समाजासाठी अहितकारक असणाऱ्या आणि मानवी समाजाला हानी पोहोचवणाऱ्या या घटकांना दूर सारून सामाजिक मूल्यभान रुजवण्याच्या दृष्टीने वेळोवेळी आणि ठिकठिकाणी विवेक जागर प्रयत्नपूर्वक घडवून आणला पाहिजे. तरच हा समाज, ही सभ्यता आणि संस्कृती उन्नत होईल. अन्यथा प्रतिगामी शक्ती डोके वर काढून समाजाचा प्रवाह उलट वळवण्यास उतावीळच असतात. हे होऊ द्यायचे नसेल तर प्रयत्नपूर्वक काही गोष्टी होणे अपेक्षित आहेत. समाजात अनेक प्रकारचे आज प्रश्न उभे आहेत. भेदाभेद



तर आहेच. याच सोबतीला परस्पर अविश्वास, असूया, हिंसा कृतघ्नता याही गोष्टी आहेत. हे सर्व दूर करायचे असेल तर आपणास जनतेमध्ये जाऊन केवळ माहितीचा भडीमार करण्याने हे प्रश्न मिटणारे नाहीत. तर प्रज्ञा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करून विवेकाच्या पातळीवर समाज कसा पोहोचेल यासाठी देखील झगडावे लागणार आहे. हा सर्व कृती कार्यक्रम करत असताना विवेकवादी मंडळींना केवळ टोकाची भूमिका घेऊन चालणार नाही तर ज्या पद्धतीने कडू औषध वेष्टनात गुंडाळून दिले जाते, त्या पद्धतीने प्रबोधनाच्या माध्यमातूनच आपणास हे घडवून आणता येईल. ज्या प्रबोधन युगाची सुरुवात युरोपात औद्योगिक क्रांतीनंतर झाली ती चळवळ आपल्याकडील संत मंडळींनी केली. पाश्चात्य आणि भारतीय प्रबोधनकारांच्या वैचारिक बांधणीतून एका नव्या समाजाची निर्मिती करण्याचे स्वप्न आपण पाहत असताना सत्याचा सातत्याने शोध घेत राहणे हे विवेक जागरसाठी आवश्यक आहे. विवेकवादाचा हा लढा खरेतर इतरांविरुद्ध नसून तो एक आत्मशोध होय. या दृष्टीने महात्मा गांधी यांनी लोकसत्ता, समाजसत्ता आणि आत्मसत्ता या दृष्टीने केलेली मांडणी आणि त्यातून अहिंसक प्रकारचा लढा उभारण्याच्या दृष्टीने केलेले दिग्दर्शन विवेकजागरसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रबोधनाच्या माध्यमातून अहर्निश समाजमनाची मशागत करून विवेकाचे रोपटे लावले पाहिजे आणि संवर्धन केले पाहिजे. खरेतर आजच्या आधुनिक काळात या प्रयत्नांची खूप गरज आहे. आपण केवळ आधुनिक नाही तर चंगळवादी झालो आहोत. हा चंगळवादाचा विळखा कोणत्या श्रद्धा, अंधश्रद्धा या पद्धतीने सुटणार नसून त्यास विवेकी विचारच महत्त्वाचे ठरणार आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात वाढून निसर्गाच्या नियमांचे पालन होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करून विवेकाचा जागर घडवून आणल्यास आपले मन, बुद्धी आणि एकूण मानव्यता परिपुष्ट होईल.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि कोलमडणारी लोकशाही



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**कोणत्याही देशातील लोकशाहीची विश्वासार्हता त्या देशातील विधिमंडळावर अधिक अवलंबून असते. नेत्याचे गुण, अवगुण आणि चारित्र्य लोकशाहीला अधिक प्रभावित करत असते. स्वातंत्र्यानंतर भारतीय विधिमंडळ आणि त्यांच्या नेत्यांची जनतेप्रती असलेली निष्ठा आणि जबाबदारीचे कौतुक केले जात होते, परंतु आता तेच कायदेमंडळ गुन्हेगारी कृत्यांनी कलंकित झाली आहे. राजकारणात गुन्हेगारी घटकांचे वर्चस्व आहे आणि संसदेपासून ते विधानसभेपर्यंत सर्व काही गुन्हेगार आणि कलंकित नेत्यांनी भरलेले आहे. अशा परिस्थितीत प्रामाणिक लोकशाहीची कल्पना कशी करता येईल?**

म्हणजे प्रत्येक दहा आमदारांपैकी ९ आमदार कोट्यधीश आहेत. भारतीय लोकशाहीची ही एक नवीन शैली आणि नवीन रूप आहे. मात्र गुन्ह्यांचे राजकारणीकरण केवळ यूपीपुरते मर्यादित नाही. कमी-अधिक प्रमाणात प्रत्येक राज्यात आणि प्रत्येक विधानसभेत हीच परिस्थिती आहे. मध्य प्रदेशच्या सध्याच्या विधानसभेत ४१ टक्के आमदार कलंकित आहेत, तर महाराष्ट्राच्या २८८ सदस्यांच्या विधानसभेत १७६ कलंकित आमदार आणि २६४ कोट्यधीश आहेत. गुजरातमधील १८२ आमदारांपैक ४७ कलंकित आणि १४१ कोट्यधीश आहेत. पंजाबमधील ११७ आमदारांपैकी ५८ विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यापैकी २७ आमदारांवर गंभीर आरोप आहेत. यावेळी ७७ करोडपती आमदार सभागृहात पोहोचले आहेत. बिहारमधील २२४३ आमदारांपैकी १३६ आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत आणि त्यापैकी २७ जणांवर गंभीर कलमे आहेत. हरियाणा, ओडिशा, कर्नाटक, झारखंड, पश्चिम बंगाल, गोवा आणि पुद्दुचेरी आणि उत्तराखंडसह इतर विधानसभांचीही तीच अवस्था आहे, जिथे एकापेक्षा जास्त कलंकित नेते लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहात बसले आहेत. १९ ९० च्या दशकात राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावर देशात बरीच चर्चा झाली होती. माजी लोकसभा अध्यक्ष रवी राय यांनी १९९३ मध्ये स्थापन केलेल्या बोहरा समितीचा अहवाल सादर करण्याबाबत बोलले होते, जेणेकरून राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे सत्य समोर यावे. पण कोणत्याही पक्षाने ते मान्य केले नाही. त्यामागील कारण म्हणजे बोहरा समितीचा अहवाल उघड झाल्यास सरकार पडेल, असे तत्कालीन गृहमंत्र्यांना वाटत होते. राजकारणातील वाढती गुन्हेगारी आणि गुन्हेगारांची राजकारणाशी असलेली जुगलबंदी यामुळेच प्रत्यक्षात बोहरा समितीची स्थापना झाली. पण या समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर आणला गेला जेव्हा नयना साहनी घटना देशात घडली आणि राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावर गदारोळ सुरू झाला. पण त्या अहवालावर कधीही चर्चा झाली नाही. अहवाल अर्धा अपूर्ण असल्याचे सांगण्यात आले. काही राजकारणी माफिया टोळ्या आणि खाजगी सैन्याचे नेते बनले आहेत आणि वर्षानुवर्षे निवडणुका जिंकत आहेत, असे या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मालमत्तेला व सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मात्र यावर पुढे कोणतीही चर्चा झाली नाही. खरे तर राजकीय पक्षांमध्ये गुन्हेगारी तत्वांची घुसखोरी ही सर्वप्रथम बूथ लुटीच्या प्रक्रियेतून सुरू झाली. पूर्वी नेत्यांचे अंगरक्षक असलेले गुन्हेगार आता निवडणुकीत घुसू लागले आहेत. पहिल्या तीन सार्वत्रिक निवडणुकांमध्ये खून आणि बूथ कॅप्चरिंगच्या घटना नगण्य होत्या, परंतु १९६२ च्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत बिहारमधील १२ मतदान केंद्रांवर आणि आसाम, हरियाणा, आंध्र, मध्य प्रदेश आणि एक-दोन मतदान केंद्रांवर फेरनिवडणुका झाल्या. बंगाल. मात्र कोणतीही हिंसक घटना घडली नाही. मात्र गोंधळामुळे या भागात पुन्हा निवडणुका घ्याव्या लागल्या. पण १९७१ नंतर हा ट्रेंड वाढतच गेला. गुंड टोळ्यांकडून निवडणूक प्रक्रियेत ढवळाढवळ करण्याची प्रवृत्ती १९७१ च्या पाचव्या सार्वत्रिक निवडणुकीत दिसून आली. बिहारमध्ये आठ प्रकरणे नोंदवली गेली. हरियाणात बूथ लुटल्याची घटना समोर आली . बिहारमधील गुंड टोळ्यांनी तेव्हा अनेक मतपेट्या लुटल्या होत्या. प बंगालमध्ये देखील.संसद विधानसभा व स्थानिक निवडणुकांमध्ये बूथ कॅपरिंग व मतपेट्या पळविण्याचा सर्रास प्रकार.मागे झालेल्या निवडणुकांत दिसून आला.

खरे तर लोकशाहीच्या अंताची कहाणी १९७७ च्या .

निवडणुकांपासूनसुरू झाली येथूनच सुरू झाली.१९७७ च्या निवडणुकीत बूथ लुटीच्या अनेक घटना समोर आल्या होत्या बिहारमधील एक चतुर्थांश मतदान केंद्रांना याचा फटका बसला. दक्षिण भारततही हीच गोष्ट पाहायला मिळाली. आणि १९७९पासून गुन्हेगार राजकारणात येऊ लागले. आणि आजची परिस्थिती अशी आहे की,सभागृहात आता किती सदस्य आहेत, जे दोषमुक्त आहेत, अशी चर्चा सुरू आहे. लोकशाही कलंकित होताना पाहून नेत्यांना काळजी वाटली नाही, असे नाही. न्यायालय आणि निवडणूक आयोग या दोघांचाही संबंध होता. परंतु सर्व चिंता आणि केलेले प्रयत्न काहीही सिद्ध झाले नाहीत. या मालिकेत २ मे २००२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व नागरिकांना घटनेच्या कलम १९-१अ अन्वये राज्यघटनेने दिलेले अधिकार स्पष्ट करताना लोकशाहीच्या अस्तित्वासाठी मतदारांनी मतदान करणे आवश्यक आहे, असा निर्णय दिला होता. संसद किंवा विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांचा इतिहास जाणून घ्या. जाणून घेण्याचा अधिकार आहे. पण काही झाले नाही. यावर सर्वच पक्ष पुढाकार घेण्यापासून दूर पळत राहिले.त्यानंतर लोकप्रतिनिधी कायद्यातही सुधारणा करण्यात आल्या. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम ८ अन्वये, काही गुन्ह्यांसाठी दोषी ठरलेल्या व्यक्तीला ठराविक कालावधीसाठी संसद किंवा विधानसभेच्या सदस्यत्वासाठी अपात्र मानले जाते. पण काही बाबी वगळता सर्व काही जसेच्या तसे चालू राहिले. गुन्ह्याची खातरजमा होऊ नये, शिक्षा होऊ नये म्हणून न्यायालयीन सुनावणी पुढे ढकलण्याचा खेळ नेत्यांनी सुरू केला. यानंतर, न्यायमूर्ती एचआर खन्ना, नानी पालखीवाला आणि न्यायमूर्ती लॅटिन यांचा समावेश असलेल्या समितीने शिफारस केली होती की, कोणत्याही गुन्हेगारी प्रकरणात दोषी आढळलेल्या किंवा फौजदारी न्यायालयाने ज्यांच्यावर आरोप निश्चित केले आहेत अशा व्यक्तीला निवडणूक लढवण्याची परवानगी देऊ नये. मात्र नेत्यांच्या इच्छेप्रमाणे सर्व काही सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये भाजप, काँग्रेस, जेडीयू, आरजेडी, सीपीआय आणि एलजेपी यांना प्रत्येकी १ लाख रुपयांचा दंड ठोठावला होता. गेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल सीपीएम आणि राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. त्यावेळी, न्यायालयाने आदेश दिले होते की उमेदवारांनी निवडणूक लढवण्यासाठी पक्षांनी निवडल्यापासून ४८ तासांच्या आत किंवा अर्ज भरण्याच्या किमान दोन आठवड्यांपूर्वी पक्षाच्या वेबसाइटवर त्यांच्याविरुद्ध म्हणजे प्रत्येक दहा आमदारांपैकी ९ आमदार कोट्यधीश आहेत. भारतीय लोकशाहीची ही एक नवीन शैली आणि नवीन रूप आहे. मात्र गुन्ह्यांचे राजकारणीकरण केवळ यूपीपुरते मर्यादित नाही. कमी-अधिक प्रमाणात प्रत्येक राज्यात आणि प्रत्येक विधानसभेत हीच परिस्थिती आहे. मध्य प्रदेशच्या सध्याच्या विधानसभेत ४१ टक्के आमदार कलंकित आहेत, तर महाराष्ट्राच्या २८८ सदस्यांच्या विधानसभेत १७६ कलंकित आमदार आणि २६४ कोट्यधीश आहेत. गुजरातमधील १८२ आमदारांपैक ४७ कलंकित आणि १४१ कोट्यधीश आहेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# राजपूत समाजाच्या उपोषणाला गुलाबराव पाटील यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येथे उपोषणाला आज सहावा दिवस उजाडला आहे याप्रसंगी आज दि.७/१०/२३ रोजी जळगाव येथे राजपूत समाज बांधवांनी मोटार सायकल रॅली काढून निषेध नोंदवला असून धरणगाव तालुक्यातील राजपूत समाज बांधवांनी पालकमंत्री नामदार गुलाबराव पाटील यांची भेट घेतली व जळगावला राजपूत समाजाचे सुरू असलेले उपोषण आणि अडचणी यासंदर्भात सविस्तर चर्चा केली. या चर्चेत दूरध्वनीवर माननीय आमदार किशोर आप्पा पाटील व प्राध्यापक सजनसिंग पवार हेही सहभागी झाले. नामदार गुलाबराव पाटील यांनी याप्रसंगी सांगितले की मला हा संपूर्ण विषय माहीत असून शासन या संदर्भात पॉझिटिव्ह आहे. आज शनिवार दुपारी दोन वाजता पालकमंत्री गुलाबराव पाटील व आमदार किशोर आप्पा पाटील हे जळगाव येथे राजपूत समाज बांधवांची उपोषण स्थळी भेट घेऊन त्यांच्या मागण्या समजून घेतल्या असून समाजाच्या मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या भेटी प्रसंगी धरणगाव तालुक्यातील जीवनसिंह बायस रमेश पाटील, डी एस पाटील सर, धिरेंद्र सिंग पूर्भे,हरिभाऊ पाटील, अनिल पाटील, सोपान पाटील, विकास पाटील,अमोल पाटील, नारायण पाटील सर, त्रिलोकसिंग पाटील, यांचे सह समाज बांधव उपस्थित होते, अशी माहिती महेंद्रसिगं पाटील दहिगांव संत यांनी उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले.

# अहिल्यादेवी होळकर सामाजिक सभागृहाचे, गावठाण फिडरचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** वडोद बाजार प्रतिनिधी फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या खासदार निधीतून अहिल्यादेवी होळकर सामाजिक सभागृह उभारले जाणार असून सभागृहासाठी खासदार निधीतून पंधरा लक्ष रुपयाचा निधी देण्यात आला आहे

उपसरपंच गोपाळ वाघ यांनी गावातील नागरिकांसाठी सामाजिक कार्यक्रमासाठी एक मंगल कार्यालयाची खासदार रावसाहेब दानवे यांच्याकडे पाठपुरावा करून 15 लक्ष रुपयांचा निधी मिळून आणला खासदार रावसाहेब दानवे यांच्या निधीतून हे सभागृह उभारले जाणार आहे तर गावात थ्री फेज लाईन साठी फिडर फिडर बसवण्यात येणार आहे या फिडरचे व सामाजिक सभागृहाचे उद्घाटन आज करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी भाजपाचे तालुकाध्यक्ष सांडू अण्णा जाधव जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शिवाजी पात्रीकर बाजार समितीचे संचालक सर्जेराव मेटे अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा अध्यक्ष इलियास शहा उपसरपंच गोपाळ वाघ सोसायटीचे चेअरमन कडूबा म्हस्के, पाथ्री येथील माजी सरपंच महेंद्र पात्रीकर ग्रामविकास अधिकारी नारायण पाथरे, जनार्दन शिंगारे रमेश वाघ मिर्झा बेग ग्रामपंचायत सदस्य शुभम गंगावणे, काकाजी कोलते, राजिक शेख, साबेर पठाण, शेख अंजुम, शेख रईस, सोमीनाथ कोलते साहेबराव ठाकरे गणेश कोलते अनिल वाघ बळवंत वाघ बाळू खुळे आजिनाथ वाघ शेख सलमान राजू मस्के काळू म्हस्के पुंडलिक राऊत, अशोक शीनगारे, शंकर मस्के शेख शकील कृष्णा सहाने मनोज वाघ, राजू पढरे, विष्णू वाघ माणिक मस्के शब्बीर शेख अमन बेग, कडूबा नवतुरे नितीन सदावर्ते, धीरज कोलते, आशिष गोविंद वाघ, आरून वायकोस, रेशमाजी वाणी शेख शकील, गणेश दणके, बाळू वाघ , शेख सद्दाम रवी शिनगारे आदींची यावेळी उपस्थिती होती.



# जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत वेदांत क्षिरसागर व हर्षदा उबाळेला सूवर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** जळगाव जिल्हा क्रीडा कार्यालय व जळगाव जिल्हा आर्चरी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय आर्चरी ( धनुर्विद्या ) स्पर्धेत पहूर येथिल शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीने २ सुवर्ण पदकांसह, ३ रौप्य , ४ कांस्य अशा ९ पदकांची भरीव कमाई करत विभाग स्तरावर भरारी घेतली आहे. या यशाने पहुरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. ४ ऑक्टोबर रोजी जळगाव येथील शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलात धनुर्विद्या स्पर्धा आयोजित करण्यात आली.

# भाडेकरूच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मोहाडी येथे बंद पडलेल्या नायडू हॉटेल मध्ये एका इस्माचा मृतदेह आढळून आला आहे. तेथे एका बंद पडलेल्या हॉटेलच्या खिडकीला फडक्याच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्या केलेल्या व्यक्ती रिक्षा चालक असून त्यांचे नाव योगीराज पितांबर पाटील आहे मयत व्यक्ती मोहाडी येथे राहत होते.मयत व्यक्ती चे नातलग न्याय मागण्यासाठी एस पी ऑफिस येथे कामानिमित्त आलले आय.जि. बी.जी शेखर यांना भेट घेण्यासाठी आले असता मोहाडी पोलिसांनी बी. जि. शेखर त्यांना भेटू दिले नाही व परस्पर त्यांना बाहेर काढण्यात आले.




मृत्यू चे कारण असे सांगण्यात येत आहे कि मयत योगीराज यांच्या घरात पोलीस कर्मचारी भाडेकरी म्हणून राहत असून त्या भाडेकरी ने अनेक दिवसापासून घरभाडे थकीत ठेवले असून मयत व्यक्ती ने वारंवार पैश्याची मागणी केली व भाडेकरी ने पैसे देण्यास नकार दिल्याने त्यांना घर खाली करण्यासाठी सांगितले परंतु त्या पोलीस कर्मचाऱ्याने धमकी देत घर खाली करण्यास नकार दिला असा आरोप मयत व्यक्ती च्या नातेवाईकांनी केला व मयत व्यक्ती ने मोहाडी पोलिसात धाव घेतली असता तेथे देखील त्यांना न्याय मिळाला नाही असे मयत यांच्या परिवाराने सांगितले मोहाडी पोलिसांच्या दुर्लक्ष मुळे असे झाले आहे असा ही आरोप करण्यात येत आहे.सूत्राच्या माहितीनुसार मयत व्यक्ती ला न्याय न मिळाल्याने गळ फास घेतली असेल असे सांगण्यात येत आहे.सदर भाडेकरी पोलीस कर्मचारी यांच्यावर कारवाहीसाठी पुढील तपास सुरु आहे व गळ फास घेतलेल्या ठिकाणी फोरन्सिक लॅब ची संपूर्ण टीम त्या ठिकाणी उपस्तित राहून पुरावे गोळा करण्याचे काम सुरु आहे.




महाराष्ट्र Business Katta









# सामान्य मानसिक आरोग्याला प्रोत्साहन!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**वर्ल्ड मेन्टल हेल्थ डे- जागतिक मानसिक आरोग्य दिन दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश मानसिक आरोग्याबाबत लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा आहे. त्यांना तणावमुक्त जीवन देऊन चांगले आरोग्य आणि दीर्घायुष्य मिळावे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.जागतिक मानसिक आरोग्य दिन- वर्ल्ड मेन्टल हेल्थ डे दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी मानसिक आरोग्य शिक्षणाविषयी जनजागृती करण्यासाठी साजरा केला जातो. हा दिवस पहिल्यांदा १९९२मध्ये वर्ल्ड मेंटल हेल्थ असोसिएशनच्या पुढाकाराने साजरा करण्यात आला.**

ही दीडशेपेक्षा जास्त देशांमध्ये सदस्य आणि संपर्क असलेली जागतिक मानसिक आरोग्य संस्था आहे. या दिवशी हजारो समर्थक मानसिक आजार आणि जगभरातील लोकांच्या जीवनावर होणारे त्याचे मोठे परिणाम याकडे लक्ष वेधण्यासाठी हा वार्षिक जागरूकता कार्यक्रम साजरा करण्यात येतो. ऑस्ट्रेलियासारख्या काही देशांमध्ये हा दिवस मानसिक आरोग्य सप्ताहाचा भाग असतो. दि.१० ऑक्टोबर १९९२ रोजी प्रथम उप-महासचिव रिचर्ड हंटर यांच्या पुढाकाराने जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. इ.स.१९९४पर्यंत या दिवसाची सामान्य मानसिक आरोग्याला प्रोत्साहन देणे आणि जनतेला शिक्षित करणे याशिवाय कोणतीही विशिष्ट संकल्पना नव्हती. तत्कालीन महासचिव यूजीन ब्रॉडी यांच्या सूचनेनुसार सन १९९४मध्ये पहिल्यांदा जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. पहिली थीम होती, "जगभरातील मानसिक आरोग्य सेवांची गुणवत्ता सुधारणे". जागतिक मानसिक आरोग्य दिनाला विश्व स्वास्थ्य संस्था- डब्ल्युएचओने पाठिंबा दिला आहे, जो जगभरातील आरोग्य मंत्रालये आणि नागरी समाज संस्थांशी असलेल्या मजबूत संबंधांचा वापर करून मानसिक आरोग्याच्या समस्यांवर जागरूकता निर्माण करतो. डब्ल्यूएचओ तांत्रिक आणि संप्रेषण सामग्री विकसित करण्यात देखील मदत करते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात तणावमुक्त जीवन जगणे अवघड काम वाटते. प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या समस्येने त्रस्त आहे आणि चिंतेने आपले जीवन जगत आहे. माणसाने शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. मानसिक आजार टाळण्यासाठी तुम्ही तुमच्या तणावावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तणाव घेतल्याने तुमची समस्या सुटणार नाही, पण त्याचा तुमच्या आरोग्यावर वाईट परिणाम होईल हे समजून घ्या. जास्त ताणामुळे चिडचिड, जास्त राग, झोप न लागणे, एकटे राहणे यासारख्या समस्या उद्भवू लागतात. मानसिक आरोग्य दिनानिमित्ताने या गोष्टी करून बघा- १. एकटे राहू नका- ज्या व्यक्ती तणावाखाली असतात, ते एकटे राहणे पसंत करतात. त्यामुळे त्यांना इतर लोकांशी त्यांचा संबंध फारच कमी असतो. म्हणूनच आपण इतर लोकांशी संपर्क साधणे आणि त्यांच्याशी आपल्या मनाबद्दल बोलणे खूप महत्त्वाचे आहे. कुटुंब आणि जवळच्या लोकांसोबत वेळ घालवण्याचा प्रयत्न




करू या. असे केल्याने आपण स्वतःला लोकांशी जोडलेले अनुभवू. २. नकारात्मक लोकांपासून दूर राहू- जे लोक आपल्याला नकारात्मक बनवतात त्यांच्यापासून अंतर ठेवू. जर आपणास त्यांचे ऐकून तणाव वाटत असेल तर त्यांच्यापासून दूर राहणे चांगले. सकारात्मक लोकांसोबत वेळ घालवू. असे केल्याने आम्हास स्वतःला सकारात्मक वाटेल. ३. चांगले मित्र बनवू- ज्यांच्याशी आपण मनातील प्रत्येक गोष्ट शेअर करू शकू आणि आम्हाला आराम वाटेल. असे मित्र ठेवू जे आम्हाला आमच्या बोलण्यावरून जज करत नाही, मात्र आम्हाला समजून घेतात आणि आमची मदत करतात, कारण चांगले मित्र आम्हाला आवश्यक सहानुभूती देतात तसेच नैराश्याच्या वेळी योग्य वैयक्तिक सल्ला देतात. ४. योग आणि ध्यान- योग आणि ध्यानाला आपण दिनचर्येचा एक भाग बनवू. ध्यान केल्याने आपण स्वतःला तणावमुक्त अनुभवू, त्यामुळे ध्यान आणि योगासने नियमित करणे गरजेचे आहेत. हे आम्हाला तणावापासून मुक्त होण्यास आणि मानसिक आरोग्य राखण्यास मदत करेल. ५. संतुलित आहार- संतुलित आहारामुळे केवळ शरीरच चांगले नाही तर दुःखी मन देखील चांगले बनते. त्यामुळे फळे, भाज्या, मांस, शेंगा, कार्बोहायड्रेट इत्यादींचा संतुलित आहार घेतल्याने मन प्रसन्न राहते. म्हणूनच त्यांचे अधिक सेवन करावे. ६. मनाला आनंद देणाऱ्या गोष्टी करू- आम्हाला आमच्यासाठी थोडा वेळ काढता येईल अशा गोष्टी करू, ज्यामुळे मन प्रसन्न होते. जसे आम्हाला पुस्तके वाचायला आवडतात, मग पुस्तके वाचू. जर आम्हाला मित्रांशी बोलायला आवडत असेल तर मित्रांशी बोलू. जर नाचण्याने आमच्या चेहऱ्यावर हसू येत असेल तर डान्स करू. आम्हाला आनंद देणाऱ्या सर्व गोष्टी करू चला. !! जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# ज्येष्ठांच्या वाढत्या समस्या चिंताजनक...



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**आपल्या घरात सर्वात अनूभवी, चाणाक्ष व बुद्धीमान जर कोण असेल तर ते आपल्या सर्वांचे आधारवड असलेले आपल्याच घरातील म्हातारे आजी आजोबा म्हणजेच जेष्ठ नागरीक.... हे जेष्ठ नागरीक म्हणजे अनूभवाचे भांडारच जणू आणि ज्या घरात हे अनूभवाचे भांडार आहे म्हणजेच जेष्ठांचा सहवास आहे त्या घराला घरपण आल्याशिवाय राहत नाही.आणि ज्या घराला जेष्ठांचा सहवास लाभलेला नसतो त्या घराचे म्हणे वाळवंट होते येवढेच नाही तर माणसात माणूसही राहत नाही.घराला बरकत येत नाही.सुख शांती लाभत नाही. घरात रोज भांडण तंटे होतात.म्हणजे जेष्ठांचे आपल्या जिवनात किती महत्त्व आहे ते यावरुन चांगलेच आपल्याला कळते.**

येवढेच नाही तर त्यांनी त्यांचे उभे आयुष्य आपल्याला लहानाचे मोठे करण्यासाठी वेचलेले असते. आपल्यासाठी त्यांनी खूप खस्ता खाऊन आपल्याला शिक्षण शिकवलेले असते.उच्चशिक्षित केलेले असते आणि त्यांच्यामूळेच तर आपण मोठ्या पदावर दिमाखाने कार्यरत असतो व त्यांनी पिकवलेले आनंदायी फळे आनंदाने चाखत असतो. आई वडीलांबरोबरच जेष्ठ नागरीक सुध्दा जीवन भराची शिदोरी असते.ती सरतही नाही आणि उरतही नाही.हे नाकारता येणार नाही परंतू उतारवयात जेष्ठांची खूप हेळसांड होत आहे.हे तर आपल्याला माहीतच आहे.तसेच घरातून जानिवपूर्वक त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे व त्यांची म्हणावी तेवढी सोय केली जात नाही.त्यांना काय हवे काय नको हे सुध्दा विचारले जात नाही.म्हणजे जेष्ठांच्या समस्या जाणून घ्यायला आता कोणीही तयार नाही. मी पहातोय की काही घरात जेष्ठांच्या भावनांना पायदळी तुडवले जात आहे.त्यांना बोलताना अपमानास्पद शब्द टाकून बोलले जात आहे.त्यांचा पदोपदी अपमान केला जात आहे.त्याच बरोबर त्यांच्या भावनांना,विचारांना शुन्य किंमत दिली जात आहे.तेव्हा प्रश्न पडतो की आजची युवा पिढी ही रानटी जनावरांनसारखे तर वागत नाही ना? त्यांनी आपल्यावर केलेल्या उपकाराची जाणीव मनात का ठेवत नाही? तसेच ज्यांच्या जीवावर आपल्या संसाराचा डोलारा उभा आहे हे असे कसे विसरुन चालेल?ज्या माय बापांनी आपल्याला जन्म दिला. आईने नऊ महिने नऊ दिवस पोटात सांभाळले व लहानाचे मोठे केले.इतकेच नाही तर आपल्याला कमावते केले.म्हणजे त्यांनी आपल्याला भरपूर काही दिले.म्हणजे त्यांना त्यांच्या म्हातारपणात आपल्याला काहीतरी देणं लागत.हे आपण विसरून कस चालेल? म्हातारपणात त्यांच्या अडीअडचणी लक्षात घेतल्या पाहिजेत.त्यांना सर्व सोयी सुविधा पुरवल्या पाहिजेत.त्यांच्याशी हितगूज साधले पाहीजेत.व तसेच त्यांना मायेचा आधार दिला पाहिजे.नाहीतर आपण बघत आहोत की येवढं सारं करून सुध्दा काही महाभाग आई वडीलांना जेष्ठांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत आहेत.आणि आपण म्हणजे बायको मुलांना घेऊन कुठेतरी लांब जाऊन स्थायिक होत



आहेत.आणि मायबापाला रामभरोसे सोडत आहेत. नंतर ते बिचारे तेथेच खितपत पडतात.त्यांना चार गोष्टी बोलायला सुध्दा हे महाभाग येत नाहीत.वा वेळ काढत नाहीत.ते मस्तपैकी तिकडल्या शहरात रममाण होतात.ते आई वडील आहेत का मेलेत हे सुध्दा विचारायला कोणी जात नाही.किंवा फोन लावत नाहीत.येवढे बायको लएकरआंत मश्गूल होतात.आणि एक दिवस ते खितपत पडून पडून वृद्धाश्रमात मरुन जातात.शेवटी मातीला येण्यासाठी जेव्हा मुलाला फोन जातात तेव्हा ते काहीतरी अडचण सांगून मातीला यायचे टाळतात.तुम्ही माती उरकून घ्या आणि आम्हाला मोबाईलवर दाखवा. असे बोलून टाकतात.. हि सध्याची कंडीशन आहे. जेष्ठांना येवढ्या सगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.म्हणून मित्रहो तुम्हाला सगळ्यांना कळकळीची विनंती आहे की, जेष्ठांना जीव लावा, त्यांना जिवापाड जपा,त्यांची काळजी घ्या, त्यांना मायेचा आधार द्या... आयुष्यात तुम्हाला काहीही कमी पडणार नाही.फक्त गरज आहे ती जेष्ठांच्या समस्या लक्षात घेऊन त्या सोडवण्याची...

# दवाखान्यामधील मृत्यूला जबाबदार कोण ?



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

आधुनिक केसरी

**सध्या धकाधकीच्या जीवनामध्ये आजार व रोगांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. आजारी पडल्यानंतर उपचारासाठी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यावर उपचाराचा खर्च लाखो रुपये येतो. जिथे दोन वेळेच्या जेवणाची भ्रांत आहे. अशा गरिबांसाठी शासकीय दवाखानेच आरोग्य मंदिराची भूमिका निभावत असतात. परंतु नांदेड, छत्रपती संभाजी नगर, नागपूर अशा अनेक शासकीय दवाखान्यांमध्ये अक्षरशः मृत्यूचे तांडव सुरू झाले आहे. त्यामुळे शासकीय दवाखान्यातील मृत्यूला जबाबदार कोण?असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. याला सरकारी अनास्था म्हणावी की, वैद्यकीय हलगर्जीपणा म्हणावा;याचे उत्तर मिळणे गरजेचे आहे.**

पैठण येथील एका महिलेची प्रसूती झाल्यानंतर ते नवजात बालक नांदेड येथील नवजात शिशु केंद्रामध्ये दाखल करण्यात आले. बाळाला झटके येत होते. परंतु दुर्दैवाने बाळाचा मृत्यू झाला. तब्बल बारा वर्षानंतर मिळालेले अपत्य सुख त्या आई-वडिलांसाठी क्षणीक ठरले. बऱ्याचशा शासकीय दवाखान्यांमध्ये औषधांचा तुटवडा पाहायला मिळतो. ग्रामीण भागातून उपचारासाठी शहरातील शासकीय दवाखान्यात आलेल्या रुग्णाला बाहेरून औषधे विकत घेण्यास सांगितले जाते. प्रवासाच्या खर्चासाठी हात उसने पैसे घेतलेल्या रुग्णांना बाहेरील औषध विक्रेत्याकडून औषधी घेणे परवडत नाही. हे वास्तविक आहे. त्यामुळे असे रुग्ण औषधे खरेदी करत नाहीत १५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनाच्या मुहूर्तावर सर्व शासकीय दवाखान्यांमध्ये मोफत उपचार केले जाणार अशा पद्धतीची घोषणाबाजी झाली. रुग्णांचा केस पेपर व इतर बाबींवर होणारा खर्च वाचला परंतु औषधे उपलब्ध न झाल्यामुळे त्यासाठी बाहेर पैसे देऊन ती विकत घ्यावी लागत आहेत. शासकीय दवाखान्यांमध्ये औषधांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. सन २०१७ पासून हाफकीन मंडळाकडे औषध खरेदीचे काम सोपविण्यात आले होते. परंतु त्यांच्याकडून कोणत्याही रुग्णालयाला मागणीनुसार औषधांचा पुरवठा झाला नाही हे वास्तव आहे. निविदा प्रक्रिया वेळेत न राबविल्यामुळे औषधांच्या खरेदीवरील ५०० कोटींपेक्षा जास्त निधी सरकारी तिजोरीत पुन्हा पाठवावा लागला हे धक्कादायक वास्तव आहे. त्यामुळे हाफकीन महामंडळाकडून काम काढून घेऊन शासकीय औषधे व यंत्र खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण स्थापन झाले. त्याची जून पासून अंमलबजावणी सुरू झाली परंतु औषधांचा तुटवडा मात्र कायमच राहिला. शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या बळीचे सारे खापर डॉक्टर किंवा वैद्यकीय कर्मचारी यांच्यावर फोडणे इष्ट नाही. आज जवळपास सर्वच शासकीय दवाखान्यांमध्ये कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे. डॉक्टरांची कमतरता आहे. बरेच वर्षांपासून शासनाकडून आरोग्य कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया राबविली जात नाही. त्यामुळे नाईलाजास्तव कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक झाली आहे. शासनाच्या सुविधा व पगाराची हमी नसल्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. एका जिल्ह्यातील रुग्णालयावर आजूबाजूच्या जिल्ह्यातील व शेजारील राज्यातील रुग्णांचाही अतिरिक्त ताण पडतो. त्यामुळे रुग्णांसाठी बेड उपलब्ध करून देणे, औषधी देणे यासाठी असणारी आरोग्य यंत्रणा अपुरी पडते. याचाही विचार होणे गरजेचे आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारी निवासस्थानांची अवस्था दयनीय झालेली आहे. त्यावर उपाय म्हणून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या निवासाची सोय दवाखान्याच्या जवळच होणे आवश्यक आहे. जेणेकरून अत्यावश्यक वेळी आपल्या कामकाजाच्या व्यतिरिक्त अतिरिक्त वेळी रुग्णांना सेवा देण्यासाठी ते सहज उपलब्ध होतील. केवळ शासकीय दवाखान्यातील अधिष्ठातांच्या हातात झाडू देऊन शौचालय साफ करून घेण्यापेक्षा त्यांना पुरेशी कर्मचारी यंत्रणा व मुबलक औषधी देणे अत्यंत आवश्यक आहे. मंदिरांसाठी कोट्यावधी रुपयांचा भरीव निधी देण्यापेक्षा तो पैसा आरोग्य मंदिरांवर खर्च केल्यास नक्कीच गोरगरिबांना दर्जेदार आरोग्य सुविधा शासकीय दवाखान्यांमध्ये मिळतील.

# तरंगते नाथसागर 'सौर ऊर्जा प्रकल्प' मच्छीमारांच्या मुळावर

आधुनिक केसरी

**मराठवाड्याची लाईफ लाईन म्हणून ओळख असणारा नाथसागर जलाशय हा लाखो करोडो लोकांच्या जीवनात आनंद निर्माण करतो आहे. नाथ सागर जलाशयात केंद्र व राज्य शासनाच्या वतीने येणाऱ्या काळात पंधरा हजार एकर जलाशयात तरंगते सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी शासन प्रशासनाच्या वतीने पाहणी करण्यात आलेली आहे परंतु हा प्रकल्प जर नाथसागर जलाशयात राबविण्यात आला. भटक्या विमुक्त कहार समाजातील जवळपास 25 ते 30 हजार परिवारावरती उपासमारीची वेळ येऊ शकते. त्यांचा पारंपारिक व्यवसाय मासेमारी हा या व्यवसायावर गडांतर येण्याची शक्यता आहे. जवळपास दीड लाखावर मच्छिमार समाज हा नाथसागर जलाशयावर अवलंबून आहे.**

गेल्या कित्येक दशकापासून कहार समाज पारंपारिक मासेमारी व्यवसाय करीत आपला उदरनिर्वाह करीत आहे. त्यांच्या जीवनाचा एक मात्र आधार म्हणजे नाथ सागर जलाशय आहे. मराठवाड्यातील हा समुदाय गोदावरी नदीच्या काठी वसलेला दिसून येतो आणि त्यांचा पारंपारिक व्यवसाय हा मासेमारी आहे आणि जर या तलावात जलाशयात शासनाचा हा "तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प" स्थापित झालाच तर मत्स्य व्यवसाय करण्यास बंदी घालण्याची शक्यता आहे आणि जवळपास दीड लाख पर्यंत मच्छीमार बांधवांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊ शकते. अत्यंत हलाखीचं आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये प्रकृती आणि पर्यावरणाच्या सानिध्यात नदी तलावाकाठी अभावग्रस्त जीवन जीवन जगणारा हा भटका समाज त्यांच्या जीवनाला थोडा बहुत जो आधार आहे तो केवळ नाथ सागर जलाशयामुळे आहे. गोदावरी नदीच्या किनारी टरबूज खबुजाची वाडी मागील दोन दशकापर्यंत लागत असत परंतु प्रचंड वाळू उपसामुळे आता हा व्यवसाय त्यांचा नष्ट झालेला आहे. पर्याय मात्र आता मासेमारी आहे आणि या जायकवाडी नाथसागर जलाशयात मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील अंबड, परतुर तसेच बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव तालुक्यातील सुद्धा कहार समाजातील नागरिक परिवारासह मोठ्या प्रमाणात आलेली आहेत. या तलावामध्ये विविध प्रजातींचे मासे सापडतात.मासे मारी पासून त्यांना आर्थिक उत्पन्न मिळते परंतु त्यांचा हाच आधार जर हिसकावून घेतला तर भयावह परिस्थिती निर्माण होऊ शकते .छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तसेच नगर या दोन जिल्ह्यातील पैठण,गंगापूर आणि नगर जिल्ह्यातील शेवगाव, नेवासा या चार तालुक्यातील शेकडो गावातील मच्छीमार बांधव या सौर ऊर्जा प्रकल्प होण्याच्या भीतीने भयाभित आणि हवालदिल झालेले आहेत. पंधरा हजार एकरावर तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प करून वीज निर्मिती करण्याचे केंद्र व राज्य शासनाचा प्रयत्न आहे या नाथसागर जलाशयात गोड पाण्यात होणारा मस्त्य व्यवसाय व त्याला असणारी मागणी मोठ्या प्रमाणात असल्यामुळे संपूर्णतः समाजाचा उदरनिर्वाह एक मात्र या व्यवसायावर अवलंबून आहे. आर्थिक दृष्ट्या अत्यंत मागास असलेला हा समाज आजही प्रगती पासून दूर आहे शासन प्रशासनाच्या उदासीनतेमुळे आजही या समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे आणि भटकंती व विस्थापन आजही सुरूच आहे. जर का हा प्रकल्प या ठिकाणी राबविण्यात आला तर सर्वात मोठा धोका हा प्रकृती पर्यावरणाला होऊ शकतो. नाथ सागर जलाशय हे पशु पक्षांसाठी एक वरदान आहे. देशी आणि विदेशी पक्षी या ठिकाणी करोडो संख्येने विविध प्रजातीचे पक्षी



आपणास पाहावयास मिळतात परंतु या प्रकल्पाने त्यांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. त्यांचे अस्तित्व संपुष्टात येण्याची शक्यता आहे. वन्य प्राणी सुधा मोठा प्रमाणित तलावा काठी तहान भागवतात, जैवविविधतेवर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो आणि पर्यायी विदेशी पक्षी तर सोडाच पण देशी पक्षी सुद्धा नष्ट होऊ शकतात. पर्यावरणाचा समतोल या मुळे बिघडू शकतो पर्यावरणाच्या या समतोलासाठी जैवविविधता अत्यंत महत्त्वाची असते आणि लाखो करोडो पक्षी ही आपली भूक या जलाशयातून भागवतात. आपली



तहान भागवतात. या प्रकल्पाचे गंभीर असे दुष्परिणाम येणाऱ्या काळात उद्भवू शकतात. मनुष्याच्या आरोग्यावरती सुद्धा आणि आसपास च्या परिसरातील शेती च्या उत्पादनावर तसा विपरीत परिणाम होऊ शकतो.प्रकृती आणि पर्यावरण प्रेमी सुद्धा हीच मागणी आहे. विविध पक्षीप्रेमी निरीक्षक या तलावाच्या किनारी पक्षांची निरीक्षण करण्यासाठी येत असतात दुर्मिळ प्रजातीचे पक्षी या ठिकाणी पहावयास मिळतात.

कहार समाजातील नागरिकांच्या वतीने या प्रकल्पास विरोध होत आहे आणि तो झालाच पाहिजे कारण की, अनेक दशकापासून हा समाज या एकमात्र व्यवसायावर अवलंबून आहे आणि हा पारंपारिक व्यवसाय तसेच या माध्यमातून त्यांच्या जीवनाला आर्थिक स्थैर्य प्राप्त होत आहे तसेच पैठण हे धार्मिक आणि सांस्कृतिक तसेच प्रकृती पर्यावरणाची दृष्टिकोनातून अत्यंत वैभवशाली असे शहर असून त्याची एक वेगळी ओळख आहे.नाथसागर जलाशयात आढळून येणारे पक्षी पक्षी प्रेमींसाठी तसेच पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू आहेत आणि जर हा प्रकल्प या ठिकाणी राबविण्यात आला तर पक्षांच्या जीविताला अस्तित्वाला परिपूर्ण धोका निर्माण होऊ शकतो जैवविविधता अत्यंत महत्त्वाची असते तिला सुद्धा धोका निर्माण होऊ शकते. या आधी सुद्धा" इको सेन्सिटिव्ह झोन"," पक्षी अभयारण्य "म्हणून नाथ सागर जलाशयातील परिसर हा विशेष झोन म्हणून घोषित करण्यात आलेला आहे आणि त्या माध्यमातून वन विभाग नेहमीच मच्छिमार बांधवांवरती कार्यवाही करत आहे त्यातच आता हे तरंगते सौर ऊर्जा प्रकल्प होणार असल्यामुळे मच्छीमार बांधवांची चिंता वाढलेली आहे. मराठवाड्यातील कहार समाज आजही शासन प्रशासनाच्या विविध कल्याणकारी योजना पासून वंचित राहिलेला आहे व त्याची भटकंती आपल्या उदरनिर्वाहासाठी आजही सुरूच आहे त्यात आता पारंपरिक व्यवसायावरती येणारे संकट पाहून समाजातील नागरिक अत्याधिक हवालदिल झालेले दिसून येत आहेत अशा या प्रसंगी केंद्र शासन राज्य शासन आणि प्रशासनाने संवेदनशील पणे या मच्छीमार बांधवांची व्यथा समजून घेऊन भविष्यातील त्यांच्या वरती उद्भवणाऱ्या संकटा विषयी सहानुभूतीपूर्वक विचार करून प्रस्तावित हा तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करावा. आता कहार समाज बांधव शासन प्रशासनाला निवेदन देऊन हा प्रकल्प बंद करण्याची मागणी करत आहेत आणि निश्चितपणे सरकारने या प्रकल्पाला स्थगिती देऊन प्रकृती पर्यावरणाचा संभावित धोखा आणि लाखो भटक्या विमुक्त जाती तील कहार,भिल्ल,भोई आणि सर्व मच्छीमार बांधवांच्या मनातील भावनांना समजून त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी हा प्रकल्प रद्द करावा यातच खऱ्या अर्थाने या सर्व कहार समाजातील मच्छीमार बांधवांचे हित आणि प्रकृती पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सुद्धा शासनाने हा प्रकल्प रद्द करणे सोईचे होईल.

डॉ.कन्नुलाल आसाराम विटोरे
मॉडेल कॉलेज घनसावंगी, जालना

# उत्थान होण्यासाठी धन लागत नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**शून्यातून विश्व निर्माण करण्याची मानसिकता धनाने नाही तर संघर्षाशील मनातून निर्माण होते. मनस्थिती आणि मानसिकता ही नेहमीचं उच्च असली पाहिजे. जीवनात धन द्रव्य संपत्ती ही वेळेनुसार येत जात असते. उत्कर्ष, उत्थान होण्यासाठी धन नसल तरी देखील चालतं पण जिद्द, चिकाटी, संघर्ष करण्याची तयारी असली पाहिजे त्याच बरोबर प्रचंड धेय्य शक्ति, सातत्य ह्या प्रमुख बाबी आवश्यक असतात. गरीब कुटुंबात जन्माला येणं हा गुन्हा नाही. आपण गरीब अथवा श्रीमंत या पैकी कोणत्या कुटुंबात जन्माला यावं हे आपल्या अधिकार क्षेत्रात मुळीच नाही. पण जर यदाकदाचित आपला जन्म गरीब कुटुंबात झाला तर आपण निराश होऊन चालणार नाही.**

अथवा आपण गरीब आहेत आपलं काही खरं नाही म्हणून घरात बसून देखिल चालणार नाही. प्राप्त परिस्थीती मधुन मार्ग काढत पुढे मार्गक्रमण करण्याची मानसिकता विकसित करता आली पाहिजे. आपण गरीब आहेत आपल्याकडं धन नाही म्हणजे आपण स्वतःला दुय्यम समजण्याची आवश्यकता अजिबात नाही .जी परस्थिती आपल्या वाट्याला आली त्यामध्ये बदल घडवून आणायची धमक आपल्या धमण्या मध्ये निर्माण झाली पाहिजे. प्रबळ इच्छा शक्ती समोर धन द्रव्य संपत्ती हे सगळं नगण्य असत. आपण आपल्या ज्ञानाने परिस्थितीवर मात करू शकलो तर हेच धन आपल्याकडं मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत. मुळात जीवन उत्थान आवश्यक आहे. आपण आपलं स्वतःचं जीवन उत्थान कसं करता येईल यासाठी प्रयत्नशील असल पाहिजे. त्यासाठी जीवनात परस्थिती कशीही येऊ द्या असु द्या आपण आपलं पुर्ण लक्ष्य आपलं उत्थान घडविण्यासाठी संकल्प करून तो केलेला संकल्प तडीस नेण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. हा संकल्प पुर्ण करत असताना इतर काही अडचणी समस्या देखिल निर्माण होतील पण आपण कोणत्याही प्रकारच्या समस्येला खेळत न बसता समर्पित भाव ठेवून पुढे प्रयत्न केला पाहिजे. आपणं आपल्या मेहनतीने कष्टाने आपलं जीवन नक्कीच बदलु शकतो. जीवन बदलण्याची हिच उमेद महत्वाची असुन हि उमेद निर्माण झाली तर मग जीवनाचा उत्कर्ष होण्यासाठी धन लागत नाही. आपण धनवान नसलो तरी देखील आपण आपल्या जीवनाचं उत्थान करू शकतो त्यासाठी प्रतिकुल परस्थिती मध्ये संघर्ष करण्याची मानसिकता विकसित झाली पाहिजे. जीवनात अंनत अडचणी संकट असतात ही संकटं मोजत बसू नका जो संकट मोजत बसतो. सारख्या सारख्या अडचणी समस्या मोजतो तो फार मोठा पराक्रम करू शकत नाही हे अगदी वास्तव आहे. म्हणून सारख नकारात्मक असणं हे जीवन हितार्थ नाही. संकटांवर मात करून यशस्वी संघर्षाची यशोगाथा निर्माण करण्याची मानसिकता विकसित केली पाहिजे. आपल्या जवळ काय आहे काय नाही हे महत्वाचे नाही आपली जीवना बाबत रणनिती काय आहे आणि त्या रणनितीला यशस्वी करण्यासाठी आपला आत्मविश्वास दैदिप्यमान इच्छा शक्ति कामी पडता कामा नये .प्रतिकुल परस्थिती असताना जीवनाची कसोटी लागत असते. वाईट परस्थिती वाट्याला आली तरी देखील परस्थिती बदलण्याची धमक आपण आपल्या मनगटात ठेवली पाहिजे. संबंध जीवनभर एका सारखी परस्थिती राहिल असं कोणाच्याही जीवनात शक्य नसतं .अपवादात्मक लोक सोडले तर बहुतांश लोकांच्या जीवनात परस्थिती हि वेळेनुसार बदलतं असते. आपल्याकड मुबलक प्रमाणात धन द्रव्य,संपदा नाही म्हणून निराश होण्याचं काही करणं नाही. जीवन उत्थान होण्यासाठी धन लागत अस कोण म्हटलं आहे. आजपर्यंत अरबपती झालेले सगळे धनवान अथवा उच्च पातळीवर पोहचलेले सर्व अधिकारी हे नामांकित खेळाडू आणि नामांकित लोक प्रतिनिधी ही सगळी माणसं अगदी शून्यातून दिग्गज झाली. स्वतःच जीवन घडविण्यासाठी अथवा आत्मविकस होण्यासाठी आपण आपल्या धेय्या प्रति समर्पित असल पाहिजे. धन नसलं तरी देखील आपण आपल्या प्रचंड मेहनत व इच्छा शक्ति च्या बळावर आपल्या जीवनाचं उत्थान



घडवून आणु शकतो.हे अगदी वास्तव आहे आणि हेच गुह्य ज्ञान ज्याला समजलं उमजलं त्याच्या जीवनाच उत्थान झाल्याशिवाय राहणार नाही. याची जाणीव झाली पाहिजे. आपल्यामध्ये अनंत कला गुण भरलेले आहेत. त्याच कलागुणांना योग्य वाव देऊन आपल्याला यशाचं शिखर गाठुन आपलं नावलौकिक करता आलं पाहिजे. फक्त धन नाही धन नाही एवढा जाप करत बसण्यापेक्षा स्वतःच अस्तित्व सिद्ध करण्यासाठी मैदानात उतरल पाहिजे आणि एकदा आपण मैदानावर इतिहास निर्माण केला की आपला मुळ इतिहास बदलल्या शिवाय राहत नाही. मुळात मानवी जीवन हे स्थिती बदलण्यासाठी असतं आपला जन्म ज्या परस्थिती मध्ये झाला ती परस्थिती आपण बदलण्याची क्षमता सृष्टीवर असणारे संसाधन वापरून निर्माण केली पाहिजे पाहिजे.या मध्ये आपली असणारी मुळ परस्थिती बाधा निर्माण करेल, असं कोणतंही कृत्य आपल्या कडुन होणारं नाही याची काळजी दक्षता घेतली तर निश्चितच आपल उत्थान झाल्या खेरीज राहणार नाही. म्हणून उत्थान हाच संकल्प महत्वाचा आहे.

# बेजबाबदार सरकार अन् निर्ढावलेले प्रशासन!!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्याच्या ७५वर्षानंतर देखील जर या देशातील जनतेला मुलभूत गरजा मिळत नसेल तर प्रशासन व्यवस्थेत बिघाड आहे, हे नक्की! व सरकार किती बे जबाबदार आहे हे नक्की!लोककल्याणाची संकल्पना पोकळ डरकाळ्या फोडून येत नाही, त्यासाठी प्रशासनव्यवस्थाच सुधारावी लागते. औषधांच्या तुटवड्यामुळे जर या देशातील गोरगरिब व सामान्य जनतेचे प्राण जात असेल,तडफडून मरावे लागत असेल तर सरकार किती बेजबाबदार व प्रशासन किती निर्ढावलेले आहेत हे सांगणे न लगे!जिथे व्यवस्था मुर्दाड झाली की, त्यांना कोणत्याच गोष्टीचे गांभीर्य राहत नाही.**

काही दिवसापूर्वी ठाणे येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात घडलेला दुर्दैवी प्रकार ताजा असतानाच आता नांदेड छत्रपती संभाजीनगर नागपूर अशा कित्येक रुग्णालयातून दुर्दैवी मृत्यूच्या तांडवाच्या बातम्या सलग येत आहेत. सरकारी रुग्णालयातील रुग्णा ंची मृत्युसंख्या सतत वाढत आहे हा आलेख कमी न होता तो वाढतच आहे. केवळ नांदेड मध्येच नव्हे तर नागपूर ठाणे येथील शासकीय रुग्णालयात मृत्यूचा तांडव सतत सुरू आहे या दुर्दैवी मृत्यूला जितकी शासन जबाबदार आहे इतकेच तेथील प्रशासन देखील जबाबदार आहे!

शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या मृत्यूवरून हे स्पष्ट झाले आहे. राज्यातील जनतेला मूलभूत सोयी सुविधा देणे ही सरकारची जबाबदारी व लोककल्याणाच्या कामाची अंमलबजावणी करणे हे प्रशासन यंत्रणेची कार्य मात्र बे जबाबदार सरकार व निर्धारिलेल्या प्रशासन यंत्रणेला हे कधी कळणार? या देशातील गोरगरीब जनतेचे व शेतकऱ्यांचे व आरोग्याचे प्रश्न वेगवेगळे आहेत. आम जनतेचे प्रश्न वेगळे आहेत, ते सोडविण्यासाठी विविध अंगांनी प्रयत्न होणे आवश्यक आहे. मात्र, ज्या गोष्टी सरकारच्या आहेत. ज्यासाठी प्रशासकीय यंत्रणेची एक कार्यक्षम व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. ठाणे पालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात २४ तासांत १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याची बातमी समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. या वृत्तामुळे आरोग्यव्यवस्थेचे वास्तव समोर आले होते.

ठाणे पालिकेच्या कळवा येथील रुग्णालयातील रुग्णांच्या मृत्यू प्रकरणानंतर आरोग्य विभागाने व सरकारने अत्यंत तातडीने सर्व शासकीय रुग्णायांची तपासणी करून आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्यायला पाहिजे होती.मात्र बेजबादार सरकार,भ्रष्ट प्रशासन यात्रनांमुळे शासकीय रुग्णालये दवा नव्हे तर मृत्युचा खाना बनत आहे.तरी देखील सरकार व प्रशासकीय यात्रनांचे डोळे उघड नाही..ठाण्यात हेच झालं आता नांदेडला झालं. दिरंगाई, दुर्लक्ष आणि बेदरकारपणा ह्यामुळे वारंवार महाराष्ट्रातल्या जनतेच्या जीवाशी खेळ सुरु आहे. अजून कितीदा पुन्हा पुन्हा हेच घडू देणार? असा प्रश्न सर्व सामान्यांना पडत आहे.. ठाण्यातील दुर्घटनेनंतरही प्रशासनाने धडा घेतला नाही का डॉक्टर निवाशिष्ठाप यांच्या रिक्त जागा भरणार तरी कधी वैद्यकीय उपकरणांच्या देखभाल दुरुस्तीसाठी पैसे का मिळत नाही.? औषध खरेदी तांत्रिक मान्यतेत का अडकली,? या प्रश्नांची उत्तरे कोणाजवळ आहे? नांदेडच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात औषध खरेदीच्या गोंधळामुळे २४,तासात २४,रुग्णांचा जीव गेला आणि उपचार घेणाऱ्या ७ रुग्णांचा जीव गेला.. रूग्णालयातऔषधांचा तुटवडा असताना वैद्य अधिष्ठाता व वैद्यकीय अधिकारी काय करत होते.? वरिष्ठांशी संपर्क करून ही बाब उघडकीस का आणली गेली नाही.? रुग्णालयातील डॉक्टर्स नर्सेस बेजबाबदर पणें वागतात..ही बाब मान्य केली तरी सरकार व राज्याचा आरोग्य विभाग काय करत आहे.?

जनतेला आरोग्य सुविधा देणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र सरकार आपले सरकार वाचविण्यात मस्तगुल आहे. सरकारी दवाखान्यांमध्ये डॉक्टर नर्सिंग स्टॉप यांच्या जागा रिक्त असताना सरकार मात्र सुस्त आहे..ज्या कंपनीला पुरवठा औषध पुरवठा करण्याचा ठेका देण्यात आला त्या कंपनीने औषधांचा पुरवठा का केला नाही याची साधी चौकशी सुद्धा सरकारने केली काय? शासकीय रुग्णालयांना हकीम कंपनीद्वारे औषधांच्या पुरवठा केला जातो राज्यभरातील रुग्णालयांमध्ये सध्या औषधांचा



प्रचंड तुटवडा जाणवत असताना राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने याची तातडीने दखल घ्यायला पाहिजे होती. झोपेचे सोंग घेणाऱ्या सरकार बिनधास्त आहे.. सरकार केवळ पोकळ घोषणा करत असते परंतु त्याची अंमलबजावणी करत नसते काही दिवसाआधी सरकारने आरोग्य सुविधांच्या मोठमोठ्या घोषणा केल्या, जनतेला मोफत वैद्यकीय उपचार मिळतील अशा जाहिराती वर्तमानपत्रातून प्रकाशित केल्या. पोकळ घोषणा केल्या. मात्र आधीच आरोग्य सुविधांचा अभाव असताना सरकार खरच राज्यातील जनतेला मोफत वैद्यकीय सुविधा पुरविणा्र काय? एकंदरीत राज्य सरकारच्या व आरोग्य विभागाच्या नाकर्तेपणामुळे आरोग्य विभागाचे धींडोळे निघत आहेत या मृत्यूला शासन जबाबदार आहेत ठाण्यातील घटना ताजी असताना नांदेडची घटना घडली. ठाणे आणि नांदेडच्या घटनांवरून सरकार आता तरी बोध घेणार काय? महाराष्ट्रातील प्रत्येक शासकीय जिल्ह्यात औषधांचा प्रचंड तुटवडा आहेत हा तुटवडासरकार भरून काढणार की अजून रुग्णांच्या जीवाशी खेळ खेळणार? या प्रश्नाचे उत्तर सरकारला द्यावे लागणार आहे. सलाईनची बाटली धरून उभी असलेल्या चिमुकलीच्या सोशल मीडियात व्हायरल झालेल्या फोटोवरून महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थाच कशी सलाईनवर आहे याचे विदारक दर्शन घडले. औरंगाबादेतील घाटी रुग्णालयात शस्त्रक्रिया झालेल्या आपल्या वडिलांच्या शुश्रुषेसाठी एका चिमुकलीवर आलेली ही वेळ म्हणजे आरोग्याविषयीची सरकारी अनास्था अन् बेदरकारपणाचे संतापजनक दर्शन म्हणावे लागेल. स्टँड मिळाले नाही म्हणून या चिमुकलीला अवघड स्थितीत सलाइनची बाटली सांभाळण्याची कसरत बराच काळ करावी लागली. यामुळे सर्वत्र संताप व्यक्त झाला आणि आरोग्यव्यवस्था ऐरणीवर आली. या शासकीय रुग्णालयाची हालत आधीच कोमात गेलेल्या रुग्णासारखी आहे. औषधांचा तुटवडा, रिक्त पदे, निवासी डॉक्टरांचे उद्धट वर्तन याबरोबरच नातेवाईकांनाच स्ट्रेचरवरून रुग्णाची ने-आण करावी लागणे यासारख्या असंख्य आजारांनी शासकीय रुग्णालये जर्जर झालेली आहेत.

# दास सर्वोत्तमाचा



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**लहानपणापासून आपण मनाचे श्लोक शिकलो. आजही बऱ्याच घरांमध्ये मनाचे श्लोक म्हटले जातात. पाठांतर म्हणून आपले ते पाठही असतात. पण खरोखरच आपण त्याच्या अर्थापर्यंत पोहोचतो का....? तर उत्तर बऱ्याचदा नाही असेच येईल.अगदी सोपे सांगायचे तर आजही आपले साधे चित्त एकाग्र होऊ शकत नाही, सातत्याने नित्यनेम म्हणून देवाचे नाव घेऊ शकत नाही. देवाला प्राधान्य सगळ्यात शेवटी.जमले तर करू अशा पद्धतीने आपण वागत असतो. म्हणजेच मनाचे श्लोक आपल्याला अंगीकारता येत नाहीत. समर्थ म्हणतात
मदे मत्सरे सांडिली स्वार्थ बुद्धी। प्रापंचिक नाही जयातें उपाधि। सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥**

अगदी प्रामाणिकपणे आपण जर आपल्याच मनाचा विचार केला तर मद मत्सर हे मनाचे विकल्प आपण सोडू शकत नाही. बऱ्याचदा ते अगदी कमी पातळीचेही असतात की जे आपल्याला जाणवतही नाहीत. अगदी साधेच सांगते की हा श्लोक परवाला ह.भ.प. आफळे बुवांनी समजावून सांगितला. आणि त्यावर लिहिण्याचा मला अत्यंतीक मोह झाला. बघा मोहावर लिहिताना मीच मोहात अडकले. हा सुद्धा एक मोहच असतो ना.... मग हा आपण सोडतो का....? तर नाही. म्हणजेच मनाचे श्लोक शिकलो जरी असलो तरी ते अंगीकारतो किती...? हे महत्त्वाचे असते. त्यामुळे अगदी सहजतेने आपल्या मनामध्ये ज्या भावना, जे विकार विहार करत असतात त्याविषयी आज आपण बोलूया.

माणसाचे सगळ्यात मोठे सहा शत्रू म्हणजे काम क्रोध मद मत्सर उपाधी लोभ. समर्थ म्हणतात मदे मत्सरे सांडीला स्वार्थ बुद्धी तर हा मद म्हणजे काय....? मद म्हणजे स्वतःला काहीतरी मोठं आहे असं समजणं किंवा तसंच आपण ते समाजात दाखवत राहतो. प्रत्यक्षात आपण तितके मोठे नसतोही. पण जे काही असतो ते त्याचाही पेक्षा मोठं करून आपण समाजात दाखवत राहतो.

अगदी साधंच उदाहरण बघायचं म्हणलं तर एका सोसायटीमध्ये हेमंतराव राहायला आले. ऐटीत राहणं, फिरणं, बोलणं... पण ते कुणाशीही बोलत नसत... येणारे जाणारे समवयस्क मंडळी त्यांना नेहमी नमस्कार करायचे.... पण ते कुणाशीही बोलायचे नाहीत. तेवढ्यापुरतं हलकेसे स्मित चेहऱ्यावर .....पण कोणाशीही ते बोलत नसत. पण एकदा असं झालं की प्रभात फेरीला त्यांना थोडे बागेत अस्वस्थ वाटू लागले आणि घामाघुम होत जेव्हा बाकावर बसले तेव्हा तिथून जाणारे एका समवयस्क व्यक्तीने त्यांना मदत करून घरी पोहोचवून त्यांची काळजी घेतली. त्यामुळे त्यांच्याशी मात्र ते जरा बोलू लागले आणि बोलता बोलता त्यांनी सांगितले की मी शासकीय कार्यालयांमध्ये अशा अशा मोठ्या पदावर कार्यरत होतो. आणि आता निवृत्त झालो. समोरची व्यक्ती काहीच व्यक्त झाली नाही फक्त वा वा छान एवढेच म्हणले.

त्याही नंतर थोडे दिवस गेले मग त्यांनी ह्या दुसऱ्या व्यक्तीला म्हणजे श्रीकांतरावांना विचारले की तुम्ही काय करत होते आणि त्यांनी दिलेलं उत्तर ऐकून हे थोडेसे अंतर्मुख होऊन गेले. कारण श्रीकांतराव त्यांच्याच शासकीय कार्यालयामध्ये त्यांच्यापेक्षा चार वरच्या पदावर कार्यरत होते. आणि तिथून ते निवृत्त झालेले होते परंतु ते त्यांनी कधीही दर्शवलेले नव्हते. हेमंतराव मात्र आपल्या पदाच्या मदामधेच रमलेले होते.

तेव्हा श्रीकांत रावांनी त्यांना पुष्कळ व्यक्तींची ओळख करून दिली की जे त्यांच्यापेक्षाही कित्येक वरच्या पदावरती काम करून निवृत्त झालेले होते. पण एकदा निवृत्त झाल्यानंतर सुद्धा तुम्ही तुमच्या भूतकाळा मधल्या मोठाएकीला जर चिकटून राहिलात तर त्याला मद च म्हणतात.

**जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात**
**तारुण्याच्या मदे न मानी कोणासी ।**
**सदा मुसमुसी घुळी जैसा ॥१॥ तु.गा. २२५४**

म्हणजे काय तर तारुण्यामध्ये एखाद्या माजलेल्या बैलासारखा तरुणांमध्ये उत्साह असतो किंवा बळ असते. पण त्या तारुण्याच्या जोरावरती उन्मत्त होऊन तो कोणाचाही मान ठेवत नाही. म्हणजे त्याला मद असतो. इतकी साधी सोपी व्याख्या आहे मदाची.

मग मत्सर काय असतो हो....? अहो...तो तर ह्याच्यापेक्षाही वाईट. कारण दुसऱ्याचं चांगलं झालं तर जेव्हा अजिबात बघवत नाही आणि मनामध्ये ईर्षा निर्माण होते तेव्हा त्याला मत्सर म्हणतात. कार्यालयामध्ये काम करताना शेजारच्या टेबलवरच्या मॅडम अगदी वेळेवर कार्यालयात येतात.... त्यांची जायची वेळ ही नक्की नसते .... उशिरापर्यंत काम करतात.आपले काम सांभाळून त्या इतरांनाही मदत करत असतात. सतत कामात असतात आणि बॉस त्यांच्या शब्दाला फार मान देतात. आपण मात्र अकरा वाजता ऑफिसला पोहोचतो. आपल्याला वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेले काम व्यवस्थित जमू शकत नाही. कारण तेवढे ज्ञान आपल्या जवळ नसते. संध्याकाळी आपल्याला पाच वाजताच घरी जायचे वेध लागलेले असतात. चहा मध्ये पण आपला वेळ जातो. तरीपण आपल्याला असे वाटत असते की बॉसने मला दहा वेळा बोलवावे. अधिकाऱ्याने आपल्यावर खुश असावे. बॉस ने आपलेच ऐकावे.

पण असे नाही ना होत महाराजा.....!!! पण अशा वेळेस आपले काय होते की आपण मॅडमला काहीतरी नावे ठेवत असतो. आजूबाजूला बोलताना त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवतो. हा मत्सरच आहे गड्या...! आपल्याही मनाला माहिती असते की आपण योग्य काम करत नाही. तरी दुसऱ्याबद्दल जेव्हा ईर्षा मनामध्ये येते तेव्हा त्याला मत्सर म्हणतात.

**जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात**
**कोणाही जीवाचा न घडावा मत्सर ।**
**वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥३॥ तु.गा.२१**

अर्थात कोणाचाही मत्सर करू नये तरच तुमची पूजा देवापर्यंत पोहोचते. खरंतर मत्सर केल्याने आजपर्यंत कोणालाही काहीही मिळालेले नाही पण मत्सर केल्याशिवाय राहायचंच नाही हेच आपल्या मनाने पक्के ठरवलेले असते.

सद्गुरु डॉक्टर देशमुख काकांनी एक फार छान दृष्टांत सांगितला आहे. ते सांगतात, ते विठ्ठलाची पूजा करण्याकरता गेलेले असताना प्रवचनकार



आणि डॉक्टर असे दोघेही त्यांना भेटतात आणि दोघांनाही बघून त्यांच्या मनामध्ये राग यायला लागतो. कारण डॉक्टर हा त्यांचा व्यवसायातला वैरी आणि प्रवचनकार पारमार्थिक मार्गातला. तरीपण त्यांनी त्याच स्थितीत विठ्ठलाची पूजा केली आणि घरी पोहोचले .पण त्यांना स्वस्थ बसवेना. त्यांना वाटले की देवाला कळले असेल का मी पूजा केलेली आहे म्हणून..... ?दुसऱ्या दिवशी त्यांनी देवाला जाऊन विचारले मी काल हजार रुपयांची केलेली पूजा तुम्हाला कशी वाटली .....? विठ्ठल त्यांना म्हणाला पूजेच्या नावाने तू जी काय खुडबुड केलीस ती मला काही कळली नाही. पण तुझी जी तळपायाची आग मस्तकात गेली होती ती मात्र माझ्यापर्यंत नक्की पोहोचली. डॉक्टर काका म्हणतात सर्वांच्या हृदयात देव समान तत्वाने व्यापून आहे. हे शेकडो वेळा ऐकले असूनही कोणाविषयी मत्सर निर्माण होत असेल तर तो प्रत्यक्ष देवाचाच मत्सर केल्यासारखे होते. आणि म्हणूनच तुकाराम महाराजांचा हा अभंग मनाला पटतोच.

समर्थ म्हणतात जो निरहंकारी असून कधी कोणाचाही द्वेष करत नाही, ज्याने मनाचा कोतेपणा अथवा आकुंचितपणा टाकला आहे. त्याला संसाराचे बाह्य पाश नसतात आणि तो नेहमी नम्र आणि प्रसन्न वाणीच बोलतो आणि तो पुरुष भगवंतांचा सर्वोत्तम दास असतो. जगातील उत्कृष्ट भक्त होतो. म्हणजे मद मत्सर टाकून, द्वेष, स्पर्धा, स्वार्थ बुद्धी टाकून ,उपाधीचा त्याग करून नम्रपणे दुसऱ्याला प्रसन्न करणारे बोल जो बोलतो तर तो देवाचा सर्वोत्तम भक्त असतो. मुळात भगवंतापर्यंत जायचे तर चित्त शुद्ध हवे. ही चित्तशुद्धी येते कशाने ....?तर मद, मत्सर, उपाधी, मोह याचा त्याग केल्याने.... जसे कायिक तप केले जाते तसे वाचिक तप पण व्हयलाच हवे. तेव्हाच चित्तशुद्धीचा रस्ता मोकळा होतो. मग हे वाचिक तप म्हणजे काय....? तर नेहमी नम्र बोलावे पण नुसते नम्र बोलूनही चालत नाही. ते बोलणे सुवाचा असावे .... म्हणजे काय....? दुसऱ्याला प्रसन्न करणारे बोलणे असावे. दुसऱ्याबद्दल वाईट बोलणे जर आपण नम्रतेने बोललो तर त्याचा काय फायदा....? आणि ही नम्र सुवाचा माननिय आफळे बुवांनी फार सुंदर समजावून सांगितली. ते म्हणाले, समजा मी गाडी घेतली आणि माझ शेजारचे मला भेटायला आले आणि नम्रतेने मला म्हणाले आफळे बुवा, गाडी तर घेतली आहे पण संभाळून.... समृद्धी मार्गावर जाल तर टायर फाटून गाडीचा स्फोट होऊ शकतो. एका सेकंदात नम्र सुवाचा काय असते हे समजले. मंडळी तुम्हालाही समजले असेल ना....? की नुसते नम्र बोलणे योग्य नाही. नुसते नम्र बोलले म्हणजे नम्र बोलणे नव्हे तर जेव्हा सुवाचेने बोलले जाईल तेव्हाच त्याचा उपयोग आहे. आणि त्यानेच चित्तशुद्धी होऊ शकते. समर्थ म्हणतात उपाधी टाकायला पाहिजे. आता उपाधी म्हणजे काय हो ....?आपण आजूबाजूला बऱ्याचदा बघतो की मिळत आहे फुकट मिळत आहे म्हणून घेत राहायचे.... गरजेपेक्षाही जास्ती ....म्हणजे स्टेटस सांभाळायचे म्हणून आपण काही ना काही घेत राहतो आणि दाखवत राहतो.

रामकृष्ण परमहंसाने विवेकानंदांना जेव्हा आपले मानले तेव्हा त्यांना समजावून सांगितले राहायला निवारा लागतो ते छोटे घर आहे.... झोपण्यास एक चटई लागते.... पोटाला भुके पुरते अन्न लागते.... या व्यतिरिक्त जे जे आपण घेतो ती उपाधी... थोडक्यात अंग झाकण्या पुरता कपडा घेणे योग्य पण ब्रँड च्या मागे लागून त्याच ब्रँड चा कपडा मिरवण सुरू होतं तेव्हा ती उपाधी होते.

तुकाराम महाराज भगवंताची प्रार्थना करताना म्हणतात, उपाधिवेगळे तुम्ही निर्विकार काहीच संसार तुम्हां नाही

तुकोबाराय जेव्हा आपल्या जीवनासंबंधी विचार करतात तेव्हा त्यांच्या लक्षात येते की आपल्याला खूप दुःख आहे आणि परमात्मा मात्र आनंदधन आहे. असे का असावे बर....? तेव्हा त्यांच्या लक्षात येते की याचे कारण उपाधी होय. आपण उपाधीवान आणि तो भगवंत भाग्यवान उपाधी वेगळा आहे. आपणही जर उपाधी विरहित झालो तर भगवंताच्या चरणी आपल्याला नक्की राहता येईल. मदे मत्सर सांडीला याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे महाभारतात राजसुय यज्ञात श्रीकृष्णाने येणाऱ्या भक्तांची उष्टी पाने उचलली. यापेक्षा अजून मोठे उदाहरण काय मिळू शकते उपाधीचे....?

स्वतःची उन्नती करून घ्यायची असेल तर कायिक आणि वाचिक दोन्ही तप करायला हवे. नम्रपणे आणि मधाळ बोलणे यासह भक्ती केली तर देव दूर नाही आणि अध्यात्मिक प्रगती तर बिलकुल दूर नाही. खरं म्हणजे मनातले हे सहाही विकार नरकाची द्वारे आहेत आणि म्हणून चित्तशुद्धीसाठी याचा त्याग करायलाच हवा.

विठ्ठल चरणी एवढीच प्रार्थना की चित्तातले मद मत्सर टाकून वाचेने हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणण्यासाठी सगळ्यांचेच नामचिंतन होत राहावे.

राम कृष्ण हरी

# याची देही याची डोळा, पाहिला साहित्य जगतचा साहित्य सोहळा...



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**१ ऑक्टोबर २०२३रविवार रोजी साहित्य जगत मासिकाचे प्रथम साहित्य संमेलन कविश्रेष्ठ ना.घ.देशपांडे मेहकर साहित्य नगरीत उत्साहात पार पडले.मे.ए.सो. कला वाणिज्य महाविद्यालयातील सभागृहात साहित्य संमेलनाचा हा सोहळा अगदी थाटामाटात संपन्न झाला. साहित्य जगत मासिक सुरू होऊन अवघे तीन महिने झाले. जुलै महिन्यात साहित्य जगत मासिकाचा पहिला अंक साहित्य रसिकांच्या हाती आला आणि ऑगस्ट महिन्यात साहित्य जगत मासिकाचे साहित्य संमेलन घेण्यात यावे असा विचार साहित्य जगतचे अतिथी संपादक मा. श्री. भगवान राईतकर सरांच्या मनात आला.या विचारानुसार अवघ्या एका महिन्यात अगदी यशस्वी असे साहित्य संमेलन घेण्यात आले. या साहित्य संमेलनातील काही आठवणींना उजाळा देण्याचा हा छोटासा प्रयत्न...**

भगवान राईतकर साहित्य मित्र मंडळा अंतर्गत मागच्या वर्षी नोव्हेंबर महिन्यापासून या परिवारात सहभागी होण्याची संधी मिळाली. पाठवणी ही माझी कविता प्रथमच दै. विश्वजगत मध्ये प्रसिद्ध करण्यात आली.त्यानंतर अनेक कविता व राईतकर सरांनी सुचवल्याप्रमाणे "मराठी साहित्यातील माहेरचे वर्णन करणाऱ्या कविता- "या विषयावर आधारित १५ लेख तसेच इतर विविध विषयांवर अनेक लेख दैनिक विश्व जगत व दैनिक सेवाशक्ती वर्तमानपत्रात प्रकाशित होऊ लागले. प्रकाशित साहित्याला वाचकांकडून अनेक प्रतिक्रिया मिळत गेल्या. हे सर्व माझ्यासाठी खूप प्रेरणादायी होते. अशातच सरांनी मासिक सुरू करण्यासंदर्भात माहिती दिली. सरांच्या प्रेरणेतून अनेक साहित्यिक साहित्य जगत परिवारात सहभागी झाले व अजूनही होत आहेत. या सर्व साहित्यिकांनी दाखवलेला उत्साह आणि अतिथी संपादक मा.श्री. भगवान राईतकर सर तसेच मुख्य संपादिका सौ.गीता राईतकर वहिनी यांच्या प्रेरणेतून साहित्याला समर्पित असणारे साहित्य जगत हे मासिक आपल्या सर्वांच्या हाती आले.सर्व साहित्यिकांच्या दर्जेदार साहित्यामुळे अल्पावधीतच साहित्य जगत मासिकाचे नाव प्रसिद्ध होतांना पाहून मनस्वी आनंद होत आहे.

साहित्य जगत मासिकाचे प्रथम साहित्य संमेलन घेण्याचा विचार जेंव्हा सरांनी आमच्यापुढे मांडला. तेंव्हा खरोखरच खूप आनंद झाला. ठरलेल्या विचाराप्रमाणे सर्व जबाबदाऱ्या सांभाळत सरांनी साहित्य संमेलनाचे हे खूप कठीण असे कार्य अगदी यशस्वी पार पाडले. परभणी येथील माझी साहित्यिक मैत्रीण सौ. सुवर्णाताई मुळजकर व भाऊजी श्री. व्यंकट (अनिल) मुळजकर यांच्या सोबत या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले. परभणी ते मेहकर हा तीन -साडेतीन तासांचा प्रवास करत आम्ही दहा वाजता मेहकर नगरीत पोहोचलो. संमेलन स्थळी गेल्यानंतर झालेले आमचे स्वागत आमच्यासाठी खूप आनंददायी होते. पहिल्या सत्रात ग्रंथदिंडीने कार्यक्रमाला सुरुवात झाली. उत्साहात पार पडलेल्या या ग्रंथदिंडीत ग्रंथ पूजनाबरोबर फुगड्याही खेळण्यात आल्या. ग्रंथदिंडी ,ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ विक्री ,उद्घाटन सोहळा, स्नेह भोजन,कथाकथन , कवी संमेलन शेवटी समारोप असे साहित्य संमेलनाचे एकूण स्वरूप होते. ठरलेल्या नियोजनानुसार सर्व कार्यक्रम अगदी वेळेवर सुरू झाले. दुसऱ्या सत्रात साहित्य संमेलनाचे उद्घाटन उद्घाटक चाफेश्वर गांगवे (सुप्रसिद्ध कवी निवेदक) रिसोड यांच्या हस्ते कवीश्रेष्ठ ना.घ.देशपांडे यांच्या प्रतिमेचे व ज्ञानेश्वरी तथा ग्रामगीतेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक सुभाष किन्होळकर (बुलढाणा), स्वागताध्यक्ष प्राचार्य गणेशजी परिहार (मे.ए.सो. कला ,वाणिज्य महाविद्यालय) मेहकर, निमंत्रक श्री. गजानन काटे (मुख्य संपादक दै. विश्वजगत तथा वैदेही ग्राफिक्स अँड पब्लिकेशन अकोला), यांच्यासह श्री. पुष्पराज गावंडे (सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ)अकोला, प्रा. देवबा पाटील (सुप्रसिद्ध साहित्य )खामगाव, सौ.गीता भगवान राईतकर (मुख्य संपादिका- साहित्य जगत)इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहित्य जगत मासिकाचे अतिथी संपादक मा.श्री. भगवान राईतकर यांनी केले. सर्व मान्यवरांचा सन्मानपत्र,शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या सत्कार सोहळ्यानंतर साहित्य जगत व साहित्य माणिक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. किरण डोंगरदिवे



यांना साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी साहित्य जगत साहित्य भूषण पुरस्कार, मेहकर येथील डॉ. विजय चऱ्हाटे यांना साहित्य जगत सेवा भूषण पुरस्कार, वाचन चळवळ कार्यसाठी प्रा. सचिन सावरकर यांना साहित्य जगत वाचन चळवळ भूषण पुरस्कार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शिवाजी शिंदे, सोलापूर यांच्या 'अंतःस्थ हुंकार 'या काव्यसंग्रहास साहित्य माणिक पुरस्कार, शकुंतला शिंदे पुसेगाव,जि. सातारा यांना' संघर्ष,या आत्मकथनासाठी साहित्य माणिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मा.श्री.भगवान राईतकर व सौ.गीता राईतकर यांना वैदही ग्राफिक्स अँड पब्लिकेशन्स ,अकोला यांच्या वतीने श्री. गजानन काटे यांनी गौरवपत्र देऊन सन्मानित केले .सन्माननीय पत्रकारांचा तसेच साहित्य संमेलनासाठी देणगी देणाऱ्या दात्यांचाही सन्मान याप्रसंगी करण्यात आला. साहित्य जगत मासिकाच्या साहित्य संमेलन विशेषांकाचे प्रकाशन याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर उद्घाटक चाफेश्वर गांगवे यांच्यासह मंचावरील सर्वच मान्यवरांनी आपले साहित्यिक विचार व्यक्त केले. संमेलनाध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक सुभाष किन्होळकर यांनी,"साहित्य जगत च्या वतीने होत असलेले हे साहित्य संमेलन म्हणजे मेहकर नगरीची वैभव शलाका असल्याचे प्रतिपादन केले." तसेच साहित्यिकांनी नेमकं कोणतं साहित्य लिहावं याविषयी ठोस काही सांगता येत नाही मात्र साहित्यिक हा काळाच्या प्रवाहाला आपलंसं करणारा असतो. असे मतही आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन सिद्धेश्वर पवार व प्रा. विजयश्री सावजी यांनी केले. संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यानंतर उपस्थित सर्व मान्यवर व साहित्य रसिक- श्रोत्यांसाठी रुचकर स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. आग्रह व आपुलकी बरोबरच वरण, भात, पोळी, गुलाबजाम, पापड,विदर्भ पद्धतीची खास पाटवडी रस्स्याची झणझणीत भाजी, काकडी, कांदा,लिंबू, लोणचे इ. पदार्थांच्या मेजवानीचा आस्वाद उपस्थितांनी घेतला. मध्यान भोजनाच्या नंतर लगेचच संमेलनाच्या तिसऱ्या सत्रास म्हणजेच कथाकथनास प्रारंभ झाला. कथाकथनाच्या या सत्रास अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कथाकार श्री. अरविंद शिंगाडे(खामगाव) लाभले होते. परभणी येथील प्रसिद्ध साहित्यिक सौ. सुवर्णाताई मुळजकर यांनी 'कला ', प्रा. वसंत गिरी ,मेहकर यांनी 'बाल सुभाष', डॉ. प्रा. श्रीहरी पितळे, मेहकर यांनी '... आणि कंचनी दगड झाली', अध्यक्ष अरविंद शिंगाडे यांनी 'दानोळा' या कथा आपल्या खास शैलीत सादर केल्या. सर्व मान्यवर कथाकारांचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन जयश्री कवीमंडन व आभार ज्ञानदेव मानवतकर यांनी मानले. संमेलनाच्या चौथ्या सत्रास म्हणजेच कवी संमेलनासही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कवी -कवयित्री व रसिक श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कवी संमेलनाला प्रसिद्ध कवी डॉ .विजय काळे अध्यक्ष म्हणून लाभले होते. याप्रसंगी प्रसिद्ध कवी पा.मा. गायकवाड, सत्यनारायण सौभागे, सर्जेराव चव्हाण, प्राचार्य आर. डी. पवार, विष्णू जोशी इ. मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. संमेलनाध्यक्ष सुभाष किन्होळकर यांनी, 'चिंगी भिंगी' ही बालकविता सादर केली. नाशिक येथील सुभाष उमरकर यांनी'कुणी कवी घ्या कुणी लेखक घ्या', शिवजन्मभूमी शिवजन्मभूमी जुन्नर येथील कवयित्री सरिता कलढोणे यांनी 'बाप माझा' ही गझल, परभणी येथील कवयित्री सौ. सुवर्णा मुळजकर यांनी 'घरटे', तसेच सौ.शारदा वानखेडे यांनी मणिपूर घटनेवर आधारित," लाज जरा ना वाटली", तेल्हारा येथील संगीता सोनटक्के यांनी सैनिक, जालना येथील आशा भावसार यांनी 'कशी सांगू माझी व्यथा?',हिंगोलीचे कलानंद जाधव यांनी 'दिंडी', अकोल्याच्या रामराव पाटेखेडे यांनी,'उपवर युवकांच्या व्यथा', शाहीर ईश्वर मगर यांनी 'जय जवान शूरा', संभाजीनगरचे राहुल इंगोले यांनी 'बाप', प्रा. सुभाष मगर यांनी 'जळली नाही', विकास सुखधाने यांनी 'चाललो' ज्ञानेश्वर गाडे यांनी' मागणी' शिवप्रसाद थुट्टे यांनी, 'रेशीमगाठ', पुरुषोत्तम चौरे यांनी 'गर्भपात', भारत दुतोंडे यांनी 'शब्दसाद',कु. संबोधी गवई (बालकवयित्री) 'महिला',प्रा. अशोक सारडा यांनी 'कुऱ्हाडीचा दांडा', सत्यनारायण सौभागे यांनी 'अध्यात्मिक जीवन', प्रा. विजयश्री सावजी यांनी 'कवडसा', नागेश कांगणे यांनी 'गाव', किसन पिसे यांनी 'बा विठ्ठला', प्राचार्य आर. डी. पवार यांनी 'नवे काही', संजय भारती यांनी 'अंधारला सूर्य,इ. कविता सादर करण्यात आल्या.

याशिवाय साहित्य संमेलनाला उपस्थित असलेल्या काही कवी -कवयित्रींनीही सहभाग घेतला एकूण ३५ कवी -कवयित्रीनी आपल्या खास शैलीत विविधांगी काव्यरचना सादर करत काव्य रसिकांना मंत्रमुग्ध केले. सर्व सहभागी कवी -कवयित्रींचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.वेळेअभावी काही कवीं- कवयित्रींच्या कवितांचा आस्वाद आम्ही घेऊ शकलो नाही ही खंत मनातच राहिली.

संमेलनाच्या यशस्वीतेसाठी साहित्य जगत मासिकाचे अतिथी संपादक मा.श्री.भगवान राईतकर सर, मुख्य संपादिका सौ.गीता राईतकर, कार्यकारी संपादक श्री. रामदास राजेगावकर सर, अध्यक्ष संमेलन स्वागत समिती प्रा. वसंत गिरी सर, वितरण विभाग प्रमुख पत्रकार गणेश राऊत सर, मा. प्राचार्य गणेशजी परिहार सर,मा. गजानन काटे साहेब इ. मान्यवरांसह सर्व वर्गणीदार दाते, साहित्य जगत परिवारातील सर्व साहित्यिक मित्र- मैत्रिणी, राईतकर साहित्य मित्र मंडळातील साहित्यिक व ज्ञात अज्ञात अशा अनेक मान्यवरांनी परिश्रम घेतले. सर्वांच्या परिश्रमांची फलश्रुती म्हणून साहित्य जगत मासिकाचे प्रथम साहित्य संमेलन अगदी यशस्वीरित्या संपन्न झाले. संमेलनातील सुंदर आठवणी घेऊन आम्ही परभणीला परतलो. साहित्य जगत मासिकाच्या पुढील साहित्यिक वाटचालीला भरभरून शुभेच्छा... या पुढील काळातही साहित्य जगत मासिकाच्या माध्यमातून असेच साहित्य संमेलन घेण्यात यावेत व नवोदित साहित्यिकांना व्यक्त होण्याची संधी मिळावी हिच सदिच्छा...

# शूरवीर येसाजी कंक



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**मराठा साम्राज्याचे संस्थापक शिवाजी महाराज यांचे येसाजी कंक नावाचे बालपणीचे मित्र होते. राजगडाच्या पायथ्याशी कंकचा जन्म झाला. त्यांचे वडील दादोजी कंक यांनी शहाजीसाठी लढा दिला होता.शिवाजी महाराजांच्या सैन्यात, कंक पायदळ सैनिकांवर देखरेख करत असे आणि ते गनिमी रणनीतीमध्ये निपुण होते. शिवाजी महाराजांच्या निधनापर्यंत ते गादीवर एकनिष्ठ होते आणि प्रतापगडाच्या लढाईत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. कंक यांनी सदर परिषदेच्या बैठकीत भाग घेतला आणि शिवाजी महाराजांना मद्यधुंद हत्तीचा पराभव करण्यास मदत केली. महाराजांच्या सर्वात विश्वासू मित्रांपैकी एक होता येसाजी. ते सात फूट उंच होते अशी ख्याती आहे.**

येसाजी कंक यांचा जन्म जेथे राजगडाच्या अगदी टोकाला वसलेले आहे ते भुतोंडे हे गाव आहे. शिवाजी महाराज भुतोंडे येथील होते हे त्यांनी त्या पत्त्यावर लिहिलेल्या आणि मेल केलेल्या पत्रांवरून स्पष्टपणे स्पष्ट होते. "सरदार सरनोबत" म्हणून ओळखले जाणारे, त्यांनी १.३५ दशलक्षाहून अधिक माणसांच्या (मावळे) सैन्याचे नेतृत्व केले आणि १६०० मध्ये, भारताच्या चारही राज्यांनी त्यांच्या शौर्याचे साक्षीदार केले.

ते फोंडा किल्ल्यावर लढाईत गुंतला होते, त्यांचा मुलगा कृष्णाजी कंक गमावला होता, शिवाजी महाराजांच्या आग्रा दरबारात आणि तेथून प्रवासाची व्यवस्था केली होती आणि कुतुबशाहीसमोर मद्यधुंद हत्तीशी लढाई केली होती. त्यांच्या गावातील ऐतिहासिक वाड्यात त्यांचे वंशज आजही आहेत. महाराष्ट्रात, श्री रामभाऊ कंक हे त्यांनी घडवून आणलेल्या सर्व सुधारणा आणि प्रगतीसाठी प्रसिद्ध होते. त्यांच्या वंशजांमध्ये श्री.भगवानराव कंक, ज्यांना प्रेमाने काका कंक, श्री. शिवाजी महाराज भगवानराव कंक, श्री. राजेंद्र रामभाऊ कंक, श्री. शशिकांत रामभाऊ कंक, श्री. संजय रामभाऊ कंक, आणि श्री. रामभाऊ कंक, दिवंगत श्री. रामभाऊ कंक यांचा समावेश होतो.


उत्कट योद्धा असण्याबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज ही स्वराज्याची व्याख्या होती. त्यांच्या व्यवस्थापकीय पराक्रमाची तुलना समकालीन राम-राज्याशी केली गेली आहे. ते १५ वर्षांचे होते तेव्हापासून, शिवाजी महाराज अथकपणे स्वराज्याचा पाठपुरावा करत आहेत आणि त्यांच्या धूर्तपणाने आणि धाडसाने हेंदवी स्वराज्याच्या स्थापनेत मदत केली आहे.

शिवाजी महाराजांच्या विजयामागील कमी ज्ञात नायक, तथापि, येसाजी कंक, तान्हाजी मालुसरे आणि बहरीजी नाईक यांच्यासह त्यांचे विश्वासू सेनापती होते. या लढवय्यांचे कर्तृत्व, त्याग आणि स्वराज्यासाठीची अतूट निष्ठा अतुलनीय आहे.

१६०० च्या दशकातील आतापर्यंतच्या सर्वात शक्तिशाली व्यक्तींपैकी एकाबद्दल आपण आज वाचू, ज्यांनी आश्चर्याची गोष्ट म्हणजे, शिवाजी महाराजांच्या सैन्यात सेनापती म्हणूनही काम केले. शिवाजी महाराजांची लहानपणी येसाजी कंकशी मैत्री झाली. या दोघांनाही किशोरवयातच हेंदवी स्वराज्य स्थापन करण्याची आकांक्षा होती. शिवाजी महाराज अवघ्या १५ वर्षांचे असताना त्यांनी हे लक्षात घेऊन सैन्य तयार केले. येसाजींना "शिलेदार" ही सन्माननीय पदवी आणि पद मिळाले आणि त्यांना पायदळ सैनिकांचा सेनापती म्हणून नियुक्त करण्यात आले. तेव्हापासून त्यांनी मातृभूमीच्या वेदीवर, जाड आणि पातळ माध्यमातून आपले संपूर्ण जीवन अर्पण केले आहे.तरुण मुलांना लढाईसाठी सज्ज पुरुष बनवण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. शिवाय, येसाजी सैनिकांना गनिमी युद्धाचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक होते, जे नंतर मराठ्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आले.

रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या भुतोंडे गावात येसाजी कंक यांचा जन्म कंक वंशातील क्षत्रिय कोळी कुटुंबात झाला. शिवाजी महाराजांचे वडील शाजी यांच्या सैन्यात त्यांचे वडील दादोजी कंक यांचा समावेश होता. त्यामुळे येसाजींचा जन्म त्यांच्यात आधीच राष्ट्रीयत्वाचा ध्यास होता. जसजसा ते मोठा होत गेले, तसतसे त्यांनी बलवान असण्याचे गुण आत्मसात केले, मोठे दुःख सहन करण्यास सक्षम असणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एखाद्या उद्देशासाठी अटल भक्ती असणे.

मग, किशोरवयातच, त्यांची शिवाजी महाराजांशी भेट झाली, ज्यांच्याशी ते शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले. शिवाजी महाराज यांना हेंदवी स्वराज्य निर्माण करायचे होते आणि येसाजींचा जीवनाचा आदर्श दृष्टीकोन होता. येसाजी कंक हे प्रतापगडच्या लढाईपासून



सुरू झालेल्या मराठा सैन्याच्या पायदळांची जबाबदारी सातत्याने सांभाळत होते. त्यांनी एका भव्य सैन्याची देखरेख केली ज्याने असंख्य लढायांमध्ये भाग घेतला आणि त्यांची योग्यता सिद्ध केली. प्रत्येक लढाई खरे तर अन्याय्य परिस्थितीवर लढली गेली. पण, येसाजी नेहमी नेत्रदीपकपणे विजय मिळवला ते गनिमी युद्ध म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रणनीतीमुळे जो मराठा सैन्याचा समानार्थी बनले! शिवाजी महाराज आणि येसाजीच्या जीवनातील सर्वात प्रसिद्ध घटनांपैकी एक म्हणजे कुतुबशाही सैन्याचा भाग असलेल्या वेड्या, मद्यधुंद हत्तीशी त्यांचा संघर्ष. शिवाजी महाराज आपल्या राज्याभिषेकानंतर स्थानिक मुस्लिम राजांना भेटण्यासाठी दक्षिणेकडे निघाला. सर्वांनी त्यांना आणि त्यांच्या सैन्याला नमस्कार करण्यासाठी हात पुढे केले आणि दक्षिणेतील त्यांचे श्रेष्ठत्व मान्य केले. शिवाजी महाराज यांना सहसा त्यांच्या विश्वासू सेनापतींनी वेढले होते, ज्यात येसाजीचा समावेश होता. त्यानंतर कुतुबशाहींनी शामियानात (तंबू) खाली विविध पारंपारिक लोककथा प्रदर्शित केल्या. त्याच क्षणी, त्यांनी शिवाजी महाराज यांना घाबरवण्यासाठी वेडा, मद्यधुंद, प्रशिक्षित हत्ती आणला. कुतुबशाईंनी शिवाजी महाराज यांना उपहासाने प्रश्न केला की त्यांच्या सैन्याकडे स्पर्धेसाठी हत्ती आहे की नाही. न डगमगता शिवाजी महाराजांने त्यांना आपल्या सैन्यातून कोणत्याही सैनिकाला स्पर्धेसाठी निवडण्याचा सल्ला दिला. परिणामी, काही फेऱ्यांच्या परीक्षेनंतर कुतुबशाहींनी येसाजी कंकवर लढाई करण्याचा निर्णय घेतला.

माँ भवानी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना नमन करून येसाजी रिंगणात उतरले. ५,००० किलोपेक्षा जास्त वजनाचा संतप्त हत्ती लगेच येसाजीवर चार्ज झाला. दोन तासांहून अधिक भयंकर लढाई झाली, दोन्ही बाजूंनी प्रत्येक कृतीचे कौतुक आणि निषेध केला. शेवटी येसाजीने आपल्या एकत्रित हातांनी (कुंभस्थळ) हत्तीच्या डोक्यावर प्रहार केला. पूर्वी कुतुबशाहीच्या स्वाभिमानाचा शक्तिशाली हत्ती काही मिनिटांत मरण पावला. त्यांचा अहंकार पूर्णपणे नष्ट झाला. असे येसाजी कंक यांचे कौशल्य होते. आपल्या पवित्र भूमीत कायद्याचे रक्षण करण्यासाठी आणि स्वराज्य (स्वातंत्र्य) आणण्यासाठी आपल्या योद्ध्यांनी केलेले बलिदान आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

# शिक्षणाच्या खाजगीकरणाचे घातकी षडयंत्र

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ३२

गेल्या ६ सप्टेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाने कंत्राटदाराकडून कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती करण्याचा आदेश काढला आहे. या आदेशाला विरोध दर्शवून मराठवाडा शिक्षक संघाच्या जालना जिल्हा शाखेने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांना एक निवेदन दिले आहे. त्या निवेदनात म्हटले आहे की, "शिक्षण महागडे करणारा व दुर्बलांना शिक्षण नाकारणारा हा शासन आदेश शिक्षणाचे कंपनीकरण करणारा आहे. महाराष्ट्र शासनाने त्याचा फेरविचार करून असा जाचक व घातक शासन आदेश रद्द करावा अन्यथा तीव्र आंदोलन करू!" अशा आशयाचे निवेदन दिले आहे.

६ सप्टेंबर २०२३ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार शासकीय, निमशासकीय सेवेतील अभियंत्यापासून सेवक पदापर्यंतची १३८ पदे कंत्राटदारांकडून भरण्यात येणार आहेत. या शासनादेशात शिक्षकांचा समावेश " कुशल मनुष्यबळ" वर्गवारीत करुन महाराष्ट्र राज्यातील डी.एड्. , बी.एड्., त्यासोबतच टीईटी, अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी, पदवी, आदी पात्रताधारक शिक्षकांची पदे कंत्राटी संस्थेच्या माध्यमातून भरण्यात येणार असल्यामुळे साहजिक त्यांच्या मानधनालाही कात्री लागणार आहे. मी पगार हा शब्द यासाठी वापरलेला नाही की, पगार हा वाढत जाणारा असतो ; मात्र मानधन कंत्राटदाराच्या हातात असेल व त्या मानधनात ते कपातही करू शकतात म्हणून मानधन.

शिक्षकांची भरती करण्याचे अधिकार कंत्राटदारांना जर देण्यात येत असतील तर... शाळाच कंत्राटदारांना चालवायला दिलेल्या आहेत असा त्याचा अर्थ. म्हणजे नकळत आरक्षणाचा प्रश्न संपवून टाकलेला आहे. म्हणून या प्रक्रियेला शिक्षणाचे खाजगीकरण म्हणायला हरकत नाही. यासाठी प्रा. शितल भगवानसिंग अहिरे यांनी आपल्या शोधपत्रिकेत (पृष्ठ क्र.१६१) नोंदवलेल्या खाजगीकरणाच्या व्याख्येचा आधार घेता येईल. त्या लिहितात, "सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाच्या मालकीत किंवा व्यवस्थापनात खाजगी व्यक्तींना किंवा उद्योजकांना सहभागी करून घेण्याची प्रक्रिया म्हणजे खाजगीकरण होय.!" याच लेखात त्या पुढे शिक्षणाच्या खाजगीकरणाची आधुनिक व्याख्या करतात," शिक्षणाचे मोठे मोठे मॉल उभे करून त्यात आकर्षक वस्तुंची मांडणी करावी आणि त्यातील प्रत्येक वस्तु प्रत्येकाला हवीहवीशी वाटावी," हेच ते खाजगीकरण. मॉलमध्ये हवीहवीशी वस्तु वाटणारा कोण असेल तर तो ग्राहक असेल. ग्राहक कोण असेल तर पालक व विद्यार्थी असेल. हे जर या शिक्षणाच्या मॉलमध्ये ग्राहक असतील तर ग्राहकांकडून नफ्याचीच अपेक्षा केली जाईल. अशी असेल शिक्षणाच्या खाजगीकरणाची परिस्थिती. अशा परिस्थितीत उपेक्षित, वंचित, दुर्बल समाजापुढे खाजगीकरणात आपण कुठे असणार ? व कसे टिकणार ? हा प्रश्न असेल, किंबहुना हे आव्हानच असेल..!

येणाऱ्या काळातील शिक्षणाची अनिवार्यता येणाऱ्या काळात श्रीमंतांच्या, मध्यमवर्गीयांच्या किंवा गरिबांच्या पिढ्यांना शिक्षण घ्यावेच लागणार आहे. त्याशिवाय त्या पिढ्या नीटपणे किंवा सामान्यपणे उदरनिर्वाह सुद्धा करू शकणार नाहीत. कारण शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे तो येणाऱ्या विज्ञानयुगात अनिवार्यच असेल..!

जसा शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे, तसा तो समाजाचाही तिसरा डोळा असेल. शिक्षण आणि समाज खरेतर ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समजा नाण्याच्या मूल्यांकनाची एक बाजू मुद्रित आहे व दुसरी बाजू अगदी कोरी असेल तर ते नाणे खोटे ठरवले जाते किंवा बाजारात त्याचे मूल्य अगदीच शून्य ठरते. तशीच माणसाची व समाजाची किंमत ठरविली जाते म्हणून माझ्या मते समाज आणि शिक्षण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

शिक्षणाशिवाय जगत असलेला समाज म्हणजे डोळे नसलेला माणूस होय ! म्हणून जो समाज शिक्षित असतो तोच समाज ज्ञानी असतो आणि जो समाज ज्ञानी असतो तोच समाज प्रगत किंवा सुधारलेला असतो. आज एकुणच भारतीय समाजापुढे अनेक आव्हाने आहेत. ती आव्हाने स्वीकारण्यासाठी सर्वांगीण शिक्षणाची गरज आहे, म्हणून त्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संपूर्ण राष्ट्र शिक्षित असावे लागेल ! राष्ट्रापुढे निर्माण होणाऱ्या जागतिक प्रश्नांना तोंड द्यावयाचे असेल तर यापुढे शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही. कारण शिक्षण हे अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढून प्रकाशाच्या दिशेने घेऊन जाते. म्हणून शिक्षण किंवा ज्ञान म्हणजे प्रकाश आणि अज्ञान म्हणजे अंधकार होय ! कोणत्याही माणसाला किंवा समाजाला नवी दृष्टी किंवा नवा दृष्टिकोन जर कशाने येत असेल तर तो शिक्षणाने येतो. शिक्षणाने प्रगतीच्या नव्या वाटा सापडतात. जो समाज शिक्षित असेल त्याचे राहणीमान, त्याची वागणूक त्याची संस्कृती आदर्शवत असते. म्हणून प्रगत आणि आदर्श समाज निर्माण करावयाचा असेल तर राष्ट्रीय स्तरावर शिक्षणाचा प्रचार, प्रसार करणारी माध्यमे वाढवली पाहिजेत. म्हणजे ती राज्य सरकारने व केंद्र सरकारने वाढवली पाहिजेत. हे त्या त्या राज्याच्या, राष्ट्राच्या सरकारचेच काम आहे. भारतातील प्रत्येक राज्याने प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाचा,उच्च शिक्षणाचा प्रचार-प्रसार करून भारत हे राष्ट्र शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या प्रगत करण्याचे आव्हान आज भारतीय समाजापुढे आहे. कोणत्याही राष्ट्राची सर्वांगीण प्रगती ही केवळ शिक्षणानेच होते. म्हणून भारत सरकारने के.जी. टू पी.जी. शिक्षण मोफत व सक्तीचे केले पाहिजे. राष्ट्रातील संपूर्ण समाज शिक्षित झाला तरच राष्ट्र बलवान होईल. म्हणून बौद्धिकदृष्ट्या सुदृढ व बलशाली समाज निर्माण करावयाचा असेल तर संपूर्ण समाज हा बौद्धिक, व्यवसायिक, तांत्रिक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावा लागेल व गुणवत्तापूर्ण उच्चविद्याविभूषित



करावा लागेल. त्यासाठी शिक्षण मोफत व सक्तीचे करणे गरजेचे आहे. आजही तांडा, वाडी, वस्तीत, गावाजवळ पाल ठोकून राहणारा, अनेक शहरात उड्डाण पुलाखाली राहणारा.. भारतातील उपेक्षित,वंचित, दुर्बल समाज अद्याप शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात नाही, म्हणजे अजूनही तो शिक्षणापासून कोसो दूर आहे. त्यासाठी शिक्षणाचा प्रचार-प्रसार व शिक्षणाची सक्ती करण्याची फार मोठी गरज आहे.

**शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार :** बहुसंख्य भारतीय समाज अंधश्रध्देत अडकलेला आहे. हा भारतीय समाज अंधश्रध्देच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी सर्वच राज्यात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्याची गरज आहे. तांडा,वाडी, वस्तीपर्यंत शिक्षणाचा प्रचार- प्रसार करण्यासाठी सर्व माध्यमांचा वापर करावा लागेल. जेणेकरून भारतातील तळागाळातला गरीब माणूस समाज व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात येईल आणि राष्ट्रातील गरीबी दूर होईल. मात्र आज बहुतांशी भारतीय समाज हा जातीभेद, धर्मभेद, धर्मांधता,कर्मकांड व अंधश्रद्धेकडे झुकत चाललेला दिसून येत आहे. याला इथली देववादी व दैववादी समाजव्यवस्था कारणीभूत आहे. देशात चालू असलेले धर्मांध सत्ताकारण कारणीभूत आहे. धर्मांध राजकारण कारणीभूत आहे. त्यातही जर राजकीय नेते व्यापारी असतील तर ते केवळ व्यापाराला महत्व देतील. व्यापार आला की, नफा-तोट्याचा विचार येतो. मग प्रत्येक बाबतीत सरासरी नफ्याचाच विचार पुढे येतो आणि समाजातील समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. प्रत्येक समाजाच्या प्रत्येक घटकांकडून वेगवेगळ्या नफ्याचीच अपेक्षा केली जाते. या नफ्यापुढे समाजातील हुशार, निस्वार्थी लोक, खरे संत, समाजसुधारक, तंत्रज्ञ, कलावंत, विद्वान, विशेष खेळाडू, विचारवंत, शास्त्रज्ञ, वैज्ञानिक या महत्वाच्या लोकांकडे दुर्लक्ष केले जाते, खरेतर या लोकांमुळेच देशाची ओळख असते. हेच लोक देशाचे सांस्कृतिक वैभव असतात. इतर देश भारताची स्तुती धर्मामुळे किंवा जातीमुळे करत नसून शास्त्रज्ञांनी "चांद्रयान- 3 "हे यान चंद्रावर यशस्वीपणे उतरवून नावलौकिक मिळवला आहे, म्हणून स्तुती करतात. ही कामगिरी शास्त्रज्ञांची आहे. मात्र अशा विद्वान वर्गाकडे व सर्वांगीण शिक्षणाकडे जर सरकार दुर्लक्ष करीत असेल तर समाजात अधिकाधिक कामगार तयार होतील. राष्ट्रात केवळ कामगारांचीच संख्या वाढवली तर या देशाला कामगारांचा देश असे संबोधन लावले जाईल. म्हणून राज्यकर्त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण देण्याचा हेतू ठेवावा. तसा निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी.

**शिक्षणाच्या खाजगीकरणाचा दृष्टिकोन घातक :** जर राज्यकर्तेच व्यापारी वृत्तीचे असतील तर त्यांना केवळ नफ्याचीच गणिते दिसतात. भारतात सध्या व्यापारी वृत्तीचे राजकीय नेते असल्यामुळे त्यांचे सर्वस्तरावर सार्वजनिक मालमत्तेचे खाजगीकरण करणे सुरू आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारने नुकताच शिक्षणाच्या खाजगीकरणाचा आदेश जाहीर केला आहे. अनेक शाळा ह्या कंत्राटदारांना कंत्राटी पद्धतीने चालवायला दिल्या आहेत. वर सांगितल्याप्रमाणे अशा पद्धतीने कंत्राटदारांना शाळा चालवायला दिल्यास कंत्राटी कर्मचारी, कंत्राटी कामगार निर्माण होणार, ते शिक्षक नसतील, तर ते कंत्राटी कामगार असतील. या कंत्राटी कामगारांना अज्ञानी असलेला कंत्राटदार पावला पावलांवर वेठीस धरेल. प्रत्येक बाबतीत शोषण करेल आणि या शोषित कामगार शिक्षकांची गुलाम असलेली मानसिकता विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यात अपयशी ठरेल. विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडेल. सध्या जशा खाजगी इंग्रजी शाळा पालकांना वेठीस धरुन पैशांची लूट करतात तसेच प्रत्येक गोष्टीसाठी पालकांचेही आर्थिक शोषण केले जाईल आणि कंत्राटदार फक्त पैशाच्या नफ्याचा हिशोब करत बसतील..! यात शैक्षणिक गुणवत्तेचा प्रश्नच येणार नाही. कारण विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या तिघांचीही मानसिकता खराब झालेली असेल. याद्वारेच सामाजिक स्वास्थ्य बिघडेल, याला कारणीभूत असेल शिक्षणाचे खाजगीकरण..!

# गुरू गोविंद सिंग

आधुनिक केसरी

**श्री गुरू गोविंद सिंह हे शिखांचे दहावे आणि अंतिम 'देहधारी गुरू' होत. त्यांनी शिखांचा पवित्र धार्मिक ग्रंथ गुरू ग्रंथ साहिबचे संकलन आणि लिखाण केले. गुरू गोविंद सिंह यांचा आदेश: 'सब सिखन को हुकूम है, गुरू मान्यो ग्रंथ' (सर्व शिखांना असा हुकूम आहे की गुरू ग्रंथ साहिब लाच आपला गुरू माना). नांदेड शहरात गुरू गोविंद सिंह यांच्या समाधी वर बांधलेला गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हुजूर अबचलनगर साहिब आहे. यामुळे नांदेडला शिखांची काशी असे म्हटले जाते. आजही पंजाबसह अनेक ठिकाणाहून शीख लोक नांदेडला गुरूद्वाऱ्यात भेटी देण्याकरीता येतात. गुरू गोविंद सिंग यांनी पवित्र धर्मग्रंथ (ग्रंथ) गुरू ग्रंथ साहिब पूर्ण केला आणि त्यांना गुरू म्हणून पवित्र केले. बचित्तर नाटक हे त्यांचे आत्मचरित्र आहे. त्याच्या जीवनाविषयी माहितीचा हा सर्वात महत्त्वाचा स्त्रोत आहे.**

. तो दशम ग्रंथाचा एक भाग आहे. दशम ग्रंथ (ग्रंथ), हे गुरू गोविंद सिंग यांच्या कृतींच्या संकलनाचे नाव आहे. अन्याय, अत्याचार आणि पापांचा अंत करण्यासाठी आणि गरिबांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी मुघलांशी 14 युद्धे केली. त्यांनी धर्मासाठी संपूर्ण कुटुंबाचा त्याग केला, ज्यासाठी त्यांना 'सर्बंसदानी' (संपूर्ण कुटुंबाचा दाता) असेही म्हणतात. याशिवाय ते कलगीधर, दशमेश, बजनवाले इत्यादी अनेक नावांनी, आडनावांनी आणि उपाधींनीही ओळखले जातात. गुरू गोविंद सिंग हे जगाच्या यज्ञपरंपरेत अद्वितीय असले तरी ते स्वतः एक महान लेखक, मूळ विचारवंत आणि संस्कृतसह अनेक भाषांचे जाणकार होते. त्यांनी स्वतः अनेक ग्रंथ रचले. ते विद्वानांचे आश्रयदाते होते. त्यांच्या दरबारात 52 कवी आणि लेखक उपस्थित होते, म्हणूनच त्यांना 'संत शिपाही' असेही संबोधले जात असे. तो भक्ती आणि शक्तीचा अनोखा मिलाफ होता. त्यांनी नेहमीच प्रेम, सदाचार आणि बंधुत्वाचा संदेश दिला. गुरुजींना कोणी दुखावण्याचा प्रयत्न केला तरीही त्यांनी त्यांच्या सहनशीलतेने, गोडपणाने आणि सौम्यतेने त्यांचा पराभव केला. माणसाने कोणाला घाबरायचे नाही आणि कोणाला घाबरायचे नाही अशी गुरुजींची श्रद्धा होती. तो आपल्या भाषणात उपदेश करतो, भाई काहूला देत नाही, भीती मानत नाही. ते लहानपणापासूनच साधे, सोपे, भक्ती कर्मयोगी होते. त्यांच्या बोलण्यातला गोडवा, साधेपणा, सौजन्य आणि अनास्थेची भावना संहितेने भरलेली होती. धर्माचा मार्ग हाच सत्याचा मार्ग असतो आणि सत्याचा नेहमी विजय होतो हे त्यांच्या जीवनातील पहिले तत्वज्ञान होते. गुरू गोविंद सिंग यांच्या नेतृत्वाने शीख समाजाच्या इतिहासात अनेक नवीन घडामोडी घडवून आणल्या. 1699 मध्ये बैसाखीच्या दिवशी त्यांनी खालसा, शिख धर्माच्या विधिवत आरंभ केलेल्या अनुयायांचे सामूहिक स्वरूप तयार केले. शीख समाजाच्या सभेत त्यांनी सर्वांसमोर विचारले - "कोणाला मस्तकाचा बळी द्यायचा आहे"? त्याच वेळी एका स्वयंसेवकाने हे मान्य केले आणि गुरू गोविंद सिंग त्यांना तंबूत घेऊन गेले आणि काही वेळाने रक्ताने माखलेली तलवार घेऊन परतले. गुरूंनी त्या गर्दीतील लोकांना पुन्हा तोच प्रश्न विचारला आणि त्याच प्रकारे दुसरा एक व्यक्ती सहमत झाला आणि त्याच्याबरोबर गेला पण जेव्हा तो मंडपातून बाहेर आला तेव्हा त्याच्या हातात रक्ताने माखलेली तलवार होती. त्याचप्रमाणे जेव्हा पाचवा स्वयंसेवक त्याच्याबरोबर तंबूच्या



आत गेला तेव्हा काही वेळाने गुरू गोविंद सिंग सर्व जिवंत सेवकांसह परत आले आणि त्यांना पंज प्यारे किंवा पहिला खालसा असे नाव दिले. त्यानंतर गुरू गोविंदजींनी एक लोखंडी वाडगा घेतला आणि त्यात पाणी आणि साखर मिसळली आणि दुधारी तलवारीने ते विरघळवून त्याचे नाव अमृत ठेवले. पहिल्या 5 खालशांच्या स्थापनेनंतर, त्याला 6 वा खालसा म्हणून नाव देण्यात आले ज्यानंतर त्याचे नाव गुरू गोविंद राय वरून गुरू गोविंद सिंग असे ठेवण्यात आले. त्यांनी खालशासाठी पाच काकरांचे महत्त्व सांगितले आणि सांगितले - केश, कांगा, कडा, किरपाण, कचेरा.

येथे 27 डिसेंबर 1704 रोजी छोटे साहिबजादे आणि जोरावर सिंग आणि फतेह सिंगजी हे दोघेही भिंतीवर निवडून आले. जेव्हा गुरुजींना ही परिस्थिती कळली तेव्हा त्यांनी औरंगजेबाला जफरनामा (विजयाचे पत्र) लिहिले, ज्यामध्ये त्यांनी औरंगजेबाला इशारा दिला की खालसा पंथ तुमचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी तयार आहे. 8 मे 1705 रोजी 'मुक्तसर' नावाच्या ठिकाणी मुघलांशी भयंकर युद्ध झाले, ज्यात गुरुजी विजयी झाले. ऑक्टोबर 1706 मध्ये, गुरुजी दक्षिणेस गेले जेथे त्यांना औरंगजेबाच्या मृत्यूची माहिती मिळाली. मरताना औरंगजेबाने तक्रार पत्र लिहिले. ज्याने सर्वस्व लुटले, तो (गुरुजी) फतेहनामा लिहितो आणि ज्याच्याकडे सर्व काही होते तो शिक्षानामा लिहितो हे आश्चर्य वाटते. याचे कारण सत्य होते. गुरुजी नेहमीच जुलूमशाहीविरुद्ध लढले, वैयक्तिक फायद्यासाठी नाही. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर तुम्ही बहादूरशहाला बादशहा बनण्यास मदत केली. गुरुजी आणि बहादूर शाह यांचे संबंध अतिशय सौहार्दपूर्ण होते. हे संबंध पाहून सीमेचा नवाब वजीतखान घाबरला. म्हणून त्याने दोन पठाणांना गुरुजींच्या मागे लावले. या पठाणांनी विश्वासघात करून गुरुजींवर प्राणघातक हल्ला केला, ज्यामुळे गुरुजी (गुरू गोविंद सिंग जी) नांदेड साहिबमध्ये 7 ऑक्टोबर 1708 रोजी दिव्य प्रकाशात लीन झाले. शेवटी तुम्ही शिखांना गुरू ग्रंथ साहिब यांना गुरू मानण्यास सांगितले आणि तुम्हीही नतमस्तक झालात. गुरुजींनंतर माधोदास ज्याला गुरुजींनी शीख बनवले आणि बंडसिंग बहादूर नाव दिले, त्यांनी सीमेवर हल्ला करून जुलमींना वीट मारली.


कट्टर आर्यसमाजी असलेले लाला दौलतराय गुरू गोविंदजींबद्दल लिहितात, 'मी स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद, परमहंस इत्यादींबद्दल खूप काही लिहू शकतो, पण जे परिपूर्ण पुरुष आहेत त्यांच्याबद्दल मी लिहू शकत नाही. मला गुरू गोविंद सिंगमध्ये परिपूर्ण माणसाचे सर्व गुण दिसतात.' म्हणून लाला दौलतराय यांनी गुरू गोविंद सिंगजींबद्दल पूर्ण पुरुष नावाचे एक चांगले पुस्तक लिहिले आहे. त्याचप्रमाणे मुहम्मद अब्दुल लतीफ देखील लिहितात की जेव्हा मी गुरू गोविंद सिंगजींच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करतो तेव्हा त्यांच्या कोणत्या पैलूचे वर्णन करावे हे मला समजत नाही. कधी तो मला महाधिराज, कधी महान दाता, कधी फकीर, कधी गुरू म्हणून दिसतो. ७ ऑक्टोबर १७०८ रोजी गुरू गोविंद सिंग यांचे निधन झाले.

# तुळतुळीत डोके, बलदंड शरीरयष्टी, भेदक डोळे पण

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपटसृष्टीतील खलनायक म्हटला की त्याच्या सतत अवतीभवती असणारे त्याच्या टोळीतील लोक आलेच. या टोळीतील लोकांपैकी एक जण खलनायकाचा उजवा हात म्हणून वावरायचा. अशा लोकांपैकी एक होते हिंदी चित्रपटांमधील साहसी दृश्यांचे दिग्दर्शक मुद्दू (मुध्दू) बाबू (बलवंत) शेट्टी. चित्रपट वर्तुळात ते प्रामुख्याने ओळखले जात शेट्टी, फायटर शेट्टी, फाइट मास्टर शेट्टी किंवा एम. बी. शेट्टी यापैकी कोणत्याही नावाने ! आपले तुळतुळीत डोके, बलदंड शरीरयष्टी आणि भेदक दृष्टी यामुळे शेट्टी यांचे व्यक्तिमत्त्व आगळे वेगळे दिसे. खरे तर रुपेरी पडद्यावर त्यांचे आगमन झाले की प्रेक्षकही मनातल्या मनात घाबरत असत.**

आता नायकापुढे पुढे काय वाढून ठेवले आहे, अशी प्रेक्षकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकत असे. कर्नाटकातील मंगळुरू या शहरात शेट्टी यांचा जन्म झाला. ते नऊ वर्षांचे असताना त्यांना शाळेत जाऊन शिकण्यात रस नाही हे त्यांच्या वडिलांच्या लक्षात आले. त्यांनी मुद्दू यांना मुंबईला पाठविण्याचे ठरविले. मुंबईत कामी येऊ शकेल अशी एखादी कला मुलाला शिकता येईल, असा वडिलांचा त्यामागे हेतू होता. शेट्टी उडुपीहून मुंबईला आले. कॉटन ग्रीन भागातील टाटा कंपनीच्या उपाहारगृहात चक्क वेटर म्हणून काम करू लागले. परंतु असल्या किरकोळ कामांचा त्यांना तिटकारा होता. टेबलापुरत्या मर्यादित असणाऱ्या कोणत्याही कामाचा ते तिरस्कार करीत. शेट्टी यांना सुदृढ शरीरयष्टी लाभलेली असल्यामुळे त्यांनी मुष्टियुद्ध खेळणे सुरू केले. त्यायोगे ते के. एन. मेंडन यांच्या संपर्कात आले. मेंडन हे प्रसिद्ध व्यायामपटू होते. त्यांनी शेट्टी यांना व्यावसायिकरीत्या प्रशिक्षण देण्याचे ठरविले. शेट्टी अल्पावधीतच मुष्टियुद्ध विजेते बनले. त्यांनी आठ वर्षे स्पर्धा जिंकल्या. त्यानंतर त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. एखाद्या कलावंताऐवजी--विशेषतःनायक--तशीच दिसणारी व्यक्ती (डबल) म्हणून ते काम करू लागले. साहसी दृश्यांचे प्रख्यात दिग्दर्शक अझीम भाई यांच्याकडून ते तलवारबाजी आणि अश्वारोहण शिकले. शेट्टी यांनी सुरुवात मारधाडीच्या दृश्यांमधून केली. नंतर ते साहसी दृश्यांचे दिग्दर्शक बनले आणि सरते शेवटी अभिनेते बनले. त्यांनी मुख्यत्वे खलप्रवृत्तीच्याच भूमिका केल्या. १९५० सालाच्या कालखंडात प्रसिद्ध नायक असलेले प्रदीप कुमार आणि प्रेम नाथ यांच्या चित्रपटांमधे शेट्टी यांनी त्यांचे डमी म्हणून काम केले. त्यावेळी अभिनेते प्राण यांचे त्यांच्याकडे लक्ष गेले. शेट्टी यांची कुवत लक्षात आल्याने प्राण यांनी दिग्दर्शक सुबोध मुखर्जी यांना ते पटवून दिले आणि `मुनीमजी' (१९५५) या चित्रपटाचे साहसी दृश्य दिग्दर्शक म्हणून त्यांना संधी देण्याबद्दल सुचविले. `मुनीमजी' हा शेट्टी यांचा साहसी दृश्यांचे दिग्दर्शक म्हणून स्वतंत्रपणे केलेला पहिला चित्रपट. त्यात देव आनंद, नलिनी जयवंत आणि प्राण यांच्या प्रमुख भूमिका होत्या. १९५६ साली प्रदर्शित झालेल्या `हीर' या प्रसिद्ध पंजाबी प्रेमकथेवरील चित्रपटातील साहसी दृश्यांचे ते मार्गदर्शक होते. त्यानंतर त्यांनी आगामी बऱ्याच चित्रपटांमधे साहसी दृश्यांसाठी समन्वयक, दृश्य जुळणीकार आणि दिग्दर्शक म्हणून काम केले. त्यापैकी काही चित्रपट असे : `उजाला' (१९५९), `तेल मालिश बूट पॉलिश' (१९६१), `जब प्यार किसी से होता है' (१९६१), `काश्मीर की कली' (१९६४), `तीसरी मंझिल' (१९६६), `अँन इव्हनिंग इन पॅरिस' (१९६७), `सीता और गीता' (१९७२), `दीवार' (१९७५), `डॉन', (१९७८), `द ग्रेट गॅम्बलर' (१९७९) आणि `बॉम्बे ४०५ माइल्स' (१९८०). शेट्टी यांनी साहसी दृश्यांचे दिग्दर्शक या नात्याने ७०० पेक्षाही अधिक चित्रपट केले. पण त्यांनी केवळ तेच काम केले नाही तर काही कानडी चित्रपट आणि `सी. आय.डी. ९०९', `सपेरा', `चायना टाऊन', `गुन्हाओं के रास्ते', `आग और दाग', `यादों की बारात', `व्हिक्टोरिया नंबर २०३', `अनहोनी', `डॉन', `शालिमार', `आज के शोले' आणि `जेल यात्रा' आदी हिंदी चित्रपटांमधे भूमिकाही केल्या. शेट्टी यांना सोडा वॉटरच्या बाटल्या, हॉकीच्या स्टिक आणि कंबरेचे पट्टे अशी साधने घेऊन केलेल्या मारामाऱ्यांचे प्रसंग चित्रित करण्यात विशेष रस होता. रशियात जन्मलेल्या युल ब्रिनर या ख्यातनाम अमेरिकी अभिनेत्याचे शेट्टी चाहते होते. डोक्यावरील केस काढून डोके तुळतुळीत करणारा युल ब्रिनर हा जगातील बहुदा पहिलाच लोकप्रिय अभिनेता होता. शेट्टी यांच्या घरातील भिंती युल ब्रिनर यांच्या छायाचित्रांनी भरून गेल्या होत्या. `अँन इव्हनिंग इन पॅरिस' आणि `नाइट इन लंडन' या चित्रपटांच्या चित्रीकरणाच्या वेळेपासून शेट्टी यांनी दररोज दाढीप्रमाणे डोक्यावरील केसही काढून टाकावयास सुरुवात केली. चित्रपट व्यवसायात त्यांना मागणी येऊ लागली आणि १९६० ते १९७० या दशकात त्यांना एका दिवसात तीन पाळ्यांमधे काम करावे लागले इतके ते व्यग्र झाले. त्यामुळे ते काहीसे अहंकारीही बनले. ते चित्रपटाच्या नायकांना त्यांच्या तोंडावर सांगत, की तुम्ही याल आणि जाल पण मी ३५ वर्षे तरी रुपेरी पडद्याचा एक अविभाज्य भाग बनून राहीन. या नायकांच्या मुलांसाठीही मी साहसी दृश्ये चित्रित करेन. शेट्टी शिकले सवरलेले नसल्यामुळे चित्रपट व्यवसायातील सुशिक्षित लोकांबरोबर संभाषण करणे आपल्याला जमणार नाही, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. पण समाजात मात्र ते सगळ्यांशी मिळून मिसळून वागत असत. ते आलिशान सदनिकेत राहात आणि त्यांच्याकडे चार गाड्या होत्या. मुद्दू शेट्टी यांचे व्यक्तिमत्त्व धडकी भरविणारे होते पण तितकेच त्यांचे मन लोण्यासारखे मऊ होते. गरजूंसाठी ते नेहमीच मदतीचा हात पुढे करीत असत कारण पैशाची चणचण काय असते हे शेट्टी यांनी आयुष्यात पाहिले होते. कठीण काळात

दिवस काढले होते म्हणून ते गरिबांना नेहमीच आर्थिक मदत करीत असत.

पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटचे एक माजी प्राध्यापक रोशन तनेजा १९७७ साली `अभी तो जी लें' हा चित्रपट दिग्दर्शित करीत होते. त्यात किरण कुमार, जया भादुरी, डॅनी डेंजोंग्पा, राधा सलुजा, पेंटल आदी इन्स्टिट्यूटचेच विद्यार्थी-विद्यार्थिनी काम करीत होते. त्या चित्रपटातील साहसी दृश्यांच्या दिग्दर्शनाची जबाबदारी शेट्टी यांच्यावर होती. त्याचे चित्रीकरण फिल्म इन्स्टिट्यूटच्या आवारातच सुरू होते. मी त्यावेळी `तरुण भारत' या दैनिकाचा चित्रपट समीक्षक म्हणून काम करीत होतो. मी आणि माझे त्यावेळचे सहकारी कै. वि. द. कुलकर्णी असे दोघे शेट्टी यांची मुलाखत घेण्यासाठी चित्रीकरणस्थळी गेलो. शेट्टी यांना दोन दृश्यांमधे थोडी उसंत मिळाल्याचे पाहून आम्ही भीतभीतच त्यांना म्हटले, शेट्टीसाहेब आम्ही पत्रकार आहोत. आम्हाला आपली मुलाखत हवी आहे. यावर शेट्टी हसून म्हणाले, माझी मुलाखत? माझी मुलाखत काय घेणार तुम्ही? मुलाखत तर नायक-नायिकांची घ्यायची असते. पण आम्ही आग्रहच धरल्याने ते तयार झाले आणि आम्हाला दुपारच्या जेवणाच्या वेळी उपाहारगृहात येण्यास सांगितले. त्यांचे जेवण झाल्याचे पाहून आम्ही दोघे त्यांच्या टेबलवर जाऊन बसलो. इतर वेळी नायक-नायिकांना धडकी भरविणारा खलनायकाचा उजवा हात हाच का, असा प्रश्न त्यांच्याशी बोलताना आम्हा दोघांना पडला इतके ते साधेपणाने बोलत होते. त्यांच्या खलनायकीचा त्याला जराही गंध नव्हता. त्यांनी आमच्याशी दिलखुलास गप्पा मारल्या. धर्मेंद्र आणि शशी कपूर साहसी दृश्यांमधे उत्तम अभिनय करतात असे त्यांनी आवर्जून सांगितले. मग आम्ही त्यांच्या कुटुंबाकडे वळलो. आम्ही विचारले, शेट्टीसाहेब आपला पडद्यावरचा अवतार पाहून आपली सौभाग्यवती आणि मुलेही आपल्याला घाबरत असतील ना? यावर त्यांनीच एक मजेदार गोष्ट सांगितली. ते म्हणाले, माझ्या पत्नीच्या मैत्रिणी तिला म्हणतात की, "आपके पती तो शेर जैसे डरावने लगते हैं. आपको डर नहीं लगता? यावर माझ्या पत्नीने त्यांना उत्तर दिले, बिलकुल नहीं, ये तो पालतू (पाळीव) शेर है." असे म्हणून शेट्टी स्वतःच खळखळून हसले. त्यानंतर आम्ही त्यांचा निरोप घेतला. `अभी तो जी लें'चे चित्रीकरण आटोपून शेट्टी यांना दुसऱ्या दिवशी `लफंगे' (रणधीर कपूर, मुमताज, प्राण) या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी मुंबईला जायचे होते. चित्रपटसृष्टीत शेट्टी साहसी दृश्यांचे जे काम करीत ते अत्यंत जोखमीचे असते. त्यात जबर जखमी होऊन अपंग होण्याची किंवा थेट जिवावर बेतण्याची शक्यता इतर कामांपेक्षा बरीच असते. त्यांच्या कारकिर्दीत असे प्रसंग घडलेही होते. त्यापैकी एका प्रसंगाने ते कधी नाही इतके निराश झाले होते. प्रख्यात दिग्दर्शक ब्रिज सदानाह यांचे दिग्दर्शन लाभलेल्या `बॉम्बे ४०५ माइल्स' या चित्रपटातील एका साहसी दृश्याचे बाह्यचित्रीकरण सुरू होते. शेट्टी त्या प्रसंगाचे दिग्दर्शन करीत होते. त्यावेळी एक दुर्घटना घडली. त्या प्रसंगात अभिनेते शत्रुघ्न सिन्हा यांचा सहभाग होता आणि त्यांचा डुप्लिकेट म्हणून मन्सूर हा कनिष्ठ कलाकार काम करीत होता. पेट्रोल बॉम्बचा स्फोट होतो, असे ते दृश्य होते. स्फोट होण्यापूर्वी मन्सूरने मागे यावयाचे होते; पण तो मागे येण्यापूर्वीच स्फोट झाला आणि मन्सूर जबर जखमी होऊन त्यातच त्याचे निधन झाले. या दुर्दैवी घटनेमुळे निराश झालेले शेट्टी मद्याच्या पूर्ण आहारी गेले.

चित्रपटसृष्टीत पैसा हाच राजा आहे, हे शेट्टी पूर्णपणे जाणून होते. यात माणूस जे काही कमावतो त्यावरच त्याचा आदर आणि मैत्री या गोष्टी अवलंबून असतात याचीही त्यांना पुरेपूर कल्पना होती. ते आपल्या मुलांनाही बजावून सांगत, की चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्यापेक्षा तुम्ही शिका आणि स्वतःच्या पायावर उभे राहा. १९८१ साली प्रदर्शित झालेला `जेल यात्रा' हा शेट्टी यांचा अखेरचा चित्रपट ठरला. २३ जानेवारी, १९८२ या दिवशी शेट्टी घरातच पडले पण ते पडणे प्राणघातक ठरले आणि त्यांचे निधन झाले. त्यांची पत्नी विनोदिनी यांनी कथ्थक नृत्याचे प्रशिक्षण घेतलेले असल्याने त्यांनी नृत्याचा क्लास सुरू करून कुटुंबाचा सांभाळ केला. शेट्टी आणि विनोदिनी यांना हृदय आणि उदय असे दोन पुत्र होते. शेट्टी यांनी कनिष्ठ कलाकार रत्नाशी दुसरा विवाह केला होता. शेट्टी यांच्या निधनानंतर रत्ना, पुत्र रोहित, चंदा, छाया व महक या कन्या यांची परिस्थिती हलाखीची बनली. कुटुंबासाठी रत्नाने पुन्हा कनिष्ठ कलाकार म्हणून काम करण्यास प्रारंभ केला. रोहित शेट्टी यांनीही चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. आजच्या घडीला ते हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे आणि यशस्वी दिग्दर्शक म्हणून गणले गेले आहेत.

अनिल रा. तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे
९२२६१६०६५४

# उद्धव ठाकरे, सुप्रियाताई सुळेंनी आत्मचिंतन करावे



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**राज्य व्यवस्था चालवताना एखादं संकट कुणा एकासाठी नसतं तर सर्वांच्यावरच आलेलं असतं, त्या दृष्टीने त्याचं राजकारण न करता एकत्रित येवुन खऱ्या अर्थाने सामना करायचा असतो. महाराष्ट्राच्या वर्तमान राजकिय काळात विरोधक पराचा कावळा करून सत्ताधाऱ्यांना केवळ टिकेचे लक्ष्य बनवताना दिसतात. नांदेडच्या जिल्हा रूग्णालयात घडलेली घटना दुर्दैवच म्हणावे लागेल. त्याचं समर्थन कुणीच करू शकत नाही. आरोग्य व्यवस्था अधिक बळकट आणि सक्षम करणं हे आवाहन देखील समजावे लागेल. मात्र कुठं तरी पान पडलं की पिंपळगाव जळालं असं म्हणत छाती बदड आवाज उठवणारे विरोधक यांनी खऱ्या अर्थाने वैचारिक दृष्टी जागृत ठेवुन सामाजिक प्रश्नावर राजकारण करण्यापेक्षा प्रश्न कसा मार्गी लागेल यासाठी स्वबुद्धी वापरायला हवी.**

राष्ट्रवादीच्या नेत्या खा.सुप्रियाताई सुळे आणि माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी या प्रश्नावर लक्ष्य घालताना सत्ताधाऱ्यांना टिकेच्या ऐरणीवर उभा केलं. मात्र ज्यांच्या काळात आरोग्य व्यवस्था किती रसातळाला गेली होती?ज्याचा फटका अगदी भंडाऱ्यात बालकांचं अग्निकांड घडलं त्याला जबाबदार कोण? तुम्ही अगोदर आत्मचिंतन करा. आपण जेव्हा एक बोट समोर करतो तेव्हा चार बोट आपल्या ऱ्हदयाकडे असतात. एवढं जरी राजकिय पुढाऱ्यांना कळालं तर खऱ्या अर्थाने आरोपाचा तमाशा बंद होण्यासाठी मदत होऊ शकते.

राज्यात व्यवस्था कुणाचीही असो. असे अनेक प्रश्न सर्वांच्या समोर सारखेच उभा रहातात. आरोग्य व्यवस्था माय-बाप जनतेच्या जीव रक्षणासाठी. कारण कोट्यावधी खर्च सरकार म्हणुन या व्यवस्थेवर होतो. व्यवस्थेतील बदल, तांत्रिक परिवर्तन किंवा सामान्य जनतेला व्यवस्थेचा मिळणारा लाभ यावर खरं तर संबंधित आरोग्य मंत्री खातं आणि सरकार यांचं विशेष लक्ष्य असणं महत्वाचं असतंच. पण राज्याचा कारभार चालवताना जेव्हा एखादा प्रश्न कुणाच्या तरी खात्यातुन ऐरणीवर येतो त्यावेळी हे संकट केवळ सत्ताधाऱ्यांचं नसतं तर विरोधकांनी सुद्धा अंगावर घ्यायला हवं.कारण राजकारण शेवटी कशाचं करायचं? हा देखील प्रश्न आहे. ग्रामीण भागातल्या शेवटच्या माणसाला आरोग्य सेवा मिळाली पाहिजे म्हणुन सरकारी यंत्रणेतुन आरोग्य व्यवस्था उभा आहे पण वर्षानुवर्षे जुनाट आरोग्य रूग्णालय, रिक्त जागा किंवा रूग्ण संबंधित असलेल्या बंद मशिनरी असे सारे प्रश्न कुठेतरी एकत्रित येऊन सर्वांनीच मार्गी लावले तर खऱ्या अर्थाने आरोग्य यंत्रणा सक्षम बनू शकते. विरोधकांची भूमिका केवळ आवाज उठवणे असे नव्हे तर सामाजिक प्रश्नावर सरकारचं लक्ष्य वेधुन यंत्रणा सक्षम करणे तितकंच महत्वाचं. नांदेड रूग्णालयात लहान बालकांचे जीव गेले. काही रूग्णांचे मृत्यू झाले. खरं तर हा प्रकार अतिशय दुर्दैवी म्हणावा लागेल. अशा घटना टाळण्यासाठी तत्पर आरोग्य योजना, सक्षम औषधी साहित्याचा पुरवठा किंवा इतर अनेक प्रश्न यात सुधारणा होणे महत्वाचे. मात्र केवळ विरोधाला विरोध म्हणुन राजकारण करायचं आणि आरोप-प्रत्यारोपाच्या भानगडीत पडायचं हाच चेहरा राज्यात विरोधकांचा होवुन बसला.नांदेडात घटना घडल्यानंतर खा.सुप्रियाताई सुळे स्वतः तिथे जावुन आल्या.

खरं तर एखादं पत्र मुख्यमंत्र्याला दिलं असतं तर आपण समजुन घेवु. एव्हाना एका खासदार महाशयांनी रूग्णालयाच्या अधिष्ठातांना टॉयलेटची करायला लावलेली साफसफाई हा प्रकार देखील राजकिय दादागिरीचा म्हणावा लागेल. कारण काहीही झालं की, दोष डॉक्टरांवर जाणे आरोग्य यंत्रणेच्या दृष्टीने योग्य वाटत नाही. मात्र आठ दिवसानंतर काल परवा उद्धवजी ठाकरेंनी याच प्रश्नावर पत्रकार परिषद घेतली आणि मग सरकारवर नेहमीप्रमाणे आरोप केले. खरं तर नांदेडात घटना घडल्यानंतर स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अजितदादा पवारांनी विशेष लक्ष्य देवुन सारी यंत्रणा कामाला लावली. यातले दोषी कोण त्याच्यावर कारवाई निश्चित होईल. पण उद्धव ठाकरेंनी हाच प्रश्न पकडून व्यक्तिद्वेषापोटी शिंदे-फडणवीसावर चढवलेला हल्ला विनोद समजावा लागेल. देशाच्या गृहमंत्र्यांनी नक्षलवादी कारवायावर बैठक बोलावल्यानंतर संबंधित राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना जावे लागणार. मग तिथं खा.संजय राऊतांना पाठवायचं होतं का? हा प्रश्न पुढे येतो. दिल्लीच्या शासकिय बैठकीला जाणं हे देखील विरोधकांना सहन होत नसेल तर मग खऱ्या अर्थाने विरोधक म्हणुन त्यांचीही किव येते. बरं आपण जेव्हा सत्ताधाऱ्यांवर बिनबोभाट आरोप करतो तेव्हा चार बोटं आपल्याकडे असतात हे लक्षात घ्यावं. सोयीचं राजकारण आणि आरडाओरड करणं वर्तमान स्थितीत त्यांना योग्य वाटतं. पण तुम्ही महाराष्ट्राच्या सत्तेत होतात त्याच काळात भंडारा अग्निकांड घडलं ज्यात अकरा नवजात बालकांचा पूर्णपणे जळुन मृत्यू झाला होता. वेगवेगळ्या ठिकाणी



रूग्णालयाला आगी लागल्या, अनेकांचे प्राण गेले तेव्हा तुमच्या कानाला आक्रोश ऐकु का आला नाही? राज्यातल्या हॉस्पीटलचे ऑडीट करण्याचे आदेश तुम्ही काढले. पण ते आदेश हवेत का विसरले? एवढं अग्निकांड भंडाऱ्यात झालं मग तुम्ही आरोग्य मंत्र्याचा राजीनामा घेतला होता का? करोनासारख्या काळात केवळ रूग्णांना ऑक्सीजन मिळाला नाही, गोळ्या मिळाल्या नाहीत म्हणुन तडफडुन मृत्यू झाले. तुम्ही तर एकाही रूग्णालयात करोना वॉर्डला भेट दिली नाही. याउलट मढ्याच्या टाळुवरचं लोणी खाताना करोनाच्या नावाखाली करोडो रूपायाचा भ्रष्टाचार केला. मृतदेह वाहुन नेण्यासाठी रूग्णवाहिकांचा भ्रष्टाचार, पिपई किट ज्याची किंमत शंभर-दोनशे असेल त्या खरेदीत देखील भ्रष्टाचार, रेमडीसिव्हर इंजेक्शन तुमच्या काळात लाखाच्या घरात ज्याची किंमत सर्वसामान्य जनतेला मोजावी लागली आणि मृत्युचं तांडव सुरू असताना तत्कालीन मुख्यमंत्री स्वतः कुठे भेटायला गेले नाहीत. फेसबुक चेहरा मुख्यमंत्री अशी तुमची खुर्ची होती. ना तुम्ही मंत्रालयात ना तुम्ही आरोग्य खात्यात. तुमच्या काळात आरोग्य यंत्रणा सक्षम होती पण कुठल्याही योजनेच्या नावाखाली भ्रष्टाचार करायचा आणि वारेमाप पैसा लुबाडायचा. याशिवाय उद्धव ठाकरे सरकारने काहीच काम केलं नाही.

आज ओरडणाऱ्या मोठ्या ताई अर्थात खा.सुप्रियाताई महाविकास आघाडीच्या काळात गचाळ आरोग्य यंत्रणेवर कधी काहीच बोलल्या नाहीत आणि आज सुरू असलेला आरडाओरड केवळ स्वपक्षाचं अस्तित्व दाखवण्यासाठी धडपड म्हणावी लागेल. उद्धवजी असतील किंवा सुप्रियाताई यांनी खरं तर एकदा तरी आत्मचिंतन करायला हवं. जिथे करोना सेंटरच प्रत्यक्षात नाही तिथे कागदोपत्री करोना सेंटरची उभारणी दाखवून करोडो रूपायांचा भ्रष्टाचार तुम्ही केला. तेव्हा खऱ्या अर्थाने आरोग्याच्या प्रश्नावरून सत्ताधाऱ्यांवर आरोप करण्याची तुमच्यातली नैतिकता कधीच तेल संपलेल्या दिव्यातल्या वातीसारखी विझुन गेलेली आहे. तुम्ही आता बोलणं म्हणजे करून सरून भागले आणि देवपुजेला लागले असंच म्हणावे लागेल. प्रश्न हाच पडतो की राजकारण आपल्या जागी प्रत्येकाने करावे. संत तुकाराम महाराज सांगुन गेले, ऐशी कळवळ्याची जाती, लाभावीण करी प्रिती जर पुळका तुम्हाला गोरगरीबाचा असेल तर स्वच्छ मनाने भ्रष्टाचारी विरहित ऱ्हदयाने दाखवला तर खऱ्या अर्थाने सर्वसामान्य जनतेला या गोष्टी पटु शकतात. म्हणुनच एक बोट दुसऱ्याकडे दाखवाल त्यावेळी चार बोट आपल्या ऱ्हदयाकडे असतात हे लक्षात घेऊन राजकारण करा एवढेच सांगणे.

# अमेरिकेतील चमत्कार : बहुमत असूनही सभापतीला अर्धचंद्र



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**लोकशाहीमध्ये सत्ताधारी व विरोधी पक्ष हे सरकारच्या रथाची दोन चाके असतात, त्यांनी जगन्नाथाचा रथ पुढे ओढावा लागतो तसे झाले नाही तर तो राजकारणाच्या चिखलात अडकूण पडतो आणि अर्जुनाला लढण्यासाठी श्रीकृष्णाला गिता सांगावी लागते. इकडे भारतातामध्ये गणेशाचे विसर्जन झाले आणि तिकडे अमेरिकेत चमत्कार घडून आला. प्रतिनिधी ग्रहाचेसभापती केव्हिन मॅक्कार्थी यांना बहुमत असूनही सत्ता पद गमवावे लागले. कारण त्यांना सभापतीपदावरून हटविण्यासाठी मांडलेला ठराव बहुमताने संमत झाला. वॉशिंगटमधील कॅपिटल येथे प्रतिनिधी सभागृहाची बैठक झाली आणि 210 विरूद्ध 216 म्हणजे 6 मताने अध्यक्षांची खूर्ची रिकामी करण्यासाठी ठराव मंजूर झाला, आणि खूर्चीवर असलेल्या सभापतीला हटविण्याचा ऐतिहासिक निर्णय प्रथमच घेण्यात आला. मॅक्कार्थीला स्वत: पदावर राहण्याचा कोणताही मार्ग सापडला नाही.**

पहाटे च्या सर्व शक्यता दुरावल्या आणि दुपारच्या मतदानाने 8 रिपब्लिकन तसेच उपस्थित असलेल्या सर्व डेमोक्रॅशनी त्यांना काढूण टाकण्यासाठी मतदान केले. 8 रिपब्लिकन संभासदांनी पक्षाच्या विरोधात मतदान केले, असे मतदान करून या रिपब्लिकन सदस्यांना इतिहास घडविला आहे, आणि सभापतीच्याचेंबरला अंधारात टाकले हि घटना धक्कादायक आहे, त्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. हे कसे घडले? बहुमत असूनही सभापतींना का हुसकावून देण्यात आले. दिवसभरातील घटनाक्रम कसा बदलत गेला, हेही लक्षात घेण्यासारखे आहे. समर्थन वाढविण्याच्या प्रयत्नात मॅक्कार्थी सकाळीच रिपब्लिकन सभासदांना एकएकटे भेटू लागले, समर्थन मागू लागले, ते डेमोक्रॅटस्ला सुद्धा भेटले. त्यावेळी काहीनी ठामपणे सांगितले की मॅक्कार्थीला काढण्याठी आम्ही एकत्र येत आहोत. स्पिकर याना त्याने मॅक्कार्थीचे पद रिक्त करण्याचा सुत्तप्रयत्न सुरू झाला होता. प्रारंभी तो अयशस्वी होतो की काय असे वाटत होते. परंतु पुढे दोन्ही बाजून मॅक्कार्थीचे समर्थक आणि विरोधक यांना वादविवादाची संधी दिल्यानंतर त्यांना काढण्याच्या ठरावावर मतदान सुरू झाले. त्यांना काढावे या बाजूने 216 मते पडली तर त्यांना ठेवावे यावर केवळ 210 मते पडली आणि मॅक्कार्थी यांच्या हाकालपट्टीचा ठरावा कसा मंजूर झाला हा एकच मत्कारच होता. आपल्या कार्यकाळात सभापतीला खूर्चीवरून काढून टाकण्याची ही पहिलीच वेळ होय. तसे पाहिले तर डेमोक्रॅटस्साठी हा विजय होता तर रिपब्लिकनसाठी स्वतःचे ध्येय साध्य करण्याचा एकव्यूहरचनात्मक डाव होता. अमेरिकेत असाऐतिहासिक धोबीपछाड प्रथमच झाला. रिपब्लिकन रणनीतीकार डॅनरोनायणे यांनीअसे प्रतिपादन केले आहे की, पक्षाला पुढच्या वर्षी अध्यक्षपदाची निवडणूक जिंकणे काळाणे कठीण केले आहे. सभापतीला काढून टाकण्याने कॉग्रेससाठी अधिक कठीण काम होते हे त्यांचे संकेत सूचक आहेत.

शटडाऊनचा धोका : अमेरिकन अर्थकारणात शटडाऊनची टांगती तलवार लोंबकळत आहे. यावर रणनीतीकार म्हणतात, “आम्ही शटडाऊनला 44 दिवस वाट पाहत आहोत आमचा कोणताही अर्थसंकल्पीय करार नाही आणि आता आमच्याकडे स्पिकर नाही. हा घटनांक्रमाच अंत्यत दुर्देवी विकास आहे. आमच्याकडे असे घडले नाही असाशेवटचा प्रयत्न 1910 साली झाला होता, त्यानंतर आजचा हा खूप त्रासदायक दिवस आहे.” असे त्यांनी म्हटले आहे, त्यांच्या मते मॅक्कार्थी स्पिकर म्हणून स्वतः ला पुढे ठेवू शकतात आणि आम्ही जिथे होतो तिथेच संपू शकतो. याउलट प्रे. बाईडन यांना असा विश्वास आहे की, सभागृह लवकरच नवीन सभापती निवडेल. वॉईट हाऊसच्या वृत्तपत्र सचिव (प्रेससेक्रेटरी) कॅरिनजीन-यिअरे असे प्रतिपादन केले आहे की, आमच्या राष्ट्रपतीला तातडीचे आव्हाने प्रतिक्षा करणार नाहीत अमेरिकन लोकनेतृत्त्वास विश्वासपात्र आहेत, असे जे त्यांच्या जिवनावर परिणाम करणारे मुख्यमुद्दे समोर आणि केंद्रस्थानी ठेवतात, असे प्रेस सेक्रेटरी यांनी सांगितले. एकदा सभागृहाने सभापती निवडण्याची त्यांची जबाबदारी पूर्ण केली की, बिडेन प्रशासन अमेरिकन लोकांच्या प्राधान्यक्रमांना संबोधीत करण्यासाठी आम्ही सज्ज होऊ. प्रे. बिडेन सर्वांनबरोबर एकत्र काम करण्यास उत्सुक आहेत. अशाप्रकारची व्यूह रचना सत्ताधारी पक्षांने केली आहे. यावरविरोधकांचे म्हणजे रिपब्लिकन पक्षांचे काय डाव पेच आहेत, तेही समजावून घेतले पाहिजेत. लोकशाहीमध्ये सभागृहाचे काम हे लोकांच्या कल्याणासाठी विविध उपक्रमांना गति देण्यात पोषक ठरणारे असते. सभागृहातील पीठासिन अधिकारी योग्य निर्णय घेऊन लोककल्यानाला गती देत असतात, या दृष्टिने या घटनेकडे बारकाईने पाहिले जाते. प्रे. बिडेन कॉग्रेस सभागृहता उभय पक्षाच्या सभासदांचे सहकार्य घेऊन विद्यमान आव्हानाना सामोरे जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांना लोकांचे प्रश्न प्रलंबित ठेवावयाचे नाहित त्यासाठी ते योग्य सभापतीची तात्काळ निवड करतील, असे निरीक्षकांना वाटते.

लक्षवेधक घटनेचे पडसाद : सत्तेत असलेल्या डेमोक्रॅटस्पक्षाचे कॉग्रेस सभागृहात बहुमत नाही तथापि बहुमत असलेल्या सभापतीला काढून टाकण्याचा ठराव संमत होतो, ही एक धक्कादायक घटना ठरली या घटनेचे सबंध जगभर पडसाद उमटले. प्रेससेक्रेटरी जीन- यिअरे यांनी असेही सांगितले की, अमेरिकेमध्ये एकाविशिष्ट वळणावर राजकारण पोहचते तेंव्हा लोक कल्याणकारी प्राधान्यक्रमाला महत्व दिले जाते. स्पिकरशिवाय सभागृह महत्वपूर्ण खर्चाच्या बिलासह विधेकांना



पुढे ढकलण्यास सक्षम आहे. मॅक्कार्थीने जाहीर केले आहे की ते पुन्हा स्पिकरपदासाठी उभे राहणार नाहीत. वकिलांनी फॉरिडा येथील रिपब्लिकन पक्षाचे नेते ॲडाल्फोफ्राँको यांच्या मते खरे तर विभाजीत सभागृहात रिपब्लिकन पक्षाला पाच जागांचे बहुमत होते, ज्याने मॅक्कार्थीला हटविले. वास्तविकता अशी आहे की,आपल्याकडे लोकशाही संकुचित होत आहे. रिपब्लिकन काल्पनिक जगात वावरत आहेत, म्हणून मला अशा माणसाबद्दल चिडवाटत आहे. ज्याने आपल्या देशासाठी इतक काही साध्य केल आहे, त्याला तडकाफडकी काढणे किती योग्य ? फ्राँको यांच्या मते गेटझच्या नेतृत्वाखाली मॅक्कार्थीलाकाडून टाकणे, संपविणे हे व्ययक्तीक रित्या सुडाचे राजकारण म्हटले पाहिजे. अमेरिकेचे माजी उपराष्ट्रपती माईकस्टेन्स यांच्या मते मॅक्कार्थी च्या हाकालपट्टीमुळे ते खूप निराश झाले आहेत. मला असे म्हणूद्या की आराजकता हा कधीच अमेरिकेचा मित्र नसते, आणि संघर्ष करत असलेल्या अमेरिकन कुटुंबाचा तो मित्र कधीच होऊ शकत नाही. आणि मि अत्यंत निराश झालो आहे कारण मुटभर रिपब्लिकन लोकप्रतिनिधी सभागृहातील डेमोक्रॅटस्ला सोबत घेऊन सभापतीची पदावरून हकालपट्टी करतात हे योग्य नाही. मॅक्कार्थी आणि त्यांच्या चौकडी (कॉकस) मधील सबंध हे सुरूवातीपासून खडतर आहेत मुठभर उजव्या विचारसरणीच्या प्रतिनिधीच्या विरोधामुळे सभागृहात मदतानाच्या 15 फेऱ्यानंतरच त्यांना स्पिकरपद मिळाले होते. या आठवड्याच्या शेवटी सरकारी शटडाऊन टाळण्याच्या दरम्यान हा तणाव घडूनआला. मॅक्कार्थी आणि डेमोक्रॅटस्खासदारांनी एक करार घातला. ज्याने सरकारला अल्पकालीन निधी उपलब्ध करून दिला आणि शटडाऊन टाळले. रिपब्लिकनच्या अयशस्वी प्रयत्नानंतर सामाजिक कार्यक्रमावर 30 टक्क्यापर्यंत नाट्यमय कपात करण्यात आली होती. सोमवारी संध्याकाळी गेटझरने मॅक्कार्थीला काडून टाकण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनी असा आरोप केला की, डेमोक्रॅटस्तड जोडकराराच्या दिशेने काम करून पक्षाचा विश्वास घात केला आहे. मॅक्कार्थी यांनी सोशल मिडियावर एक अपमाणकारक संदेश घेऊन गेले तो संदेश असाकी, “हे पुढे आणा 24 तासानंतर कॉंग्रेसच्या मतदानात विरोधी भूमिकेतून काढून टाकलेले ते अमेरिकेच्या इतिहासातील पहिले सभागृहाचे स्पिकर ठरले.”अशा नाट्यमय घडामोडिमुळे सत्तेवर असलेल्या मॅक्कार्थी यांना आपले पद सोडावे लागले.

**समारोप :** अशा प्रकारे रिपब्लिकन पक्षाचे प्रतिनिधी गृहात बहुमत असूनही मॅक्कार्थी यांची हाकालपट्टी करण्यात आली. या मागचे डावपेच आणि चतुराई कोणाची, सरशी कोणाची झाली हे आज नव्हे तर उद्या लक्षात येईल. तुर्त तरी प्रे. बिडेन हे सभापतीला हाटऊन शटडाऊन टाळण्याच्या बाबतीत हुकूमाचे पान पुढे टाकण्यात यशस्वी ठरले आहेत. आता या पुढे सभापतीच्या निवडीचे राजकारण अधिक रंगेल आगामी काळात शटडाऊन घडून आले तर अमेरिकेपुढे अर्थिक संकट अधिक बिकट होईल. सत्ताधारी व विरोधी पक्ष यांनी लोककल्याणकारी भूमिका लक्षात घेऊन एकमेकांना समजावून घेतले. पाहिजे कारण सत्ताधारी व विरोधी पक्ष ही लोकशाहीच्या रथाची समान चाके असतात. सत्तेच्या राजकारणापेक्षाही हा जगन्नाथा चार थकसा पुढे ण्यायचा हे महत्वाचे असते. फ्लॅरिडाचे बंडखोर नेते गेटझ यशस्वी ठरले आहेत. सभापतीपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार आहे, हे आज सांगता येत नाही. डेप्यूटीस्पिकर तसेच मा. अध्यक्ष डोनाल्ट ट्रंम्प यांच्या नावाचीही चर्चा आहे. लोकशाहीच्या रथाची चाके राजकारणाच्या चिखलात अडकत आहेत जरशटडाऊन झाले तर अमेरिका अर्थिक संकटात सापडले. बिडेन आणि ट्रंम्पयांच्यातील राजकीय लढाईचे नवे महाभारत आहे. यातील कौरव कोण, पांडव कोण आणि गिता सांगणारा श्रीकृष्ण कोण हे भविष्यकाळ ठरवेल. अमेरिकेचे राजकारण रंगत आहे एवढे मात्र खरे.

# असे मोहरे पुन्हा होणे नाही : स्व. गुडसूरकर



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**दि. ०५ ऑक्टोंबर २०२३, सध्या उदगीर येथे वास्तव्यास असलेले माझे माध्यमिक बालबपणीचे आदर्श शिक्षक जगन्नाथरावजी गुडसूरकर सर यांचे वयाच्या नव्वदाव्या वर्षी वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. माझ्यासह असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याला प्रामाणिक, सुसंस्कार व स्वाभिमानी बळ देणाऱ्या एका आदर्श मार्गदर्शकाला आम्ही मुकलो. त्यांच्या निधनामूळे गुडसूरकर कुटूंबियावर कोसळलेल्या दुःखात मी कृतज्ञपणे ऋणी राहून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करतो. प्रार्थनेला जे विद्यार्थी वेळवर हजर नसत त्यांना कोंबडे करणे, उठबैस करायला लावणे, बोटामध्ये छोटा रूळ ठेवून दाबणे, उचल टांगणी करणे या सारख्या शिक्षा होत.**

१९६१ ते १९६८ चा काळ मी कंधार येथे जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत शिक्षण घेत होतो, त्या काळी जगन्नाथराव गुरडसूरकर, पंढरिनाथराव पुजारी, रंगनाथ महाराज, रज्जाक मौलीसाब, विश्वांभर जोशी, कांबळे सर या सारखे मातब्बर, विद्वान, आदर्श, स्वाभिमानी शिक्षकांच्या मार्गदर्शनात व सहवासात मी शिकलो.

त्यामूळे मी न चुकता पाच मिनीटपूर्व शाळेतील प्रार्थनेला हजर असे. शिकवीण्याची व समजावून सांगण्याची सोपी संस्कारी पद्धत, वडीलधाऱ्याचा मानमरातब ठेवणे, देशाभिमान, समाजाभिमान, माणसाला माणूस म्हणून जगविण्यासारखे मूलमंत्र, एकमेकांच्या सुख-दुःखत सहकार्य करून आपापसात कुटूंबवत्सल भावना वृद्धींगत करण्याचे बाळकडू मी अशा मंडळींकडूनच शिकलो. राष्ट्रपुरुषांचा इतिहास, त्याग, प्रामाणिकपणा साधी राहणी इत्यादी सारख्यां गुणलौकीकांचे भांडार म्हणजे आमचे आदरणीय जगन्नाथरावजी गुडसूरकर गुरुजी सारखे सर्वच शिक्षक मंडळी हेच आमचे खरे आदर्श. वर्तमानात असे मोहरे व असे गुणी विद्यार्थी अपावदानाचे आढळतात. म्हणून तर वर्तमान शिक्षण पद्धतीत टिकावू राहण्यापेक्षा विकावू व टाकाऊ वृत्ती जास्त झाली आहे. याचे सर्वार्थाने वर्तमानातील पालक, विद्यार्थी, संस्थाचालक व शिक्षकांनी भान ठेवून वागणे गरजेचे वाटते. ही विचार व प्रत्यक्ष वर्तनातील दरी कमी करावयाची असेल तर नक्कीच जगन्नाथराव गुरुजींसारखे सर्वगुण चारित्र्य संपन्न शिक्षक मंडळी असणे ही काळाची गरज आहे.

त्यासाठी गुरु-शिष्यांची आदर्श परंपरा समाजासह देशात निर्माण करून आपले नितीमूल्यात्मक भविष्य घडविण्यासाठी असे "गुरु" होणे व कायम राहणे मोठे जिकरीचे काम आहे. वर्तमान व भविष्यात सुसंस्कारी, स्वाभिमानी, प्रमाणिक पिढी घडवाची



असेल तर जगन्नाथराव गुडसूरकर गुरुजींसारखी शिक्षकांची खाण निर्माण करावी लागेल. तरच समाज व देशाचे भले होईल. असा माझा दृढ समज आहे. म्हणून वर्तमानातील शिक्षण पद्धती गुरुजन व विद्यार्थ्यांनी गुडसूरकर सरांसारख्या आदर्श व्यक्तीमत्त्वाचा बोध घेऊन आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणावेत.

ज्ञानाचा प्रकाश देण्या दिवा अखंड तो जळतो
जीवनाचा खरा अर्थ गुरुमूळेच कळतोआयुष्याच्या
कोऱ्या कागदी सजते सुरेख नक्षी
गुरूच्या ठायी घडती शिष्य, इतिहास आहे साक्षी
पुनःश्च कै. जगन्नाथरावजी गुरुडूरसकर गुरुजी यांना कृतज्ञपणे भावपूर्ण श्रद्धांजली.

# प्रत्येक मुलीत दिसते माझी लेक

आधुनिक केसरी

**'जागो जागी भेटत असते माझी मुलगी कोणाच्याही मुलीत दिसते माझी मुलगी' अशी उदात्त भावना कवी प्रदीप निफाडकर यांच्या काव्यातून व्यक्त होते. आपल्या मुलीप्रती असलेली प्रेम भावना दुसऱ्यांच्या मुलीसाठीही सर्वांनी दाखवली पाहिजे. 'सुंदर शिल्प माझी लेक घराची शान माझी लेक' माझ्या मुलीच्या जन्माने माझ्या जीवनात एक नव्या क्रांतिकारी युगाला सुरुवात झाली... ते नवे युग म्हणजे अपार प्रेम अन निर्मळ आनंद.... आनंद..! दररोज आनंद वर्षाव..! ' तिच्या पैंजणांनी सारे घर निनादते तिच्या निखळ हास्यानी सारे घर उजळते..' माझ्या मुलीचे पैंजण, तिचे बोबडे बोल अन तिच्या हास्याने आमचे सारे घर प्रकाशात लख्ख लख्ख उजळून निघते. जणूकाही ती लक्ष्मीचं रुपचं घेऊन येते... नित्यनेमाने ... दररोज...!बाबासाठी लेक परीच असते." प्रत्येक मुलगी तिच्या बाबाला ती एखांद्या राजकुमारी सारखी दिसते.**

बाप अन लेकीच्या नात्यातील प्रेम आणि ओढ जरा जास्तच असते. लेक ही बापाचं काळीज असते. लेकीसाठी बाप अहोरात्र घाम गाळून काम करतो आणि आपल्या लेकीला नेहमी खुश ठेवतो. तिच्या पाठीशी खंबीरपणे नेहमी उभा राहतो. आई - बाबाच्या प्रेमाची तुलना करता येत नसली तरीही मुलीचे बापावरचे प्रेमही काही कमी नसते.

' माझी मुलगी माझी तोपर्यंत आहे, जोपर्यंत माझं आयुष्य आहे ' असे म्हटले जाते. म्हणजे मुलगी ही आपण जिवंत असेपर्यंत आपल्यावर अपार प्रेम करत असते. तिचे पहिले आणि शेवटचे प्रेम हे तिचे बाबा असतात.


' प्रेमळ अन गोड स्वभाव प्रत्येक क्षण माझा श्वास माझ्या जगण्याची वात माझी लेक ' माझी मुलगी खुपच प्रेमळ आणि गोड स्वभावाची आहे. तिच्या प्रत्येक दिवसाची सुरुवात हसऱ्या चेहऱ्याने होत असते. हसूनचं आमचं स्वागत करत असते. ती मला नेहमी विचारते माझे नाव विरता का ठेवले आहे? मी तिला सांगतो की, माझ्या आईचे नाव वनिता होते. त्या नावावरून तुझे नाव विरता ठेवले आहे. मी तुला माझ्या आईच्या रूपात पाहत असतो. म्हणूनच मी तुला मम्मी म्हणून हाक मारत असतो. 'कामावरून घरी आल्यावर सगळ्यात आधी लेकीला विचारणारा, कितीही थकला असला तरीही लेकीचा चेहरा बघितल्यावर आनंदी होणारा एक बाप असतो.' तो आपल्या मुलीवर जीवापाड प्रेम करतो. तिचे सर्व हट्ट, लाड पुरवतो. तिला फुलासारखं जपतो. सर्व जग जरी मुलीच्या विरोधात गेले तरी तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो तो बाप असतो. 'मुलगी डोळ्यासमोर दिसली नाही की सारे घरभर तिला शोधतो स्वतःच्या ताटातील पहिला घास तिलाच भरवतो तो बाप असतो.' बाप मुलीच्या सुखासाठी अहोरात्र संघर्ष करत असतो. मुलीचा जन्म झाला या आनंदात एका बापाने बासरी वाजवून तिचे यथोचित स्वागत केले.मुलगी झाली या आनंदात एका बापाने एक दिवसभर मोफत पाणीपुरी वाटली.मुलगी झाल्याच्या आनंदात कुणी गाव जेवण देत असतात. प्रत्येक बाप आप- आपल्या परीने आनंद उत्सव साजरा करत असतो. आपल्या मुलीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बाप अहोरात्र मेहनत घेत असतो. आपल्या मुलीचा संसार सुरळीत आणि व्यवस्थित चालवा यासाठी हातभार लावणारे बापही काही कमी नाहीत.

चंद्रकांत नांगरे

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



**शंकरॉईड :** हा आजार बॅक्टेरिया (जीवाणू) मुळे होतो. यामध्ये अतिशय त्रासदायक अशा जखमा अवयवांवर होतात. स्त्रियांमध्ये हा आजर दिसत नाही. पुरुषांमध्ये लिंगावर जखम होऊन खरबडीत उंचवटे असलेल्या जखमा तयार होतात. जर यावर वेळीच उपचार केले नाहीत तर भोवतालच्या पेशी मृत होतात. निदान आणि उपचार बायोप्सी ऑफ अल्सर या चाचणीच्या माध्यमातून या आजाराचे निदान केले जाते. उपचारांमध्ये प्रतिजैविक त्यांचा वापर, जखमांचे क्लिनिंग आणि डिब्राईडमेंट करणे असे उपचार केले जातात. प्रतिबंध हा आजार सहसा प्रॉस्टिट्यूट्स म्हणजेच वेश्यांमध्ये आढळतो. यावर प्रतिबंध म्हणून कंडोम वापरणे, डेंटल डॅम वापरणे अशा गोष्टी करता येतात. हा आजार स्कीन टू स्कीन कॉन्टॅक्टने वाढतो त्यामुळे याची दक्षता घेणे फार महत्त्वाचे आहे. **एच. आय. व्ही. एड्स म्हणजे काय ?** एच.आय.व्ही. चा लाँग फॉर्म आहे, ह्यूमन इम्युनो डेफिशियन्सी व्हायरस आणि एड्सचा लाँगफॉर्म आहे, ॲक्वायर्ड इम्युनो डेफिशियन्सी सींड्रोम हा आजार रक्त आणि फ्लुईड्स यांच्यामुळे पसरतो. उदा. लाळ, व्हजायनल सिक्रिशन्स यांच्यामुळे बऱ्याचदा असं होतं की सुरुवातीला याची लक्षणं दिसतच नाहीत. एच. आय. व्ही. झालेली व्यक्ती बरीच वर्षे काहीही लक्षणे न दाखवता राहतात. एचआयव्हीमुळे एड्स होतो आणि शरीराची प्रतिकारशक्ती कमी होऊन नंतर ते दगावतात. काही लक्षणांमध्ये ताप येणे, शरीरावर रॅश येणे, जखमा होणे तसेच रात्री घाम येणे, अंधुक दिसणे अशी लक्षणे दिसून येतात.

*** एच. आय. व्ही. एड्सच्या प्रामुख्याने तीन अवस्था कोणत्या ?**




स्टेज - १) ही एक फ्लूसारखी दिसणारी अवस्था असते. स्टेज २) ही अवस्था १० वर्षे असू शकते आणि यात काहीही लक्षणे दिसत - नाहीत. स्टेज ३) या स्टेजमध्ये व्यक्तीच्या शरीरातील प्रतिकारशक्ती कमी झालेली असते ती कुठल्याही संसर्गाला बळी पडते. **एच. आय. व्ही. एड्सची लक्षणे कोणती ?** १. वारंवार येणारा ताप - वारंवार येणारा ताप हे यातले पहिलं प्रमुख लक्षण यात फ्लू सारखी लक्षणं असतात. तसेच थकवा येणे, घसा येणे, मळमळ होणे आणि गाठी येणे याचाही समावेश होतो. २. स्कीन रॅश - या लक्षणांमध्ये लाल, पिवळे, गुलाबी किंवा जांभळ्या रंगाचे पट्टे हे नाकातोंडावर आणि पापणीवर येतात. ३. वाढणाऱ्या गाठी यामध्ये शरीराच्या काखा, मान, जांग या भागात गाठी - वाढतात. ४. सांधेदुखी व स्नायु दुखी शरीराचे सांधे आणि स्नायु दुखत असतील आणि सोबत गाठीही असतील तर ती ही एच. आय. व्ही. एसड्सची लक्षण असू शकतात. ५. लूज मोशन्स (डायरिया) - यामध्ये लूज मोशन्स या सात दिवसांपेक्षा जास्त काळ राहिल्या तर तेही लक्षण म्हणता येते. ६. वजन कमी होणे अचानक वजन कमी होऊन, संडास व उलट्या होणे हा - प्रकार वाढल्यास एच. आय. व्ही. एड्स अंतिम टप्प्यात असल्याचे मानले जाते. ७. न्यूमोनिया - खोकला, सर्दी, वजन कमी होणे, डायरिया व नंतर न्यूमोनिया अशा टप्प्याने ही लक्षणे दिसून येतात. ८. रात्री घाम येणे हेही एक प्रमुख लक्षण मानले गेले आहे. ९. फंगल इन्फेक्शन नखं पिवळी होऊन ठिसूळ, पांढरी पडून तुटणे, तोंडामध्ये इन्फेक्शन निर्माण होणे ही लक्षणं यात दिसतात. - १०. मेमरी लॉस- डिप्रेशन एवढी सगळी लक्षण दिसल्यानंतर अर्थातच त्या व्यक्तीला संभ्रमावस्था येते ज्यात तो दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या-छोट्या गोष्टीही विसरू लागतो आणि वारंवार होणाऱ्या या तक्रारी कमी होत नसल्याने त्याच्यावर मानसिक ताण येऊन ती व्यक्ती वैफल्यग्रस्त (डिप्रेशन) होते.. एच. आय. व्ही. एड्सच्या निदानासाठी आवश्यक चाचण्या कोणत्या ? एच.आय.व्ही आणि एड्सच्या निदानासाठी अँटिबायोटिक्स टेस्टस्, रक्ताची तपासणी, लाळेची तपासणी, युरिनची तपासणी, वेस्टन ब्लॉट मेथड अशा चाचण्या करता येतात. अँटीजन टेस्टमध्ये एच. आय. व्ही. चा व्हायरस लवकर सापडतो पण तरीही त्यासाठी १ ते ३ आठवडे लागतातच.



**डॉ. विजय दहिफळे**
**युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट**
**9822326248**

# बल्लारशा ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांचा निष्काळजीपणा

## दोषी वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाईची बहिणीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नांदेड येथील घटनेने आरोग्य व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली असतांनाच दुसऱ्या बाजूला मागील काही दिवसात राज्यभरातील शासकीय रुग्णालयामध्ये शेकडो रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात शासकीय आरोग्य यंत्रणेत एकच खळबळ उडाली आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा, उर्मटपणा, औषधांचा तुटवडा , अनेक नादुरुस्त मशिनरी याला कारणीभूत असल्याचा आरोप होत असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे.

यातच चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशा ग्रामीण रुग्णालयात असाच एक प्रकार पुढे आला आहे. सिझरद्वारे प्रसूती झालेल्या एका महिलेचे टाके खुलून सिझेरियन च्या जागेवरील जखम चिघळल्याने तिची प्रकृती चिंताजनक झाली आहे. चंद्रपुरातील एका खासगी रुग्णालयात या महिलेची अवघ्या दहा बारा दिवसाच्या बाळाला आई जवळ ठेवून मृत्यूशी झुंज सुरू आहे. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळेच महिलेचा जीव धोक्यात आला असून, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पीडितेची बहीण प्रज्ञा कडूकर यांनी शुक्रवारी चंद्रपुरात आयोजित पत्रकार परिषदेत केली आहे.

दीपा पेरकर या महिलेला १३ सप्टेंबर रोजी बल्लारशा ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी भरती करण्यात आले. १८ सप्टेंबर रोजी



सिझरद्वारे तिची प्रसूती करण्यात आली. यानंतर टाके देवून रुग्णालयातून घरी पाठविण्यात आले. परंतु, काही दिवसांनी पोटात दुखू लागले व जखमेचा वास येऊ लागला. जखम पाहीली असता टाके खुलून गेले होते. तसेच टाके मारलेल्या ठिकाणी प्रचंड इन्फेक्शन झाले होते. त्यामुळे ती परत उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात गेली असता वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाल मूलचंदानी यांनी उपचार करण्यास टाळाटाळ करून दोन दिवसानंतर परत बोलावले. टाके खुलून पोटाचे मांस खराब झाले असल्याने तिच्यावर तत्काळ उपचार करणे आवश्यक होते. परंतु, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला भरती करून न घेता परत पाठविले. त्यामुळे महिलेची प्रकृती गंभीर झाली. यानंतर तिला चंद्रपुरातील एका खासगी रुग्णालयात भरती करण्यात आले असून, तिच्यावर अतिदक्षता कक्षात उपचार सुरू आहेत. यानंतर संबंधित प्रकरणाची बल्लारशा पोलीस स्टेशन ला तक्रार दाखल करण्यात आली. तसेच संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुद्ध जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे तक्रार करण्यात आली. मात्र, त्यांनीही दखल घेतली नाही. उलट उपचारात हयगय आणि निष्काळजीपणा करणाऱ्या डॉक्टरांची पाठराखण केली असा आरोप प्रज्ञा कडूकर यांनी यासंदर्भात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे. दरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाल मुलचंदानी यांच्या वैद्यकीय सेवेतील निष्काळजीपणामुळे यांच्याविरुद्ध जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी बल्लारपूर पोलीस स्टेशन ला तक्रार करण्यात आली. पोलीस अधीक्षकांकडेही निवेदन देण्यात आले. मात्र, अद्याप कोणावरही कारवाई झाली नाही, अशी खंत पीडितेची बहीण प्रज्ञा कडूकर हिने पत्रपरिषदेत व्यक्त केली आहे. डॉ.मृणाल मुलचंदानी यांच्यासह संबंधित डॉक्टरांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, त्यांना वैद्यकीय सेवेतून निलंबित करण्यात यावे, त्यांच्या वैद्यकीय सेवेचे परवाने रद्द करण्यात यावे अशी मागणी या प्रकरणात घेतलेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली.

या प्रकरणासंदर्भात डॉक्टरांची बाजू जाणून घेण्याकरिता चंद्रपूर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चिंचोळे यांच्याशी त्यांच्या भ्रमणध्वनीवर वारंवार संपर्क केल्यानंतरही त्यांनी याबाबत प्रतिक्रिया देण्यास बाहेर आहे अस म्हणत टाळाटाळ केली. पोलीस स्टेशन ला या प्रकरणाची तक्रार असल्या बाबतही त्यांना कल्पनाच नसल्याचे त्यांनी सांगितले. ईन्फेक्शन हे वातावरण, खानपान व प्रत्येकाच्या प्रतिकार शक्ती वर अवलंबून असते. बारा दिवसानंतर आम्ही पाहीले असता दोन टाके उकललेले दिसले, आम्ही ड्रेसिंग करून दिले व परत या अस सांगितल होतं. पण नंतर ते परत आले नाहीत.
**डॉक्टर मृणाल मुलचंदानी**
**वैद्यकीय अधिकारी, बल्लारशा ग्रामीण रुग्णालय.**

# पादुका दर्शन सोहळ्यास उदयोजक मनोज पवार यांनी पत्नीसह नोंदवला सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हयातील फर्दापूर ता.सोयगाव येथे अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळा फर्दापूर येथे स्व-स्वरूप संप्रदाय जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी आयोजित केला होता . यावेळी श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुकांचे पूजन करण्याच्या मुख्य यजमानपद उद्योजक मनोज़ पवार व उद्योजिका सौ.उर्मिला मनोज पवार यांना मान मिळाला यावेळी अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचे भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज छत्रपती संभाजीनगर जिल्हा समिती व भक्तपरिवार उपस्थित होते.



# राष्ट्रीय समाज पक्षाच्या तालुका अध्यक्षपदी पंजाब गव्हाणे यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आ. महादेव जानकर महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशिनाथ नाना शेवते प्रदेश मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर आणि विदर्भ प्रदेशाध्यक्ष प्रा. ॲड. रमेश पिसे यांच्या आदेशानुसार पक्षाच्या रिसोड तालुका अध्यक्षपदी पंजाब गव्हाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



रिसोड तालुक्यातील पळसखेड येथील युवा कार्यकर्ते पंजाब माणिकराव गव्हाणे यांची राष्ट्रीय समाज पक्षाच्या तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाची विचारधारा ध्येय धोरणे सर्व सामान्य नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी गव्हाणे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. तसिफ शेख व जिल्हाध्यक्ष दिपक तिरके यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे. पंजाब गव्हाणे यांनी याआधी विविध सामाजिक उपक्रम राबविले असून, त्यांची अंगी असलेल्या सामाजिक कार्याची आवड निश्चितच तालुक्यात राष्ट्रीय समाज पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल. अशी अपेक्षा पक्षाच्या वरिष्ठांनी यावेळी व्यक्त केली आहे. त्यांच्या नियुक्तीचे तालुक्यातील विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# रिसोड ते मौजाबंदी बसफेरी वेळेत सोडा

आधुनिक केसरी न्यूज

**जवळा :** तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी रिसोड तालुक्यातील मौजाबंदी, मांडावा, जवळा व कुऱ्हा आदी गावातील विद्यार्थ्यांसह महीला, व ज्येष्ठ नागरिकांना एस टी बस शिवाय दुसरा पर्याय नाही. परंतु रिसोड आगाराच्या मनमानी कारभारामुळे रिसोड ते मौजाबंदी ही बस फेरी कधी वेळेआधी तर कधी खूप उशिराने सुटते परिणामी शालेय विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होत असून, महीला व ज्येष्ठ नागरिकांची पंचाईत होत आहे.

सदर बस फेरी नियोजित वेळेत सोडण्यात यावी अशी मागणी सबंधित विद्यार्थ्यांनी व प्रवाशांकडून करण्यात येत आहे. जवळा येथील ज्येष्ठ नागरिक आत्माराम जाधव यांनी याबाबत रिसोड आगार प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रार केली आहे. परंतु त्यांच्या तक्रार अर्जाला सबंधित प्रशासनाने केराची टोपली दाखवली असल्याचा आरोप जाधव यांनी केला आहे. दुर्गम व डोंगराळ भागात असलेल्या मौजाबंदी, मांडावा, जवळा या गावातील विद्यार्थी आणि नागरिकांना सदर बस फेरी अत्यंत उपयुक्त असून एस टी बस नियमित वेळेत सोडल्यास विद्यार्थ्यांसह महीला व ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय दूर होईल अशी अपेक्षा सुध्दा जाधव यांनी व्यक्त केली आहे.

# कोथरूड भागात रिक्षावर झाड कोसळून जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कोथरूड भागात रिक्षवर झाड कोसळून रिक्षाचालकासह चौघे जखमी झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाचे कोथरूड केंद्रप्रमुख गजानन पाथरूडकर आणि राजेश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी रिक्षांवर पडलेले झाड बाजूला काढले. रिक्षा चालकासह चौघांना तातडीने रुग्णालयात दाखल केले.

# मद्यपी पतीच्या त्रासाला वैतागून घेतला गळफास

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** दारू पिऊन शिवीगाळ आणि मारहाण करणाऱ्या पतीच्या नेहमीच्या त्रासाला वैतागून पत्नी आणि मुलाने नायलॉनच्या दोरीने गळा आवळून खून केला. नांदगाव तालुक्यातील न्यायडोंगरी येथे ही घटना घडली. न्यायडोंगरी येथे संजय गायकवाड हा कुटुंबासह वास्तव्यास होता. संजय यास दारुचे व्यसन होते. दारु पिऊन तो पत्नी उषा आणि मुलगा अविनाश यास नेहमी मारहाण करत असे. नेहमीप्रमाणे रात्री संजय दारू पिऊन घरी आला. भांडण झाल्यानंतर त्याने पत्नीला बेदम मारहाण सुरू केली. दररोजचा त्रास सहन न होऊन पत्नीने संजयच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकली. मुलगा अविनाशही मदतीला आला. दोघांनी नायलॉनच्या दोरीने गळा आवळत संजयचा खून केला. या घटनेवेळी संजयची आई मीराबाई राठोडही उपस्थित होती. टनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी, उपनिरीक्षक मनोज वाघमारे यांसह पथकाने घटनास्थळी भेट देत संशयित पत्नी उषा आणि मुलगा अविनाश यांना ताब्यात घेतले. संजयची आई मीराबाई राठोड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नांदगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीची कोंडी

## पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष : वाहन चालकांचे भर रस्त्यावर मद्यप्राशन

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र५२वर दिवसभरात अनेक मोटर सायकल स्वार, कार धारक, एसटी बसेस, खाजगी बसेस ,ट्रक, अशा अनेक लाखो वाहनांची दिवसभरात ये-जा सुरु असते. या महामार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनांची गती राहणार त्याचबरोबर बस रस्त्यावर करणे प्रवाशांसाठी धोक्याचे बसमधील प्रवासी बसची बस येईपर्यंत बसण्यासाठीही योग्य निवारा असावा. या सर्व बाबींचा विचार करून महामार्गाचे काम सुरू असताना महामार्गावर येणाऱ्या गावाजवळ मोठा चौक तयार करून दोन्ही बाजूने सर्व्हिस रोड व बस स्टॉप ज्या त्या गावाच्या ठिकाणी दिलेला आहे. ह्या सर्विस रोडचा वापस शेतकरी त्या गावातील विद्यार्थी त्या गावात येणारे लोक बस थांब्यावर बसणारे प्रवासी यांच्यासाठी केला जातो. धुळे सोलापूर रोड वरील 119-20 कि.मी वरील वाशी फाटा येथे गेल्या दोन-तीन महिन्यांपासून या सर्विस रोडवर एका खाजगी कंपनीच्या गाड्या उभा असल्याने तेथे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्याचबरोबर वाशी फाटा आहे ठिकाण वाशी शहराच्या जवळच असल्याने पहाटे व सायंकाळी फिरायला येणारे जेष्ठ नागरिक महिला यांच्यासाठी असुरक्षित बनला कारण या त्या वाहनांचे वाहन चालक सर्विस रोडवरच,वरदळीच्या ठिकाणी बसून मद्य प्राशन करणे,धूम्रपान करणे चालु असते. यान वाहनांमुळे सर्विस रोड पूर्ण बंद झालेले तेथील बस स्टॉपच त्या वाहनांच्या गर्दीत दिसेनासा झाला आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी बस थांबा राहिलेला नाही. सर्विस रोड या अवजड वाहनांनी पूर्ण कोंडला गेला कारणाने बस स्टॉप वर बस येणे सुद्धा बंद झाले आहे. त्यामुळे बस चालकांना बस महामार्गावर उभे करून प्रवाशांना जीव मुठीत घेऊन उतरावे लागत आहे. ही प्रवाशांसाठी खूप मोठी गंभीर बाब आहे. त्या परिसरातील शेतकऱ्यांना बैलगाडी किंवा शेती वाहन घेऊन जाण्यासाठी सुद्धा या वाहनांच्या रांगामुळे नाहक त्रास होत आहे. सकाळी मॉर्निंग वॉक साठी महिला-मुली आलेल्या असतात. त्यांच्यासमोरच या वाहनचालक रस्त्यावर आंघोळी करतात. या सर्व बाबीची गंभीर दखल घेत पोलीस प्रशासनाने रस्त्यावरच वाहने उभ्या करणाऱ्या त्या वाहन चालक व मालक यांच्यावर कठोर कारवाई करून तेथील सर्वेस रोड रिकामा करावा हीच मागणी जेष्ठ नागरिक व महिलांमधून होत आहे.



# तळोज्यात एमआयडीसी प्रशासनाची आडमुठी भूमिका

## शिवसेना ठाकरे गट आक्रमक, तीव्र आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** तळोजा औद्योगिक क्षेत्रातील वसाहतीमधील मुख्य रस्त्यांवर गतिरोधक न टाकण्याच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या आडमुठ्या भूमिकेबद्दल शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या पदाधिकाऱ्यानी संबधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. रस्त्यांवर गतिरोधक बसविल्याने वाहनांचे अपघात कमी होतील अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात तळोजा एमआयडीसी परिसरातील गतिरोधकांच्या दुरावस्थेमुळे वाहनांचे नुकसान होत असल्याचे प्रकार वाहनचालकांना अनुभवायला मिळत आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील गतिरोधक वेळी दुरुस्त न केल्यास मोठा अपघात होण्याची शक्यता वाहन चालकांकडून वर्तवली जात आहे.

याची गंभीर दखल घेत येत्या २० ऑक्टोबर २०२३ रोजी जनआंदोलनासह उपोषण करण्याच्या इशारा शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून यावेळी देण्यात आला.



प्रसंगी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपअभियंता दिपक बोबडे पाटील यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील,पनवेल तालुकाप्रमुख विश्वास पेटकर,उपतालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, विभागप्रमुख दत्ता फडके, उपविभाग प्रमुख विष्णू भोईर आदींसह इतर पदाधिकारी व शिवसैनिकांनी भेट घेऊन तळोजा औद्योगिक वसाहतीमधील मुख्य रस्त्यावरल गतिरोधक न उभारण्याच्या भूमिकेबाबत विचारणा केली. गतिरोधक नसल्यामुळे अपघात वाढले असून नाहक वाहनधारकांचा व नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. याची सर्वस्वी जबाबदार महामंडळ असल्याचे सांगितले.या विरोधात येत्या २० ऑक्टोबर २०२३ रोजी जनआंदोलनासह उपोषण करण्याच्या इशारा सुद्धा उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील यांनी दिला.

# प्रामाणिकपणाः खात्यात आलेली १५ लाखांची रक्कम परत केली !

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** तालुक्यातील गंधारी येथील युवा शेतकऱ्याच्या बुलडाणा अर्बन बँके च्या खात्यात अचानक आलेले १५ लाख ७६ हजार ८५ रुपये जमा झाल्याने देशाचे पंतप्रधान मोदी यांनी सदर रक्कम टाकली की काय, हे पाहण्यासाठी गंधारी येथील राधेश्याम बाला चव्हाण हे लोणार येथील बुलडाणा अर्बन बँकेमध्ये गेले असता, शाखेचे व्यवस्थापक यांनी सदर रक्कम चुकीने तुमच्या खात्यात जमा झाल्याचे सांगितल्यावर या युवा शेतकऱ्याने तात्काळ आपल्या खात्यात जमा झालेली १५ लाख ७६ हजार ८५ रुपये संबंधित खातेदाराच्या खात्यात जमा करून दिल्याने जगाचा पोशिंदा म्हणून असलेल्या बळीराजांने अखेर आपला प्रामाणिकपणाचे प्रत्यक्ष उदाहरण समाजापुढे मांडले आहे. या प्रामाणिकतेमुळे बुलढाणा अर्बन लोणार शाखेच्यावतीने व शिवछत्र मित्र मंडळाच्यावतीने या शेतकर्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवछत्र



मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी, बुलडाणा अर्बन बँकचे लोणार शाखेचे व्यवस्थापक गोपाल सावळे, राजेश शर्मा, अरुण गीते, पांडुरंग मुंढे, मधुकर सातपुते सुरेश जाधव, तुकाराम डोळे, यासह मान्यवर उपस्थित होते. एकीकडे ग्राहकाच्या बँक खात्यातील रक्कम ऑनलाइनने परस्पर काढून ती लंपास करण्याचे प्रमाण वाढत असतांना दुसरीकडे मात्र बँक खात्यात अचानक आलेले पैसे आपले प्रामाणिकपणाने परत केल्याचा प्रकार लोणार येथे पहायला मिळाला आहे. राधेश्याम चव्हाण या शेतकर्याने सदर रक्कम परत करीत जगाचा पोशिंदा असणार्या बळीराजासमोर अनेक नैसर्गिक आपत्ती आल्यानंतरही आपल्या प्रामाणिकपणाचे आदर्श उदाहरण समाजापुढे मांडले आहे.

# आठवडी बाजारात कोथिंबीर मळेना

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** आठवडी बाजारात शुक्रवारी दि,६ रोजी बाजारात कोथिंबीर मिळेनासे झाली एकदोन ठिकाणी शेतकऱ्यांनी कोंथिबीर आणली ती गड्डी वीस रुपये प्रमाणे विक्री झाली वाढीव दर का असेना परंतु मिळत नसल्याने बाजारभर बाजार करुनी तंगड्या तुडवल्या शेवटी कोथिंबीर नव्हतीच.आठवडी बाजारांत हिरवी मिरची,फुल कोबी, पत्ताकोबी,गवारसेंग,भेंडी,वांगी,दोडके,बीट,काकडी,ब टाटे,टमाटे, भुईमूग सेंग,कांदा चे दर नियमित प्रमाणे ६०,८०,४०,किलो प्रमाणेच होती.तर मेथी भाजी कोंथबीर लसुन चे वढीव दर होती.तर गत आठवड्यात संततधार पावसामुळे हिरवी पालेभाज्या सडली असल्याने आवक कमी होती तरी दरवाढ झाली नाही हे विशेष.





# स्मारकाच्या जागेवरील अतिक्रमण चार दिवसांत हटणार

## 'लोकस्वराज्य'चा लढा यशस्वी : जिल्हाध्यक्ष कैलास सुर्यवंशी यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडोपंत बनसोडे**

**नांदेड :** मौजे ढोलउमरी तालुका उमरी येथील सत्यशोधक, बहुजननायक डॉ. अण्णा भाऊ साठे स्मारकाच्या जागेवर केलेले अतिक्रमण तातडीने हटविण्यात येवून स्मारकाची नोंद ग्रामपंचायतीच्या नमूना नबंर आठला घेण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी लोकस्वराज्य आंदोलनाचे स्थानिक पदाधिकारी उमरी येथील तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाला बसले होते. तहसीलदार यांनी सदर प्रकरण गांभीर्याने घेऊन सविस्तर चौकशी केली असता केलेले अतिक्रमण व नोंद ही अनाधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ०४ दिवसाच्या आत अतिक्रमण हटवून व गैरमंडळीची नोंद रद्द करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. त्यामुळे आमचा लढा यशस्वी झाला असल्याची प्रतिक्रिया लोकस्वराज्य आंदोलनाचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष मा.कैलास सुर्यवंशी यांनी दिली. अनेक गावांत मोकळ्या जागेवर कब्जा करणे, मागासवर्गीय लोकांच्या स्मशानभूमीवर अतिक्रमण करणे, असे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत असून, ज्या ज्या ठिकाणी असे प्रकार होतात त्या ठिकाणच्या लोकांना उपोषण, आंदोलन, मोर्चे काढुन किंमत मोजावी लागतआहे. नुकतेच मौजे कापसी गुंफा तालुका लोहा येथील नागरिकांना स्मशानभूमीत बेमुदत आमरण उपोषण करावे लागले होते. तेव्हा कोठे त्यांना न्याय मिळाला आहे. मौजे ढोलउमरी येथील एका शासकीय व्यक्तीने आपल्या पदाचा गैरवापर करून स्मारकाची जागा नातेवाईकांच्या नावावर लावुन घेतल्याची व स्मारकाच्या ठिकाणी वैयक्तिक फलक लावल्याचे कळल्यावर स्थानिक नागरिकांना सनदशीर मार्गाने अर्ज करुन केलेले अतिक्रमण काढून घेण्याची विनंती केली, असता सदर व्यक्तीने आपल्या राजकीय लागेबांधे यांचा वापर करुन प्रकरण दडपण्याचा अटोकाट प्रयत्न केला होता.मौजे ढोलउमरी येथील समाजावर होत असलेला अन्याया विरुद्ध लोकस्वराज्यआंदोलनाचे नांदेड



दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा धडाडीचे नेतृत्व मा .श्री कैलास सुर्यवंशी यांच्या निदर्शनास आल्यानंतर तहसीलदार,बीडीओ,स्थानिक ग्रामपंचायत कार्यालय यांच्या सोबत चर्चा केली प्रदीर्घ चर्चा केली होती. राजकीय वरदहस्त असल्याने कार्यवाहीला विलंब होत असल्याचे चित्र दिसत होते. शेवटी या संदर्भात गावकरी व उमरीचे तालुका पदाधिकारी यांनी आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्रजी भरांडे यांची नांदेड येथे भेट घेऊन सदरचे प्रकरण नेमके काय? आहे. याची सविस्तर माहिती दिल्यानंतर अखेर आमरण उपोषणाला बसण्याचा निर्णय घेण्यात आला होता.गेल्या ०५ दिवसांपासून उमरी तहसील कार्यालयासमोर चालु असलेल्या बेमुदत आमरण उपोषणाचा धसका घेऊन तहसीलदार, गटविकास अधिकारी, स्थानिक पोलीस निरीक्षक उमरी यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर चालू असलेले बेमुदत आमरण उपोषण सोडण्यात आले आहे.लोकस्वराज्य आंदोलनाचे धडाडीचे नेतृत्व तथा नवनियुक्त नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष मा.कैलास सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली व नवनियुक्त तालुकाध्यक्ष गंगाधर गायकवाड निमटेककर यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली आमरण उपोषणे यशस्वीपणे पार पडले आहे. यावेळी जेष्ठ नेते बालाजी बंगारीकर,साहेबराव गव्हारकर,राजु गायकवाड मंडाळेकर,पांडूरंग झुंजारे,सचिन सुर्यवंशी,राजु झुंजारे,माधव गायकवाड यांच्यासह महिला,पुरुष,युवक मोठ्या प्रमाणात उपोषणात सहभागी झाले होते. लोकस्वराज्य आंदोलनामुळे मौजे ढोलउमरी गावास न्याय मिळाला असे गांवकरी वर्गातुन सांगितले जात आहे.



# 34 वर्षांनी एकत्र येऊन मित्रांनी केला वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे १९ ८९ वर्ग मित्रांनी सर्व मिळून वाढदिवस साजरा केला वर्ग मित्राचा वाढदिवसाच् अवचित्त साधून सर्व वर्गमित्र एक येऊन वाढदिवस साजरा केला अरुणजी जयस्वाल यांचा सहा दहा ह्या तारखेला वाढदिवस होता त्या वाढदिवसाचा औचित्य साधून सर्व वर्गमित्र एक आले सर्वांना भेटण्याची उत्सुकता होती त्या अनुषंगाने सर्व वर्गमित्र एक आले आणि त्यांनी अरुण जयस्वाल चा वाढदिवस साजरा केला वर्गमित्र खालील प्रमाणे साईनाथ वेताळ सुधाकर आवटे किरण आघाडे पत्रकार सुधाकर जेठे शिवाजी अहिवाड सकाहरी काटकर शाकीर अली शिवाजी नलावडे संताराम नलावडे दुर्गादास नलावडे जनार्दन धोंडीबा नलावडे जनार्धन, त्रंबक नलावडे, अजित सय्यद दिलीप काळे, साईनाथ काळे, संतोष गुंजाळ पोपटराव नलावडे सुरेश शिरे, भाऊसाहेब गायकवाड, प्रभाकर नलावडे, कारभारी नरवडे, पुंजाराम गायकवाड, देविदास सोनवणे, राजेंद्र जाधव, सुरेश जाधव, विनोद अण्णा साळुंखे, नारायण नलावडे, दगू नाना सोनवणे सर्व वर्गमित्र एकत्रित आले आनंदाने उत्साहित एकमेकाला पुष्पगुच्छ देऊन एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

# समृद्धी महामार्गावर ४३ किलो गांजा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** अपघात पाठोपाठ अवैध व्यवसासायाने गाजणाऱ्या समृद्धी महामार्गावर अंमली पदार्थांची देखील तस्करी सुरू असल्याचे धक्कादायक वृत्त आहे. मेहकर ( जिल्हा बुलढाणा) नजीकच्या समृद्धी वर तब्बल सव्वा आठ लाखांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. प्रकरणी दोघा आरोपींना जेरबंद करण्यात आले आहे. नागपूर येथून मेहकरकडे गांजाची वाहतूक करणारा ट्रक येत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांना मिळाली. यावरून मेहकर पोलीस ठाणे अंतर्गतच्या साब्रा शिवारात नाकेबंदी करून पथकाने वाहन अडवून तपासणी केली. मालवाहू वाहनात ४३ किलो २०० ग्राम गांजा सापडला. त्याची किंमत ८लाख ६४ हजार आहे. यासह १५ लाखांचा ट्रक जप्त करण्यात आला. प्रकरणी मेहकर पोलिसांनी आरोपी अब्दुल गफूर रशीद ( ३२, जाफर चाली, जुना जालना) मोहमद आबिद मो सादिक ( ३५, आलेगाव ता पातूर, जिल्हा अकोला) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलीस अधीक्षक सुनील कडासने, अपर पोलीस अधीक्षक बी बी महामुनी यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.

# कुटुंबीय सतर्क झाल्याने चोरीचा प्रयत्न टळला

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील संत निरंकार कॉलनीतील रहिवासी डॉः भाऊसाहेब गवळे यांच्या निवासी घरी शुक्रवारी (ता:६) सकाळी एकच्या दरम्यान जबरी चोरीचा प्रयत्न झाला मात्र बेडरूमच्या घरात झोपलेले जागे होतात चोरट्यांनी शेताकडील रस्त्याच्या दरवाजाने बाहेर पडून पडला जाताना स्वयंपाक खोलीत त्यांच्या पत्नी ममता गवळी यांनी मुलीसाठी ठेवलेले थोडेफार पैसे व मुलीचे सोन्याचे दागिने अशी रक्कम घेऊन ते पसाय झाले. अज्ञात चोरांनी रात्रीच्या एकच्या दरम्यान घराच्या दरवाजाचा कडी कोयना तोडून प्रवेश केला आणि स्वयंपाक रूम मधील डब्यांची शोधा शोध केली डब्यांचा आवाज झाल्याने डॉक्टर गवळी जागे होऊन करतात जे हाती लागेल ते घेऊन कपाशीच्या शेतात पडून गेले. स्थानिक पोलिसांना माहिती कळवतात नवनाथ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार दिलीप बनसोड व संतोष पुंड घटनास्थळी धावून गेले त्यांनी हकीकत खुलताबाद पोलीस स्टेशनला दिल्यावरून तात्काळ ग्रस्त घालण्यासाठी तालुका उपनिरीक्षक श्री मुरमे हे ग्राम सुरक्षा रक्षक पथकाच्या गाडीसह पावणेदोन ला बाजार सावंगी येथे दाखल झाले त्यांनी परिसरात शोध घेतला मात्र तोपर्यंत चोर पळून गेले होते. चोर निघून गेल्याने जवळच्या इंदापूर गावात देखील त्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न फसल्याचे इंदापूर ग्रामस्थ व पोलिसांकडून कळाले. झालेल्या चुकीची अधिकृत तक्रार दाखल झाली नसली तरी पोलिसांकडून या भागात शोध मोहीम सुरूच होती. डॉक्टर गवळे यांनी सांगितले की जाग आल्याने बचावलो कुटुंबातील व्यक्ती सुखरूप असल्याने समाधान असल्याचे व मोठे नुकसान न झाल्याने पोलिसांनी वेळेवर केलेल्या मदतीबद्दल धन्यवाद दिले.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अ‍ॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# वनविभागाकडून शेतकऱ्यांची कुचंबणा

## वृक्ष लागवड अनुदान देण्यास टाळाटाळ, शेतकऱ्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर:** सामाजिक वनिकरण विभाग शासकीय योजनेचे अनुदान जाणीवपूर्वक कमी प्रमाणात देत असून त्या संदर्भात सखोल चौकशी करण्याची मागणी भोकरदन तालुक्यातील लोणगाव येथील शेतकरी संतोष झिने यांनी वनीकरण विभागाकडे निवेदणाद्वारे केली आहे.सामाजिक वनिकरण विभाग शासकीय योजनेचे अनुदान कमी देत असल्याचा आरोपही शेतकऱ्याने केला आहे.

संतोष झिने यांनी वनविभाग अधिकाऱ्यास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की माझी लोणगाव शिवारात गट क्र. 245 मध्ये सामाजिक वनीकरण विभागामार्फत झाडांची लागवड केली आहे.वृक्ष लागवडीचे हे तिसरे वर्ष असून माझ्या शेतातील 80 ते 90 टक्के झाडे जिवंत आहेत. तसेच झाडांची योग्य प्रमाणात वाढ झालेली आहे. वृक्ष लागवड शासकीय योजनेनुसार मला शासनाकडून 5 लाख 67 हजार रुपये एवढी रक्कम मिळणे अपेक्षित होते. परंतु असे असताना देखील वनविभागाकडून फक्त 3 लाख 81 हजार एवढीच रक्कम मला मिळाली आहे.1 लाख 85 रुपये बाकी असल्याचा आरोप शेतकऱ्याने केला आहे.



यासंदर्भात शेतकरी संतोष झिने यांनी संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून मला उर्वरित रक्कम मिळावी अशी मागणी केली आहे. त्यासाठी भोकरदन येथील वनविभाग अधिकाऱ्यांना लेखी निवेदनही देण्यात आले आहे.

# भाजपा नेत्याच्या वाहनाला भरधाव एसटीची धडक

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा भाजपा नेते विजयराज शिंदे यांच्या वाहनाला भरधाव एसटी बसने धडक दिली. यामुळे त्यांच्यासह सुमारे सहाजण जखमी झाले. एअर बॅग लगेच उघडल्याने अपघाताची तीव्रता कमी झाली. अकोला ते अमरावती दरम्यान आज दुपारी ही दुर्घटना घडली. जखमींवर अकोला येथे उपचार सुरू आहे. या घटनेचा विस्तृत तपशील कळू शकला नाही. मात्र प्राप्त माहितीनुसार, शिंदे यांनी अकोल्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यानंतर खासदार अनिल बोंडे यांच्या भेटीसाठी अमरावतीकडे निघाले. अकोला सीमेवर कारंजा येथून अकोल्याकडे जाणाऱ्या एसटी बसने त्यांच्या वाहनाला धडक दिली.






# साब्रा शिवारात 8 लाखांचा गांजा जप्त; दोघे ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** ट्रकमध्ये लोखंडाच्या चुरीत लपूवन गांज नेत असतांना दोन गाजा तस्कराना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानी सापळा रचून ताब्यात घेतले. ही कारवाई 6 ऑक्टोबरच्या रात्री साब्रा शिवारात केली. बुलढाणा जिल्ह्यातील साब्रा शिवारात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने 6 ऑक्टोबरच्या रात्री 11.30 वाजता दरम्यान केलेल्या कारवाईत 8 लाख 40 हजार रुपयांच्या गांजाच्यासह लोखंडाचा चुरा घेऊन जाणारा एक ट्रक जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी जालना येथील ट्रक चालक अब्दुल गफूर रशीद (32, रा.जाफर चाळ, जुना जालना) व सहचालक मोहम्मद अबीद मोहम्मद सादिक (35, रा. आलेगाव, ता. पातूर, जि.अकोला) या दोघांना ताब्यात घेतले आहे. एमएच-26-बीई 0851 क्रमांकाच्या ट्रकमध्ये नेण्यात येत असलेल्या लोखंडाच्या चुरीमध्ये हा 42 किलो गांजा लपवून ठेवला होता.

पोलिसांनी साडेआठ लाख रुपयांचा हा गांजा व 15 लाख रुपये किंमतीचा ट्रक असा 23 लाख 40 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सध्या हा ट्रक मेहकर पोलिस ठाण्याच्या हद्दीत लावण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक लांडे यांच्यासह एपीआय विलास कुमार सानप, पीएसआय सचीन कानडे, दीपक लेकुरवाळे, शरद गिरी, गणेश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.



# भ्रष्टाचार विरोधात आयुक्त कार्यालयासमोर करणार आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** उरण तालुक्यातील कळंबुसरे ग्रामपंचायतमध्ये ग्रामनिधी व लहान मूलांची दफनभूमी साफसफाई संदर्भात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधित ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य नितीन पांडुरंग केणी, सविता मनोहर नाईक, अश्विनी नाईक, स्वप्नाली पाटील यांनी कोकण आयुक्त, रायगड जिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी पंचायत समिती उरण,मुख्य कार्य कारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद,नवी मुंबई पोलीस आयुक्तालय बेलापूर आदि ठिकाणी पत्रव्यवहार करून केली होती. मात्र शांततेच्या व कायदेशीर मार्गाने पत्रव्यवहार करून सुद्धा कळंबुसरे ग्रामपंचायती मधील भ्रष्टाचाराला चाप बसत नसल्याने तसेच संबधित भ्रष्टाचार प्रकरणी सरपंच व



ग्रामसेवकावर कोणतेही कायदेशीर कारवाई होत नसल्याने कळंबुसरे ग्रामपंचायतचे सदस्य नितीन पांडुरंग केणी, सविता मनोहर नाईक, अश्विनी तळीराम नाईक, स्वप्नाली महेश पाटील हे गुरुवार दि. १२ ऑक्टोंबर २०२३ पासून कोकण आयुक्त कार्यालय, कोकण भवन बेलापूर, नवी मुंबई येथे कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करणार आहेत.

जानेवारी २०२३ ते जून २०२३ पर्यंत कळंबूसरे ग्रामपंचायती मधील ग्रामनिधीत २५ ते ३० लाखांचा भ्रष्टाचार झाल्याचं संशय आहे. आम्ही ग्रामपंचायत सदसस्यांनी विचारणा केली असता दुर्लक्ष केला जातो. किंवा मासिक सभेला कुठल्याही विषयांवर गोंधळ करून सदास्यांचे लक्ष विचलित करून ठराव पास केले जातात व जमा खर्चाला मान्यता दिली जाते. तसेच काही कामांची खोटी माहिती पुरवली जाते. याबाबत दि १७/०८/२०२३ रोजी संबंधित वरिष्ठ विभागाकडे तक्रारी अर्ज दाखल केला होता.परंतु संबंधित प्रकरणी कोणतीच ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, म्हणून न्याय हक्कांसाठी दि. १२/१०/२०२३ रोजी. मा. कोकण आयुक्त, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेली आहे. यांची नोंद संबंधित विभागाने घ्यावी. आम्ही शांततेच्या व कायदेशीर मार्गाने लढा देत आहोत.

# आ. अमित झनक यांच्या १०० कोटींच्या विकासकामांचा मार्ग मोकळा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशीम :** महाविकास आघाडी सरकारने मंजूर केलेले प्रकल्प अथवा विविध विकास कामांना सत्तांतरानंतर विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने पूर्वीच्या मंजुरात प्राप्त विकास कामांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता. त्या अनुषंगाने ' एकदा मंजुरी दिल्यानंतर सरकार बदलले म्हणून स्थगिती कशी काय दिली जाऊ शकते..?' असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यावर 'राज्य सरकारचा हा कारभार योग्य नसून, आम्ही तो मान्य करणार नाही..! राज्यात असा चुकीचा पायंडा आम्ही पडू देणार नाही..!! अशा शब्दात राज्य सरकारला उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर काल ४ ऑक्टोबर रोजी हा स्थगितीचा निर्णय मागे घेण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. परिणामी रिसोड, मालेगाव विधानसभा मतदारसंघातील जवळपास १०० कोटी रुपयांच्या मंजूरात प्राप्त विकासकामांचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच सदर कामांची सुरुवात होणार असल्याची माहिती रिसोड ₹ मालेगावचेआमदार अमित झनक यांनी दिली आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात रिसोड, मालेगाव विधानसभा मतदारसंघासाठी आ. अमित झनक यांनी तब्बल १०० कोटी रुपयांची विकास कामे मंजूर करून घेतली होती. मात्र सत्तांतरानंतर विद्यमान सरकारने या कामांना स्थगिती दिली होती. तथापि, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यामुळे अखेर.. न्यायालयाने सर्व बाजू लक्षात घेऊन स्थगिती उठवली आहे. त्यामुळे रिसोड आणि मालेगाव या दोन तालुक्यातील ग्रामीण रस्ते, ग्रामविकास, आणि नगर विकास, तद्वतच जलसंधारणाच्या विकास कामांचा मार्ग मोकळा झाला आहे. परिणामी १०० कोटी रुपयांच्या मंजुरात प्राप्त कामांना लवकरच सुरुवात होणार असल्याने, मतदार संघातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे आमदार झनक म्हणाले आहेत. पुढे बोलताना आमदार म्हणाले, सिंचना अभावी बहुतांश शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते त्या आधारे खरिपाचा हंगाम पावसाच्या मर्जीनुसार साधता येतो. मात्र रब्बी हंगामात केवळ पाण्याअभावी अनेकांची शेती पडीक राहते. त्याअनुषंगाने सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आपण अनेक कामे मंजूर करून घेतली होती. त्यासंबंधीत सर्व कामावरील स्थगिती उठल्याने सदर कामे सुरू होण्यास आता सोयीचे झाले आहे. शिवाय ग्रामीण भागातील बऱ्याच रस्त्यांची कामे झाली असली तरी, अजून काही भागातील रस्ते दयनीय अवस्थेत आहेत. अशा कामांना सुद्धा आता गती मिळणार आहे. सदर १०० कोटी रुपयांच्या विकास कामात इतर स्वरूपातील विकास कामांचा देखील समावेश असून, विद्यमान सरकारने आघाडी सरकारच्या काळातील मंजूर कामांना स्थगिती दिल्यामुळेच सदर कामाचा कोळंबा झाला होता. मात्र उच्च न्यायालयाने स्थगिती उठविली असल्यामुळे विकासकामांचा मार्ग मोकळा झाला असल्याचे आ. अमित झनक म्हणाले आहेत.

